



सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
सोलापूर | बुधवार, २० मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १७१ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प्रत्येक व्यक्ती, संस्था आणि समूहाने स्वहित जपत, समाजहितास कोणतीही बाधा न आणता कसे जगावे हे धर्म शिकवतो. ज्या आचरणामुळे समाजाचे अहित होईल असे आचरण धर्म नव्हे, अधर्म आहे.

**स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# धोकादायक श्वानांना मृत्यू देण्याची परवानगी

## नागरिकांचा जीव महत्त्वाचा; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

मानवाला धोका ठरू शकतील असे पिसाळलेले, असाध्य आजारांनी ग्रस्त किंवा धोकादायक भटक्या श्वानांना वेदनारहित मृत्यू दिला जाऊ शकतो, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला आहे. लोकांच्या जीविताची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. जे अधिकारी निर्देश पाळणार नाहीत त्यांच्याविरूद्ध अवमानना खटला चालविला जावा, असा स्पष्ट आदेश देत न्यायालयाने या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका फेटाळून लावल्या.

देशातील भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येचा सामना करण्यासाठी अनेक निर्देश न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनाने जारी केले. भटक्या श्वानांचे निर्दालन करण्याचा आदेश देणे हीच आपण नागरी संस्थांचे अधिकारी व प्रशासनांना देत असलेले सर्वांत मोठे निर्देश आहे, असे न्यायासनाने म्हटले.

ज्या भागांमध्ये मोकाट श्वानांची संख्या चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे आणि जिथे वारंवार चावण्याचा किंवा आक्रमक हल्ल्यांमुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे, अशा भागांमध्ये नागरी प्रशासन त्यांना मृत्यू देण्याचा अवलंब करू शकते, असे आदेशात म्हटले आहे. पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मूल्यमापनानंतर आणि प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा-१९६०, प्राणी जन्म नियंत्रण नियम-२०२३ तसेच इतर लागू वैधानिक कार्यपद्धतींमधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करूनच ही कारवाई तसेच इतर कायदेशीर उपाययोजना हाती घेतल्या जाऊ शकतात, असे न्यायासनाने नमूद केले.

राष्ट्रीय राजधानीमध्ये भटक्या श्वानांच्या चाव्यामुळे विशेषतः मुलांमध्ये होणाऱ्या रेबीज संसर्गाबाबतच्या एका प्रसारमाध्यमावरील वृत्तावर आधारित आणि मागील वर्षी २८ जुलै रोजी स्वतःहून दाखल करून घेण्यात आलेल्या एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश पारित केला.

न्यायालयाने मंगळवारी भटक्या श्वानांचे स्थलांतर आणि निर्बीजकरण करण्याबाबतच्या आपल्या पूर्वीच्या आदेशाचा पुनर्विचार करण्याची मागणी करणाऱ्या याचिका फेटाळल्या. कारण, सन्मानाने जगण्याच्या अधिकारात श्वानांच्या चावण्यामुळे होणाऱ्या हानीच्या धोक्याविना मुक्तपणे फिरण्याच्या अधिकाराचाही समावेश होतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

सार्वजनिक ठिकाणांवरून पकडलेल्या श्वानांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर पुन्हा त्याच ठिकाणी न सोडण्याबाबतच्या आपल्या पूर्वीच्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याचा निर्देश न्यायालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिला. (वृत्तसंस्था)



### न्यायालयाने दिलेले निर्देश

- अँटी-रेबीज औषधांची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करावी.
- राष्ट्रीय महामार्गांवर भटक्या जनावरांच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत.
- पशु कल्याण मंडळाचे नियम अधिक कडक करून त्यांची योग्य अंमलबजावणी करावी.
- न्यायालयाचे आदेश लागू करणाऱ्या अधिकाऱ्यांना कायदेशीर संरक्षण दिले जावे. त्यांच्याविरुद्ध एफआयआर किंवा कठोर कारवाई केली जाऊ नये.
- प्रत्येक जिल्ह्यात किमान एक पूर्णपणे कार्यरत प्राणी जन्मदर नियंत्रण केंद्र स्थापन करावे. जास्त लोकसंख्या असल्यास केंद्रांची संख्या वाढवावी
- न्यायालयाचे आदेश आणि पशु कल्याण नियमांची पूर्णपणे अंमलबजावणी करावी. लोकांच्या सुरक्षेचा विचार करून अन्य सार्वजनिक ठिकाणीही नियम लागू करावेत.
- रेबीज झालेल्या, अत्यंत धोकादायक श्वानांसाठी कायद्यानुसार गरज पडल्यास यूथेनेशिया (दया मरण) सारखी पावले उचलली जाऊ शकतात.

नीट पेपरफूट प्रकरण

# मास्टरमाईंडचे नागपूर कनेक्शन उघड!

## नागपुरातील दोन विद्यार्थ्यांच्या घरांवर सीबीआयचे छापे

◆ **नागपूर, १९ मे**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफूट प्रकरणाच्या तपासात आता नागपूर कनेक्शन समोर येऊ लागले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) दिल्ली येथील विशेष पथकाने मंगळवारी नागपूर आणि चंद्रपूर येथे तीन विद्यार्थ्यांच्या घरांची झडती घेतली. या कारवाईत नागपूर सीबीआय पथकानेही सहकार्य केले. तपास यंत्रणांच्या या हालचालींमुळे विदर्भातील शैक्षणिक वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, झडती घेण्यात आलेल्या तिघांपैकी दोन विद्यार्थी नागपूरमधील असून, एक चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. सीबीआयच्या पथकांनी या विद्यार्थ्यांच्या घरांची व मोबाईलची तपासणी केली. नीट परीक्षेदरम्यान असलेले विद्यार्थ्यांचे काही संशयास्पद संपर्क, आर्थिक व्यवहार आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित डिजिटल पुरावे तपासण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

कारवाईदरम्यान मोबाईल फोन, लॅपटॉप, ऑनलाईन व्यवहार रेकॉर्ड, चॅट हिस्ट्री आणि अनेक डिजिटल पुरावे तपासण्यात आले. काही महत्त्वाची इलेक्ट्रॉनिक उपकरणे सीबीआयने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या संपर्कात असलेले काही जण तपास यंत्रणांच्या रडारवर आहेत. पेपरफूट रॅकेट, कोचिंग लॉबी, दलाल नेटवर्कशी विद्यार्थ्यांचे संबंध होते का, याचा कसून तपास सुरू आहे. नागपुरातून मिळालेल्या डिजिटल पुराव्यांमुळे तपासाला मोठी दिशा मिळाल्याचे सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे, परीक्षेपूर्वी झालेल्या काही संशयास्पद चॅट्स, पैशांचे व्यवहार आणि गुप्त संपर्कामुळे सीबीआयचा संशय अधिकच बळावला आहे. त्यामुळे नागपुरातून जप्त करण्यात आलेले डिजिटल पुरावे दिल्लीला पाठविण्यात आले असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणात मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, संबंधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांसह जवळच्या व्यक्तींचीही चौकशी करण्यात आली. अद्याप कोणालाही अटक करण्यात आली नसली तरी तपासाची व्याप्ती वाढण्याची चिन्हे आहेत. अद्याप सीबीआयने विद्यार्थ्यांची नावे जाहीर केलेली नाहीत. या प्रकरणी सीबीआयने कोणतीही माहिती प्रसारमाध्यमांना दिली नाही. (तभा वृत्तसेवा)

# मोटेगावकरच्या मुलाची सीबीआयकडून चौकशी

## राज्यातील २०० पेक्षा जास्त जणांकडे पेपर पोहोचल्याचा संशय

◆ **पुणे, १९ मे**

नीट पेपरफूट प्रकरणातील आरोपी आणि आरसीसी कोचिंग क्लासचा संचालक शिवराज मोटेगावकरच्या अटकेनंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने त्याच्या मुलाची चौकशी केली. मंगळवारी मोटेगावकरच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयात पाच ते सहा तास कसून चौकशी करण्यात आली. हा मुलगा नुकताच बारावी उत्तीर्ण झाला असून, त्यालाही फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचा फायदा झाला होता का, या दृष्टीने तपास सुरू आहे.



शिवराज मोटेगावकर

सीबीआयचे पथक मोटेगावकरला पुढील चौकशीसाठी दिल्लीत घेऊन गेले असून न्यायालयाने त्यांना नऊ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. प्राथमिक तपासात फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचा फायदा काही निवडक विद्यार्थ्यांना झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून त्यात मोटेगावकरच्या मुलाचाही समावेश होता का, याचा तपास अधिकारी बारकाईने करत आहेत. दरम्यान, मोटेगावकरच्या आरसीसी क्लासमध्ये शिक्षण घेणाऱ्या आणखी तीन विद्यार्थ्यांना पालकांसह पुण्यातील सीबीआय कार्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी कोणत्याही माध्यमातून प्रश्नपत्रिका मिळाली होती का, याची पडताळणी सुरू आहे. तपासाच्या पुढील टप्प्यात काही महत्त्वाच्या व्यक्तींना समन्स बजावले जाण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.

मोटेगावकरचे नॅशनल टेस्टिंग एजन्सीशी संबंधित काही प्राध्यापकांशी घनिष्ठ संबंध असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका फुटीचे हे जाळे केवळ स्थानिक पातळीपुरते मर्यादित नसून, त्यामागे मोठे, संघटित रॅकेट कार्यरत असल्याचा संशय आहे.

या अनुषंगाने डिजिटल पुरावे, मोबाईल चॅट्स, कॉल डिटेल्स आणि आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी सुरू आहे. राज्यातील २०० पेक्षा जास्त मुलांपर्यंत हे पेपर परीक्षेच्या अशी पोहोचले असल्याची माहिती समोर येत आहे. या सर्वांची चौकशी करण्यात येणार का असा प्रश्न आहे. (तभा वृत्तसेवा)

(संबंधित वृत्त शेवटच्या पानावर)

## महत्त्वाचे

### नफा वसुलीमुळे शेअर बाजारात घसरण

**मुंबई** : जागतिक बाजारातील मंदीचे संकेत आणि रुपयातील घसरण यामुळे गुंतवणूकदारांनी नफा वसुलीला प्राधान्य दिले. परिणामी, मंगळवारी देशांतर्गत शेअर बाजाराने सुरुवातीची सर्व वाढ गमावली आणि दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. दिवसभराच्या व्यवहाराअंती सेन्सेक्स ११४.१९ अंकांनी म्हणजेच ०.१५ टक्क्यांनी घसरून ७५,२००.८५ वर स्थिरावला. दुसरीकडे, निफ्टीमध्ये ३१.९५ अंकाची म्हणजेच ०.१४ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली आणि तो २३,६१८ वर बंद झाला. वास्तविक पाहता, मंगळवारी सकाळच्या सत्रात बाजाराची सुरुवात मजबूत झाली होती. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ४३१.२३ अंकांनी वाढून ७५,७४६.२७ वर पोहोचला होता, तर निफ्टी १३२.३५ अंकांच्या वाढीसह २३,७८२.३० या पातळीवर गेला होता.

### मुंढे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त

**मुंबई:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्ती केल्या. यात तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. कानुराज बगाटे यांची व्यवस्थापकीय संचालक महामुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित मुंबई येथे नियुक्ती केली असून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ येथील व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब बेलदार यांची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे येथे नियुक्ती करण्यात आली आहे. व्यवस्थापकीय संचालक हपकिन जीव व औषध निर्माण महामंडळ येथील कार्यरत असलेले सुनील महिंद्रकर यांच्याकडून व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार राज्य कामगार विमा योजना आयुक्त रमेश चव्हाण यांच्याकडे सोपवण्यात आलेला आहे. सुनील महिंद्रकर यांना नियुक्तीच्या प्रतीक्षा ठेवण्यात आलेले आहे.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# नॉन क्रिमीलेअर मर्यादा १५ लाख होणार

## ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीची शिफारस

◆ **मुंबई, १९ मे**

नॉन क्रिमीलेअरची मर्यादा आठहून १५ लाखांपर्यंत करण्याची शिफारस ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीने केली आहे. या शिफारशीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊ, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. तसेच ४३ नव्या जातींच्या समावेशासाठी केंद्राकडे जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती बैठक पार पडली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, इतर मागास बहुजन कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. बैठकीसाठी विशेष उपस्थित लक्ष्मण हाके यांनी प्रशासकीय त्रुटींकडे लक्ष वेधले. 'स्पेलिंग मिस्टेकमुळे राज्यातील २७ ते ३२ जाती शासकीय लाभांपासून वंचित आहेत, यावर केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवून तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

बैठकीत विविध तांत्रिक व धोरणात्मक विषयांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जात पडताळणी समितीकडील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे, ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलती आणि विविध महामंडळांच्या नियुक्त्यांचा प्रश्न अग्रक्रमाने सोडविणे, राज्य मागासवर्ग आयोगाचे बळकटीकरण, उपसंचालक, सहाय्यक संचालक यांना वाहन घेण्यास मंजूरी, सध्या शिबिरांचे आयोजन करुन त्या माध्यमातून जात प्रमाणपत्रांचे वाटप सुरू असून, जिल्हाधिकाऱ्याशी बैठक घेऊन योग्य आणि पात्र व्यक्तींनाच प्रमाणपत्र दिले जावे अशी शिफारस करणे तसेच चुकीच्या लोकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येऊ नये, असे आदेश देण्यात यावेत. अशा सूचनाही यावेळी करण्याची शिफारस करण्यात आली. (तभा वृत्तसेवा)

### रशियन तेल खरेदीवरील सवलत वाढविली

◆ **वॉशिंग्टन, १९ मे**

सध्या समुद्रात असलेल्या रशियन तेलावरील निर्बंधावर दिलेल्या सवलतीचा कालावधी अमेरिकेने एक महिन्याने वाढविला आहे. याबाबतचा आदेश अमेरिकी अर्थ विभागाने सोमवारी जारी केला. १७ एप्रिल रोजी किंवा त्यापूर्वी समुद्रात अडकलेल्या रशियन तेलावरील निर्बंधांमधून दिलेली सवलत १७ जूनपर्यंत वाढविण्यात आली, असे या आदेशात म्हटले आहे.

१८ मे पासून प्रभावी ठरेल अशा रीतीने १७ एप्रिल रोजी दिनांकित आणि १६ मे रोजी संपलेला सामान्य परवाना क्रमांक १३४ बी हा या सामान्य परवाना क्रमांक १३४ सीद्वारे संपूर्णपणे बदलला गेला असून त्याची जागा या नव्या परवान्याने घेतली आहे, असे अमेरिकेच्या वित्त विभागाच्या विदेशी मालमत्ता नियंत्रण कार्यालयाने जारी केलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

यापूर्वी अमेरिकेने ५ मार्चपासून सुरू होणाऱ्या एका महिन्याच्या कालावधीसाठी रशियन तेल खरेदी करण्याबाबत भारताला निर्बंधातून सूट दिली होती. त्यानंतर काही दिवसांनीच अशाच प्रकारची सूट इतरही देशांना देण्यात आली. याची मुदत ११ एप्रिल रोजी संपली. (वृत्तसंस्था)

# पाच्छा पेठेतील दोन इमारतीतील अनधिकृत बांधकामावर हातोडा





बोगस बांधकाम परवाना प्रकरण

## महापालिकेची धडक कारवाई

## पार्किंगमधील ६ गाळे, पत्राशेड जमीनदोस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मे-**

बोगस बांधकाम परवाना घेऊन बांधलेल्या शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात मोठी कारवाई हाती घेण्यात आली. शहरातील विविध भागांतील ९ ठिकाणी नियोजित कारवाई करण्यात येत आहे. या धडक पाडकाम मोहिमेतंर्गत मंगळवार, दि.१९ मे २०२६ रोजी पाच्छा पेठेतील दोन इमारतीतील अनधिकृत बांधकामावर हातोडा मारण्यात आला. येथील तळमजल्यातील ६ गाळे आणि पत्राशेड जमीनदोस्त करण्यात आले.

सोलापूर शहराच्या पाच्छा पेठ, मजरेवाडी, सहारा नगर, शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, गुरुवार पेठ, उत्तर सदर बझार आदी परिसरात उभारलेल्या बहुमजली इमारतींसाठी पालिकेतील तत्कालीन चार अधिकारी, परवानाधारक अभियंते आणि बिल्डर्स यांच्या संगनमताने बोगस बांधकाम परवाने तयार करण्यात केले होते. त्यानुसार या इमारती उभारण्यात आल्या. आता या इमारती बेकायदेशीर ठरल्या असून, लाखो रुपयांची गुंतवणूक करणारे नागरिक अडचणीत आले आहेत.

महापालिकेत एकूण ९६ बोगस बांधकाम परवाने उघडकीस आले होते. आयुक्तांनी या इमारतीच्या पाडकामाचे आदेश दिल्यानंतर यातील ३५ जणांनी कारवाई थांबविण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी १९ ते २३ मे २०२६ असे सलग पाच दिवस एकूण ९ इमारतींचे पाडकाम करण्याचे आदेश दिले आहेत.

### असे आहे कारवाईचे वेळापत्रक

दि.२० मे २०२६ रोजी शुक्रवार पेठेतील फैज अहमद हाजी व अकबर बागवान यांच्या पार्किंग अधिक ७ मजली इमारतीसह उत्तर सदर बाजार येथील एम.शफी व एम.यासीन शेख यांच्या तळमजला अधिक ७ मजली बांधकाम. दि.२१ मे २०२६ रोजी गुरुवार पेठेतील ताहेरा बागवान यांच्या तळमजला अधिक ७ मजली इमारती, शनिवार पेठेतील खुदाबक्ष हाजी यांच्या तळघर, तळमजला अधिक ८ मजली बांधकाम. दि.२२ मे रोजी मजरेवाडीतील बसवेश्वर नगर परिसरातील ग्लोबल इन्फ्राकॉनशी संबंधित बांधकाम, सहारा नगर येथील मुमताज रहमान सिद्दकी व इतर यांच्या इमारती. दि.२३ मे रोजी भवानी पेठेतील विनायक ढंगे यांच्या पार्किंग अधिक ५ मजली बांधकामावर कारवाई होणार आहे.

### चार ब्रेकरसह जेसीबीचा वापर

अनधिकृत बांधकाम पाडकामासाठी महापालिकेने चार ब्रेकर, एक जेसीबी, दहा मजूर, ९ कनिष्ठ अभियंता, दोन सहाय्यक अभियंता, एक कार्यकारी अभियंता, पोलिस अधिकारी आणि पोलिस कर्मचारी अशी मोठी यंत्रणा कार्यरत होती.

पाच्छा पेठ येथील स्क्वेअर वन बिल्डर्स यांच्या तळमजला अधिक ८ मजली बांधकाम असलेले, मुमताज बेगम व इब्राहीम किल्लेदार यांच्या तळमजला अधिक ७ मजली इमारत येथे कारवाई करण्यात आली. महापालिकेचे पथक आवश्यकता यंत्रणेसह तगड्या पोलिस बंदोबस्तात सकाळी ११ वाजता याठिकाणी दाखल झाले होते. स्क्वेअर वन बिल्डर्सच्या मॅजेस्टिक स्क्वेअर बिल्डिंग येथील तळमजला पार्किंग मधील अनधिकृत तीन गाळ्यांवर हातोडा मारण्यात आला.

येथील आठव्या मजल्यावरील फ्लॅटधारकांनाही अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र संबंधित बिल्डरने वेळ मागितली आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही केली नसल्याचे सांगण्यात आले. मुमताज बेगम व इब्राहिम किल्लेदार यांच्या तळमजला अधिक ७ मजली इमारत येथे कारवाई करुन याठिकाणचे पार्किंगमधील अनधिकृत तीन गाळे आणि इतर पत्राशेड जमीनदोस्त करण्यात आले. या कारवाईदरम्यान नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. या कारवाईच्या वेळी सहसंचालक नगररचना समीर शितोळे, नगररचना विभागाचे कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, उपअभियंता जोशी, सहाय्यक अभियंता शकील शेख, झरतार, कनिष्ठ अभियंता गणेश काकडे, बसवराज बडगा, सलमान मणियार, दयानंद अवताडे, दीपाली मेटकरी, प्रमोद गोविंदवार, अतिक्रमण विभागाचे दीपक कुंभार यांच्यासह अतिक्रमण विभागातील सर्व पोलिस, जेलरोड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक आदी उपस्थित होते.

### ६ बांधकाम धारकांच्या पाडकामाला न्यायालयाची स्थगिती

बोगस परवानगीसह अनधिकृत बांधकामे केल्याप्रकरणी शहरातील ९ टोलेजंग इमारतींना अनाधिकृत भाग पाडून घेण्यासाठी महापालिका नगर रचना विभागाने २४ तासाच्या मुदतीची नोटीस धाडली होती. पाडकामास स्थगिती मिळावी म्हणून या बांधकामधारकांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने वकिलांचे युक्तिवाद आणि सुनावणी घेऊन तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती आदेश दिले आहेत. दरम्यान यापैकी दोघांचे अनधिकृत बांधकाम मंगळवारी पाडण्यात आले. एक बांधकाम धारक नोटीस सादर करु शकले नाही. उर्वरित सहा जणांना बांधकाम पाडण्यास स्थगिती मिळाल्याने दिलासा मिळाला आहे. यासाठी अॅड.निलेश ठोकडे, अॅड.निशिकांत देगावकर यांनी काम पाहिले.

# स्वच्छ आणि हरित ऊर्जेत महाराष्ट्राची महाझेप

## चार बड्या कंपन्यांसोबत ६.५ लाख कोटींचे करार ● सवा लाख रोजगारांची निर्मिती

◆ **मुंबई, १९ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संपन्न ऊर्जा राष्ट्र आणि शून्य कार्बन उत्सर्जन या संकल्पनेला बळ देण्यासाठी महाराष्ट्राने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यात अणुऊर्जा निर्मितीसाठी तब्बल ६,५०,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे चार महत्त्वाचे सामंजस्य करार आज करण्यात आले. या महाप्रकल्पांतून राज्यात २५,४०० मेगावॅट स्वच्छ विजेची निर्मिती होणार असून, १,२३,५०० तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयात केली.



मंत्रालयात आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि संबंधित कंपन्यांच्या प्रमुखांमध्ये या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या प्रसंगी राज्याचे पारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, एनटीपीसीचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवरचे बिझनेस हेड विवेक शर्मा, आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, हा प्रकल्प केवळ वीज निर्मितीपुरता मर्यादित नसून राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीला वेग देणारा ठरेल. या गुंतवणुकीमुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर कुशल आणि अकुशल रोजगारांची निर्मिती होईल. तसेच, कोळशावर आधारित ऊर्जेवरील अवलंबित्व कमी होऊन महाराष्ट्राचे पर्यावरण अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहे. सर्व संबंधित कंपन्यांनी या प्रकल्पांची प्रत्यक्ष अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू करावी, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत. (तभा वृत्तसेवा)

### कोणत्या कंपनीची किती गुंतवणूक आणि रोजगार?

या मेगा करारांतर्गत देशातील चार आघाडीच्या उद्योग समूहांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीचा मास्टरप्लॅन सादर केला आहे

| कंपनीचे नाव | प्रस्तावित गुंतवणूक | ऊर्जा निर्मिती क्षमता | अपेक्षित रोजगार निर्मिती |
|---|---|---|---|
| रिलायन्स इंडस्ट्रीज | २,००,००० कोटी | ७,२०० मेगावॅट | १,००,००० पेक्षा जास्त |
| ललितपुर पॉवर (बजाज समूह) | २,००,००० कोटी | ५,००० मेगावॅट | ३,००० |
| अदानी पॉवर लिमिटेड | १,५०,००० कोटी | ६,००० मेगावॅट | १२,००० (प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष) |
| एनटीपीसी लिमिटेड | १,००,००० कोटी | ७,२०० मेगावॅट | ५,००० |
| **एकूण** | **६,५०,००० कोटी** | **२५,४०० मेगावॅट** | **१,२३,५००** |

# राजकीय टीका, व्यंग देशद्रोह नव्हे

## मद्रास हायकोर्टाचे निरीक्षण, विहिंपच्या पोस्ट हटविण्याच्या आदेशाला स्थगिती

**चेन्नई, १९ मे**

लोकशाहीमध्ये राजकीय टीकेला तसेच कायदा-सुव्यवस्था समस्येवरील व्यंगाला देशद्रोह मानले जाऊ शकत नाही, असे निरीक्षण नोंदवत मद्रास उच्च न्यायालयाने विश्व हिंदू परिषदेच्या (व्हीएचपी) प्रादेशिक युनिटने एक्स वर टाकलेल्या अनेक राजकीय पोस्ट ब्लॉक करण्याच्या तामिळनाडू पोलिसांच्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली.

विश्व हिंदू परिषदेच्या एक्स खात्यावरील पोस्ट हटविण्याचे सूचना पोलिसांनी जारी केल्या होत्या. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ७९(३)(ब) आणि आयटी नियम, २०२१ च्या नियम ३(१)(ड) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. ८ मे रोजी जारी केलेल्या नोटिसीला उत्तर म्हणून तामिळनाडू विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष पी. चोकलिंगम यांनी मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याचिकाकर्त्यांचे वकील चोकलिंगम यांनी युक्तिवाद म्हटले की, पोलिसांनी वेगवेगळ्या युजर्सच्या अनेक लिंक्स एकाच आदेशाखाली एकत्र गोळा करून ब्लॉक करण्याचे आदेश दिले. अधिकाऱ्यांनी प्रत्येक पोस्टची सामग्री, त्याचा संदर्भ किंवा त्याच्या घटनात्मक अधिकारांची स्वतंत्रपणे तपासणी केली नाही. तसेच, संबंधित युजर्सना त्यांच्यावरील आरोपांची माहिती न देता किंवा त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी न देता ही नोटीस जारी करण्यात आली. (वृत्तसंस्था)

### लोकशाहीत टीका गुन्हेगारी कृत्य नाही

न्या. एल. व्हिक्टोरिया गौरी आणि न्या. एन. सेंथिलकुमार यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, राजकीय टीका, उपहास, मतभेद आणि जाहीर वादविवाद हे राज्यघटनेच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत संरक्षित आहेत. लोकशाहीमध्ये टीकेला सुव्यवस्थेचा बिघाड, उपहासाला देशद्रोह, मतभेदाला धोका किंवा मताला गुन्हेगारी मानले जाऊ शकत नाही.

### सरकारने दिलेली सवलत घटनात्मक हमी

एक घटनात्मक लोकशाही म्हणून, सरकार, त्यांचे अधिकारी, राजकीय नेते आणि सार्वजनिक धोरणांवर टीका करण्याचा अधिकार हा सरकारने दिलेली कोणतीही सवलत किंवा भीक नाही, तर ती एक घटनात्मक हमी आहे, याचे स्मरणही उच्च न्यायालयाने करून दिले. यावेळी पोलिसांच्या आदेशाला अंतरिम स्थगिती देण्यात आली.



उत्तर भारतातील अनेक शहरे उष्णतेच्या लाटेने होरपळून निघत आहेत. परिणामी पर्यटकांच्या संख्येत घट होत आहे. दुपारच्या सुमारास उन्हाचा तडाखा बसू नये म्हणून प्रयागराज येथील नावाड्यांनी घाटाच्या काठावर आपल्या नावा लावल्या आहेत.

# मंदिरांमधील सोन्याच्या मुद्रीकरणाची योजना नाही

### अर्थ मंत्रालयाकडून अफवांचे खंडन

**नवी दिल्ली, १९ मे**

केंद्र सरकार मंदिरांमधील सोन्याचे मुद्रीकरण करणार असल्याची माहिती समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याने उलटसुलट चर्चा सुरू आहे. अर्थमंत्रालयाने या अफवा असल्याचे स्पष्ट करत सरकारची अशाप्रकरची कोणतीही योजना नसल्याचे स्पष्ट केले आहे.



या अफवा पूर्णपणे खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत. नागरिकांना अधिकृत माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन निवेदनातून केले आहे. मंदिरांकडील सोन्याचे मुद्रीकरण करण्याच्या कोणत्याही योजनेचे खंडन करताना अर्थ मंत्रालयाने म्हटले की, या अफवा आणि अटकळी पूर्णपणे खोट्या आहेत. अशी कोणतीही योजना विचाराधीन नाही. देशभरातील मंदिर विश्वस्त संस्था किंवा कोणत्याही धार्मिक संस्थांकडील सोन्यासाठी मुद्रीकरण योजना सुरू करण्याची कोणतीही योजना नाही. मंदिरांच्या घुमटांवर, दारांवर किंवा इतर वास्तूंवर असलेले सोन्याचे आवरण भारताच्या सामरिक सुवर्ण साठ्याचा भाग मानले जाईल, हा दावाही मंत्रालयाने फेटाळून लावला.

**अधिकृत संदेशांवर विश्वास ठेवा**

सरकारने सर्व नागरिकांना केवळ अधिकृत माध्यमांद्वारे जारी केलेल्या अधिकृत संदेशांवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे. धोरणात्मक निर्णय किंवा सरकारी योजनांशी संबंधित कोणतीही माहिती अधिकृत प्रसिद्धीपत्रके, सरकारी संकेतस्थळ आणि प्रमाणित सार्वजनिक संवाद माध्यमांद्वारे दिली जाईल. धार्मिक संस्थांशी संबंधित संवेदनशील बाबींवर चुकीची माहिती पसरवल्याने सामाजिक सलोख्यावर परिणाम होऊ शकतो. (वृत्तसंस्था)

# जहाँगीर खानने मागे घेतली उमेदवारी

**फालता फेरमतदानापूर्वी तृणमूल काँग्रेसला धक्का**

**कोलकाता, १९ मे**

दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील फालता मतदारसंघात तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. तृणमूल काँग्रेसचे उमेदवार जहाँगीर खान यांनी निवडणुकीतून माघार घेतली. फालता येथे २१ मे रोजी फेरमतदान होणार आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी अचानक खान यांनी उमेदवारी मागे घेण्याची घोषणा केल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पक्षाला खान यांच्या निर्णयाबद्दल माहिती देण्यात आली आहे, असे तृणमूल काँग्रेसचे प्रवक्ते अरूप चक्रवर्ती यांनी या घडामोडीवर सांगितले. तथापि, या निर्णयामागील कारणांबद्दल पक्षाला अद्याप स्पष्टता नाही. जहाँगीर खान यांनी फालता निवडणूक न लढवण्याचा किंवा त्यात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे, असे आम्ही ऐकले आहे. हा निर्णय त्यांनी अचानक घेतला. पक्ष या प्रकरणी अधिक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहे. (वृत्तसंस्था)

### विकास आणि शांततेसाठी माघार : जहाँगीर



फालतामध्ये शांतता, सुरक्षा आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे हे माझे प्राथमिक उद्दिष्ट आहे, असे जहाँगीर खान यांनी सांगितले. या प्रदेशाचा सोनार फालता म्हणून विकास झालेला पाहण्याचे माझे स्वप्न आहे. मुख्यमंत्री फालतासाठी एक विशेष विकास पॅकेज देत आहेत, जे या प्रदेशाच्या हितासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळेच मी माझे नामांकन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय फालताची प्रगती, शांतता आणि जनहित लक्षात घेऊन घेण्यात आला आहे.

### पराभवाच्या भीतीने माघार : मुख्यमंत्री



**जहाँगीर खान यांना निवडणुकीसाठी मतदान प्रतिनिधीही मिळत नसल्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली, असा दावा फालतामधील निवडणूक प्रचारादरम्यान माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी केला. पराभव डोळ्यांपुढे दिसत आहे. त्यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. म्हणून त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली आह, असा टोला त्यांनी लगावला.**

# 'इबोला'मुळे १३१ रुग्णांचा मृत्यू

**जिनेव्हा :** पूर्व काँगोमध्ये इबोलाच्या बुंदीबुग्यो विषाणुच्या प्रादुर्भावामुळे मृत रुग्णांची संख्या १३१ वर पोहोचली आहे, तर संशयित रुग्णांचा आकडा ५०० पेक्षा अधिक असल्याची माहिती जागतिक आरोग्य संघटनेने निवेदनातून दिली आहे. काँगोचे सार्वजनिक आरोग्य मंत्री, सॅम्युअल रॉजर काम्बा यांनी मंगळवारी सांगितले की, इबोला विषाणुमुळे मृत रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. २४ तासांत मृत रुग्णांचा आकडा वाढून १३१ वर पोहोचला आहे. बाधित रुग्ण संख्या ५१३ वर गेली आहे. इबोला रोगाचा एक दुर्मिळ प्रकार असलेल्या बुंदीबुग्यो विषाणूमुळे प्रादुर्भाव झाला आहे. यावर कोणतेही मान्यताप्राप्त उपचार किंवा लस उपलब्ध नाहीत. देशात आतापर्यंत २० हून अधिक इबोलाच्या साथी आल्या, परंतु बुंदीबुग्यो विषाणू आढळण्याची ही तिसरी वेळ आहे. आता बुनिया, गोमा, मोंगबवालू, बुटेम्बो आणि न्याकुंडे येथे रुग्ण आढळले आहेत.

# केजरीवाल, सिसोदियांसह आप नेत्यांना नोटीस

## उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणात चार आठवड्यांत मागितले उत्तर

**नवी दिल्ली, १९ मे**

न्या. स्वर्णकांत शर्मा यांनी स्वतःहून दाखल केलेल्या फौजदारी अवमानना प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, खासदार संजय सिंह आणि आपच्या इतर नेत्यांना नोटीस बजावली आहे.

या सर्वांवर २० एप्रिलला न्या. शर्मा यांच्या न्यायालयाने दारू धोरण प्रकरणात न्यायाधीशांनी माघार घ्यावी, यासाठीची याचिका फेटाळल्यानंतर न्यायालयावर बहिष्कार टाकत सोशल मीडिया पोस्ट, व्हिडीओ आणि पत्रांद्वारे अपमानजनक आणि बदनामीकारक टीका केली, असा आरोप आहे. न्या. नवीन चावला आणि न्या. रवींद्र दुदेजा यांच्या खंडपीठाने सर्व आरोपींना त्यांचे उत्तर दाखल करण्यासाठी चार आठवड्यांची मुदत दिली आहे. न्यायालयाने या प्रकरणात न्यायालयीन मित्राची नियुक्ती केली असून, सर्व



इलेक्ट्रॉनिक नोंदी जतन करण्याचा आदेश दिला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

आपच्या नेत्यांवर न्यायमूर्तींच्या निःपक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचा आणि न्यायालयाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी अपमानास्पद भाषा वापरल्याचा आरोप आहे. न्यायालयाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. न्या. स्वर्ण कांता शर्मा यांनी म्हटले की, उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात निर्दोष सुटलेल्या काही आरोपींनी सोशल मीडियावर त्यांच्या आणि न्यायालयाच्या विरोधात केलेल्या अत्यंत आक्षेपार्ह, बदनामीकारक आणि द्वेषपूर्ण टिप्पण्यांवर मी गप्प बसू शकत नाहीत. माझ्या निदर्शनास आले आहे की, काही प्रतिवादी माझ्या आणि या न्यायालयाच्या विरोधात अत्यंत द्वेषपूर्ण, अवमानकारक आणि बदनामीकारक मजकूर पोस्ट करत आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### तेजा सज्जाचा 'हनु-मॅन' ३डी मध्ये



**मुंबई :** तेलुगू सुपरहिरो चित्रपट 'हनु-मॅन' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परत येणार आहे. यावेळी हा चित्रपट ३डी फॉरमॅटमध्ये प्रदर्शित केला जाईल. हा चित्रपट २५ जून रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटाने यापूर्वीच प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आणि आता तो नवीन रूपात परत येत आहे, असे निर्मात्यांनी पोस्टरसह समाज माध्यमांवर माहिती शेअर करीत म्हटले आहे. चित्रपटाची कथा काल्पनिक गाव अंजनाद्रीवर आधारित आहे. तिथे हनुमंथु नावाचा एक सामान्य तरुण भगवान हनुमानाची दिव्य शक्ती प्राप्त केल्यानंतर लोकांचे रक्षण करतो. यात तेजा व्यतिरिक्त अमृता अय्यर, वरलक्ष्मी सरथकुमार, समुद्रकानी आणि विनय राय यांनीही भूमिका साकारल्या आहेत.

### गोविंदाच्या बाऊन्सरने पापराझीला दिला धक्का?

**मुंबई :** गोविंदा नुकताच एका कार्यक्रमात सहभागी झाला होता. तिथे प्रचंड गर्दीमध्ये त्यांच्या बाऊन्सर आणि एका पापाराझीमध्ये वाद झाला.



बाऊन्सरवर कथितरीत्या धक्का दिल्याचा आणि गैरवर्तनाचा आरोप लावण्यात आला. प्रकरण वाढत असल्याचे पाहून गोविंदाने स्वतः मध्यस्थी करून दोन्ही पक्षांना शांत केले. कार्यक्रम संपल्यानंतर गोविंदा तिथून परतत होता आणि मोठ्या संख्येने चाहत्यांनी त्याला घेरले असताना हा प्रसंग घडला. गर्दी नियंत्रित करत असताना बाऊन्सरने अभिनेत्यासाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान काही लोकांना धक्का लागला. यात पापाराझी देखील होते. यानंतर घटनास्थळी उपस्थित लोकांनी विरोध दर्शवला आणि वाद सुरू झाला.

### 'मै वापस आऊंगा'चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई :** 'मै वापस आऊंगा' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून यात प्रेम, ओढ आणि एका अपूर्ण कथेची झलक दिसते. कथेची सुरुवात दिलजीत आणि नसीरुद्दीन शाह यांच्या पात्रांपासून होते.



इम्तियाज अली दिग्दर्शित हा चित्रपट पुढच्या महिन्यात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट १२ जून रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, गीत इरशाद कामिल यांनी लिहिले आहे. रहमान यांच्या संगीताची जादू चित्रपटाच्या ट्रेलरमध्येही अनुभवायला मिळते. या प्रेमकथेचा शेवट वेदनांनी भरलेला दाखवला आहे. दिलजीत, नसीरुद्दीन, वेदांग रैना आणि शर्वरी यांची यात भूमिका आहे.



# उज्जैनी एक्सप्रेसचे तीन डबे घसरले

**हृषीकेश, १९ मे**

ऋषिकेशच्या योग नगरी रेल्वे स्थानकाजवळील खंड गाव परिसरात सोमवारी रात्री उज्जैनी एक्सप्रेसचे तीन डबे रुळावरून घसरले. सुदैवाने, गाडीत एकही प्रवासी नव्हता, अन्यथा एक मोठी दुर्घटना घडू शकली असती. या घटनेनंतर, स्थानिक रहिवासी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये केवळ अपघातच नव्हे, तर त्यामागील परिस्थिती हा चर्चेचा विषय बनला आहे.

हा अपघात तांत्रिक बिघाड आणि ब्रेक निकामी झाल्यामुळे घडला, असे स्पष्टीकरण रेल्वेने दिले आहे. परंतु, स्थानिक रहिवाशांना हे पटत नाही. लोकांचे म्हणणे आहे की, जेव्हा गाडी देखभाल किंवा शंटिंगसाठी हलवली जाते, तेव्हा इंजिन सहसा एकटे किंवा मर्यादित रॅकसह हलवले जाते. त्यामुळे, डब्यांसहित संपूर्ण गाडी रुळांवर असणे, हा अनेक प्रश्न निर्माण करतो. या घटनेनंतर सर्वाधिक चर्चेचा विषय लोको पायलटची उपस्थिती हा होता. अपघाताच्या वेळी चालक इंजिनमध्ये उपस्थित होता की नाही, याबद्दल रेल्वेने रात्री उशिरापर्यंत कोणतीही माहिती दिली नाही. (वृत्तसंस्था)

# पासपोर्ट वाद प्रकरणी सुर्जेवालांना समन्स

**गुवाहाटी, १९ मे**

पासपोर्ट वादावरून आसाम पोलिसांच्या गुन्हे शाखेने काँग्रेस खासदार रणदीपसिंह सुर्जेवाला यांना २३ मे रोजी गुवाहाटी येथील गुन्हे शाखा पोलिस ठाण्यात हजर राहण्यासाठी समन्स बजावले आहे. हे प्रकरण आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान सरमा यांच्याशी संबंधित कथित पासपोर्ट वादाशी संबंधित आहे.

काँग्रेस नेते पवन खेडा यांनी चौकशीदरम्यान सुर्जेवाला यांचे नाव घेतल्याचा दावा सूत्रांनी केला. यानंतर तपास यंत्रणांनी या प्रकरणाचा अधिक सखोल तपास सुरू केला आहे. या वादाशी संबंधित मोठ्या कटात गौरव गोगोई आणि रणदीपसिंह सुर्जेवाला यांचा कथित सहभाग होता का, याचाही तपास यंत्रणा करीत आहेत. आसाम पोलिसांचे म्हणणे आहे की, सर्व बाबींचा तपास सुरू असून, तथ्यांच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल.

**पवन खेडांनी काय आरोप केले?**

वास्तविक पाहता, आसाम विधानसभा निवडणुकीपूर्वी राजधानी दिल्लीत एका पत्रपरिषदेत काँग्रेस नेते पवन खेडा यांनी आरोप केला की, मुख्यमंत्री सरमा यांच्या पत्नीकडे यूएई, अँटिग्वा आणि इजिप्त या तीन देशांचे पासपोर्ट आहेत तसेच दुबईतील मालमत्तांसह काही परदेशी मालमत्ता अधिकृत कागदपत्रांमध्ये उघड करण्यात आल्या नाहीत. त्यांनी असाही आरोप केला की, अमेरिकेतील वायोमिंग येथे नोंदणीकृत असलेली एक कंपनी सरमा यांच्याशी संबंधित असून, त्यात हजारो कोटी डॉलर्सच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशी घुसखोरांवर 'सर्जिकल स्ट्राईक'

## बेहरामपाडा येथे कारवाई; अनधिकृत बांधकामांवर हातोडा

**मुंबई, १९ मे**

मुंबईतील रेल्वे जमिनी आणि उपनगरांना विळखा घालणाऱ्या अनधिकृत घुसखोरांविरोधात अखेर रेल्वे प्रशासन आणि मुंबई पोलिसांनी संयुक्तपणे मोठी मोहीम उघडली आहे. वांद्रे टर्मिनस परिसरातील बेहरामपाडा भागातील 'गरीबनगर' येथील बेकायदा आणि अतिक्रमित झोपड्यांवर आज प्रशासनाने धडक कारवाई करत शेकडो अनधिकृत बांधकामे भुईसपाट केली.

या धडक कारवाईनंतर भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आज प्रत्यक्ष घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. वांद्रे टर्मिनस येथील बांगलादेशी घुसखोरांची अतिक्रमणे हटवल्याबद्दल रेल्वे प्रशासन आणि पोलिसांचे मनापासून आभार, अशा शब्दांत त्यांनी ट्विट करत या कारवाईचे स्वागत केले आहे.



**सुरक्षेला आणि रेल्वे प्रवाशांना मोठा धोका**

वांद्रे रेल्वे स्थानक आणि टर्मिनसला लागून असलेल्या बेहरामपाडा आणि गरीबनगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून अनधिकृत झोपड्यांचे साम्राज्य उभे राहिले होते. या अतिक्रमणांमुळे रेल्वेच्या सुरक्षेला तर धोका निर्माण झाला होताच, पण वांद्रे टर्मिनसवरून प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांनाही या गर्दी आणि गुन्हेगारी प्रवृत्तींचा नाहक त्रास सहन करावा लागत होता. या भागात मोठ्या प्रमाणावर संशयास्पद आणि बेकायदेशीर नागरिक राहत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. अखेर आज रेल्वे आणि पोलिसांनी कडेकोट बंदोबस्तात या 'व्होट बँक' आणि अनधिकृत वस्त्यांवर थेट हातोडा चालवला. मुंबईच्या मध्यवर्ती आणि संवेदनशील रेल्वे स्थानकांच्या परिसरातील ही बस्तान मांडलेली अवैध बांधकामे साफ झाल्यामुळे मुंबईकरांनी आणि प्रवाशांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. मुंबईतील इतर रेल्वे जमिनींवर झालेल्या अशाच प्रकारच्या घुसखोरीवरही अशीच कडक कारवाई व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. (वृत्तसंस्था)

### कडेकोट बंदोबस्तात कारवाई

ही कारवाई अत्यंत संवेदनशील भागात असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुंबई पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाचा प्रचंड मोठा ताफा घटनास्थळी तैनात करण्यात आला होता. स्थानिक पातळीवरून या कारवाईला विरोध करण्याचा प्रयत्न झाला, मात्र पोलिसांनी आक्रमक पवित्रा घेत सर्व अनधिकृत बांधकामे जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केली.

# क्यूबाच्या तीन संस्था, अधिकाऱ्यांवर निर्बंध

**वॉशिंग्टन, १९ मे**

अमेरिकेने क्युबाचे ११ अधिकारी आणि तीन सरकारी संस्थांवर निर्बंध लादले आहेत. परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी यासंदर्भातील माहिती दिली.

अमेरिका आपल्या राष्ट्रीय सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी कठोर उपाययोजना करत असल्याचे रुबियो यांनी निवेदन म्हटले आहे. त्यांनी सांगितले की, क्युबाचे कम्युनिस्ट सरकार आणि लष्कराला अवैध आर्थिक संसाधनांपासून वंचित ठेवणे हा या निर्बंधांचा उद्देश आहे. हे निर्बंध राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी १ मे २०२६ रोजी स्वाक्षरी केलेल्या कार्यकारी आदेशा अंतर्गत जाहीर करण्यात आले. क्युबामधील दडपशाहीसाठी आणि अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा व परराष्ट्र धोरणाला धोका निर्माण करण्यासाठी जबाबदार असलेल्यांना लक्ष्य करतात. निर्बंध घालण्यात आलेल्या ११ अधिकाऱ्यांमध्ये क्युबा सरकार आणि लष्कराशी संबंधित अनेकांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### लष्करी संघर्ष उपाय नाही

**ओस्लो** : आजच्या काळात संघर्ष हा कोणत्याही समस्येवर उपाय नाही. संवाद आणि मुत्सद्देगिरीने समस्यांचे निराकरण करायला हवे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नॉर्वे येथे संयुक्त पत्रपरिषदेत संबोधित करताना म्हणाले. मध्यपूर्वेतील तणाव आणि रशिया-युक्रेन युद्धावर बोलताना मोदी म्हणाले, एकतर्फी लष्करी कारवाईतून चिरस्थायी शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही. नियमांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा सध्या अभाव आहे. कोणताही प्रश्न केवळ लष्करी संघर्षातून सोडविला जाऊ शकत नाही. युक्रेन असो वा पश्चिम आशिया, संघर्ष लवकर संपुष्टात आणून शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रत्येक प्रयत्नांना आमचा पाठिंबा आहे. वाढत्या जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी जागतिक संस्थांमध्ये सुधारणा आवश्यक आहे.



### ...ी मुंबई विमानतळाचे नाव ...लण्याची मागणी फेटाळली

**...दिल्ली** : नवी मुंबईतील विमानतळाच्या ...करणावर महाराष्ट्र सरकारने पाठवलेल्या ...ावावर कालमर्यादेत निर्णय घेण्याचा ...यि केंद्र सरकारला द्यावा, अशी मागणी ...णारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने ...ळवारी फेटाळली. महाराष्ट्र सरकारने नवी ...ई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव बदलून ...कनेता डी. बी. पाटील नवी मुंबई ...तरराष्ट्रीय विमानतळ' असे ...याबाबतचा प्रस्ताव पाठवला होता. याचा ... धोरणनिर्मितीमध्ये हस्तक्षेप करण्यासारखे ...ल, असे सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख ...णे न्या. जायमाल्या बागची तसेच न्या. ...ल एम. पांचोली यांच्या न्यायासनाने ...शझोत सामाजिक संघटनेच्या वतीने ...तवाद करणाऱ्या वकिलाला सांगितले.

### ...ठ महिन्यांच्या चिमुकलीला ...ईने पाजले ॲसिड

**...ाडी (राजस्थान)** : भिवाडी परिसरात ...ने आठ महिन्यांच्या मुलीला ॲसिड ...ल्याचा गंभीर आरोप करण्यात आला ...े. या घटनेनंतर चिमुकलीची प्रकृती ...ंत खालावली असून तिला तातडीने ...ालयात दाखल करण्यात आले. सध्या ...यावर अलवर येथील बाल रुग्णालयात ...ार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार ...टना भिवाडीतील कॅप्टन चौक परिसरात ...ली. सुरुवातीला मुलीवर स्थानिक ...ालयात उपचार करण्यात आले, मात्र ...ती गंभीर झाल्याने तिला संध्याकाळी ...वर येथे हलवण्यात आले. डॉक्टरांनी ...ल्या माहितीनुसार, बाळाच्या शरीरात तीव्र ...र्ग आणि रक्तस्त्राव होत असून तिची ...ती चिंताजनक आहे. तिला सतत श्वास ...ास अडचण येत असून ऑक्सिजनची ...ळीही स्थिर राहत नाही. मुलीचे नाव ...्या असून ती आठ महिन्यांची आहे. ...यावर उपचार सुरू आहेत आणि वैद्यकीय ...क तिच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून ...े, असे रुग्णालयातील डॉक्टरांनी ...ितले. पत्नीनेच मुलीला ॲसिड पाजल्याचे ...जले. कामावर असताना बहिणीचा फोन ...यानंतर तातडीने घरी पोहोचले असता ...स्थिती गंभीर असल्याचे समजले.

### ...ाबी गायिका इंदर कौर ...ची हत्या

**...याना** : पंजाबच्या संगीत क्षेत्राला ...रवून सोडणारी एक धक्कादायक घटना ...र आली आहे. इंदर कौर नावाने ...ळखल्या जाणाऱ्या प्रसिद्ध पंजाबी गायिका ...ंदर कौर यांचे सहा दिवसांपूर्वी अपहरण ...ण्यात आले. त्यानंतर त्यांची निर्घृणपणे ...ा करण्यात आली आहे. त्यांचा मृतदेह ...ा कालव्यात सापडला आहे. एकतर्फी ...तून ही हत्या करण्यात आल्याचे ...ण्यात येत आहे. गायिका इंदर यांचा ...क जोतिंदर सिंग याने दाखल केलेल्या ...ारीनुसार, इंदर कौर १३ मे रोजी रात्री ...रे ८:३० वाजता घरगुती सामान खरेदी ...्यासाठी तिच्या फोर्ड फिगो कारमधून ...ारात गेली होती.

# महाराष्ट्राला तीव्र पाणीटंचाईची झळ

## ६३३ गावे, १६५२ वाड्यांना ७०६ टँकर्सने पाणीपुरवठा

◆ **मुंबई,१९ मे**

राज्यात मे महिन्यातील उन्हाचा पारा चांगलाच चढला असून, धरणांमधील खालावलेला जलसाठा आणि कोरड्या पडत चाललेल्या विहिरींमुळे ग्रामीण भागाला तीव्र पाणीटंचाईचे चटके बसू लागले आहेत. राज्यातील तब्बल १५ जिल्ह्यांमध्ये पाण्याचे संकट गडद झाले असून, ११ ते १७ मे २०२६ या आठवड्याच्या अधिकृत अहवालानुसार, सध्या ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमधील नागरिकांची तहान भागवण्यासाठी प्रशासनाला ७०६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. यामध्ये ३३ शासकीय तर ६६९ खाजगी टँकर्सचा समावेश आहे. पुणे, सातारा, सांगली आणि सोलापूरसह संपूर्ण पुणे विभागात उन्हाच्या तीव्रतेमुळे विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत मोठी घसरण झाली आहे. पुणे विभागात सध्या १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. डोंगराळ आणि टंचाईग्रस्त



संग्रहित

भागांमध्ये विहिरींचे अधिग्रहण करून पर्यायी जलस्रोतांचा शोध घेतला जात आहे. आगामी काळात तापमान आणखी वाढल्यास टँकर्सची संख्या वाढवण्याची तयारी जिल्हा प्रशासनाने ठेवली आहे.

राज्यात सर्वाधिक भयावह परिस्थिती मराठवाड्यात (छत्रपती संभाजीनगर विभाग) आहे. या विभागात अवघ्या १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी राज्यातील सर्वाधिक म्हणजेच २४४ टँकर्स धावत आहेत. यावरून मराठवाड्यातील जलसंकटाची दाहकता स्पष्ट होते. याशिवाय ठाणे विभागात १५५, तर नाशिक विभागात १५९ टँकर्सद्वारे पाणी पुरवले जात आहे.

(तभा वृत्तसेवा)

### अमरावती टँकरग्रस्त

विदर्भाचा विचार केल्यास यंदा नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये सध्या पाणीसाठा समाधानकारक असल्याने एकाही गावामध्ये टँकर सुरू करण्याची आवश्यकता भासलेली नाही. मात्र, पश्चिम विदर्भातील अमरावती विभागात तीव्र पाणीटंचाई जाणवू लागली आहे. या विभागात सध्या १७ गावांची तहान भागवण्यासाठी १७ टँकर्स सुरू करण्यात आले आहेत.

### आगामी काळात टँकर्स वाढणार

पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी केवळ टँकर्सवर अवलंबून न राहता ग्रामपंचायती आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने विहिरींचे अधिग्रहण, जलसाठ्यांचे सूक्ष्म नियोजन आणि तात्पुरत्या पूरक पाणीपुरवठा योजनांवर भर दिला जात आहे. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात आणि जूनच्या पहिल्या पंधरवड्यात उन्हाचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन, टंचाईग्रस्त भागांत तातडीने अतिरिक्त टँकर्स मंजुरीचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत.



# कोहिनूर नको, लंडनहून वाग्देवी आणा

### भोजशाला याचिकाकर्त्यांची मागणी

◆ **इंदूर, १९ मे**

लंडनच्या संग्रहालयातील वाग्देवीची मूर्ती कोहिनूर हिऱ्यापेक्षा जास्त महत्त्वाची आहे. ती देशात परत आणा, अशी मागणी मध्यप्रदेश उच्च न्यायालयातील खटला जिंकल्यानंतर आता भोजशालेच्या याचिकाकर्त्यांनी मंगळवारी केली.

वादग्रस्त भोजशाला-कमल मौला मशीद संकुल हे देवी सरस्वतीला समर्पित असलेले मंदिर आहे, असा निर्णय मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. त्याच वेळी या ठिकाणी मुस्लिम समुदायाला शुक्रवारी नमाज अदा करण्याची परवानगी देणारा, भारतीय पुरातत्त्व विभागाचा दशकांहून जुना आदेश न्यायालयाने रद्दबातल ठरवला.

वाग्देवीची मूर्ती परत आणण्याच्या मागणीसाठी केंद्र सरकार, पुरातत्त्व विभाग आणि मध्यप्रदेश सरकारला निवेदन सादर केले आहे, अशी माहिती याचिकाकर्त्यांपैकी एक कुलदीप तिवारी यांनी मंगळवारी वृत्तसंस्थेला दिली. वसाहतकाळात ब्रिटिशांनी वाग्देवीची मूर्ती नेली होती, असा दावा त्यांनी केला.

(वृत्तसंस्था)

### मूर्ती परत आणणे कठीण नाही

केंद्र सरकारने इच्छाशक्ती दाखवल्यास वाग्देवीची मूर्ती ब्रिटन येथून परत आणणे कठीण नाही. उच्च न्यायालयाने भोजशालेला वाग्देवी मंदिर घोषित केल्यानंतर राजनयिक प्रयत्न केले जात आहेत, असे तिवारी यांनी सांगितले.

# इराणवरील हल्ल्याची योजना पुढे ढकलली

## आखाती देशांच्या आवाहनामुळे घेतला निर्णय, ट्रम्प यांची स्पष्टोक्ती, शांतता करारासाठी शेवटची संधी

◆ **वॉशिंग्टन, १९ मे**

कतार, सौदी अरेबिया आणि यूएई यांसारख्या आखाती देशांच्या आवाहनामुळे आणि सुरू असलेल्या वाटाघाटींमुळे इराणवर हल्ला करण्याची योजना पुढे ढकलण्यात आली. शांतता करार करण्यासाठी त्यांच्याकडे शेवटची संधी आहे. जर कोणताही करार झाला नाही, तर अमेरिकन सैन्य क्षणात इराणवर मोठा हल्ला करण्यासाठी पूर्णपणे तयार असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे.

दोन्ही बाजूंमध्ये सध्या वाटाघाटी सुरू आहेत, इराणने शांतता करारासाठी नवीन प्रस्ताव पाठविला आहे. त्यांनी आणि आमच्या बहुतांश अटी मान्य केल्या. इराणच्या प्रस्तावावर अमेरिका विचार करीत आहे. इराणवर मंगळवारी मोठा हल्ला करण्याची योजना होती. मात्र, आखातातील मित्र राष्ट्रांनी हल्ल्याची योजना पुढे ढकलण्याचे आवाहन केले, त्यामुळे सध्या इराणवर हल्ला करण्यात येणार नाही. जर कोणताही






करार झाला नाही, तर संघर्षविरामाला स्थगिती दिली जाईल आणि इराणच्या हाती विध्वंसाशिवाय काहीही येणार नाही. मध्यपूर्वेत तैनात असलेल्या अमेरिकन सैन्याला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. समाधानकारक करार झाला नाही, तर क्षणात इराणवर ताकदीने हल्ला केला जाईल, असा इशारा ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिला आहे.

(वृत्तसंस्था)

### ऊर्जा साठे, पायाभूत सुविधा होणार नष्ट

इराणसाठी वेळ संपत चालली आहे. त्यांनी शांतता करारासाठी त्वरित प्रतिसाद द्यावा, अन्यथा त्यांचे ऊर्जा साठे, पायाभूत सुविधा आणि त्यांच्या नेत्यांची ठिकाणे सर्व काही नष्ट होईल. यावेळी हल्ला झाल्यास इराणमध्ये काहीही शिल्लक राहणार नाही. संघर्षविराम कधीही संपुष्टात येऊ शकते.



आम्ही इराणला खूप वेळ दिला आहे. मित्र राष्ट्रांच्या आवाहनामुळेच मंगळवारी होणारा हल्ला पुढे ढकलला, असे ट्रम्प म्हणाले.

### पाकिस्तानचे आठ हजार सैनिक सौदीत दाखल

शांतता चर्चेत मध्यस्थीच्या भूमिकेत असलेल्या पाकिस्तानने आपले आठ हजार सैनिक सौदी अरबमध्ये पाठविले आहेत. शांततेच्या चर्चेदरम्यान गुप्तपणे युद्धाची तयारी सुरू असल्याचे यातून दिसून येते. पाकिस्तानने सैन्यासह लढाऊ विमानांची एक तुकडी आणि एक अत्याधुनिक हवाई संरक्षण प्रणाली सौदीत तैनात केली आहे. तीन सुरक्षा अधिकारी आणि दोन सरकारी सूत्रांनी या तैनातीला दुजोरा दिला आहे. तथापि, पाकिस्तानच्या लष्करी आणि परराष्ट्र मंत्रालयांकडून तसेच सौदीकडून यासंदर्भात अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

# अमरावती, वर्धा सर्वाधिक 'हॉट'

## २२ मे पर्यंत ऑरेंज अलर्ट

◆ **नागपूर, १९ मे**

विदर्भात सूर्याचा प्रकोप दिवसेंदिवस वाढतच आहे. मंगळवारी अमरावती आणि वर्धा शहराची महाराष्ट्रात सर्वाधिक उष्ण म्हणून नोंद झाली. या दोन्ही शहरांमध्ये अनुक्रमे ४६.८ आणि ४६.५ अंश इतके तापमान नोंदविण्यात आले. हवामान खात्याने येत्या २२ मे पर्यंत अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यासाठी उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

पुढील काही दिवस विदर्भासह महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायमच नाही, तर त्यात आणखी वाढ होणार असल्याचा इशाराही हवामान खात्याने दिला आहे. या वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताच्या रुग्णांमध्येही सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र आहे.



**विदर्भातील अन्य शहरांमधील तापमान**

| | |
|---|---|
| अकोला | ४६.० |
| नागपूर | ४५.५ |
| यवतमाळ | ४५.४ |
| चंद्रपूर | ४५.२ |
| गडचिरोली | ४४.० |
| गोंदिया | ४३.८ |
| वाशिम | ४३.५ |
| भंडारा | ४३.० |
| बुलढाणा | ४१.६ |

(तभा वृत्तसेवा)

# सर्व प्रमुख औषधी केंद्रे सुरू

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

ई-फार्मसीविरोधात ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सने दिलेल्या देशव्यापी बंदच्या आवाहनानंतरही, देशभरातील सर्व प्रमुख फार्मसी चेन, रुग्णालयांमधील मेडिकल स्टोअर्स, जन औषधी केंद्रे आणि अमृत फार्मसी आऊटलेट्स २० मे रोजी सुरू राहतील, असे सूत्रांनी मंगळवारी सांगितले.

याव्यतिरिक्त अनेक राज्यस्तरीय फार्मसी संघटनांनी या प्रस्तावित देशव्यापी संपातून आधीच माघार घेतली आहे. ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सच्या प्रतिनिधींनी अलिकडेच राष्ट्रीय औषध नियामक मंडळाची भेट घेऊन ई-फार्मसीच्या कार्यपद्धती आणि नियमनाशी संबंधित चिंता व्यक्त केल्यानंतर हा निर्णय घेतला. उपस्थित केलेल्या मुद्यांचा सक्रियपणे आढावा घेतला जात आहे आणि रिटेल फार्मसी क्षेत्रातील भागधारकांच्या रास्त चिंता दूर करण्यासाठी या क्षेत्राचे नियमन करणाऱ्या नियामक चौकटीची तपासणी केली जात आहे, असे आश्वासन नियामक मंडळाने त्यांना दिले असल्याचे सूत्रांनी सांगितले. पश्चिम बंगाल, केरळ, पंजाब, महाराष्ट्र, कर्नाटक, हरयाणा, उत्तर प्रदेश, लडाख, गुजरात, छत्तीसगड, सिक्कीम आणि उत्तराखंड येथील किरकोळ औषध विक्रेत्यांच्या संघटनांनी संपात सहभागी होणार नाही तसेच प्रस्तावित आंदोलनाच्या दिवशी जनतेला औषधांच्या उपलब्धतेत कोणताही व्यत्यय येणार नसल्याचे त्यांनी स्वेच्छेने लेखी आश्वासन दिले आहे.

त्यांच्या मते, देशभरातील अनेक किरकोळ औषध विक्रेत्यांच्या संघटनांनी जनहित आणि औषधांची अखंड उपलब्धता सुनिश्चित करण्याची गरज लक्षात घेऊन प्रस्तावित एकदिवसीय संपात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. ई-फार्मसीच्या कामकाजासंबंधीच्या चिंतांच्या पार्श्वभूमीवर एआयओसीडीने संपाची हाक दिल्याचे वृत्त आहे.

(वृत्तसंस्था)

### पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैशांची वाढ

**नवी दिल्ली** : मंगळवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैशांची वाढ करण्यात आली, एका आठवड्यापेक्षा कमी काळातील ही दुसरी दरवाढ आहे. दिल्लीत पेट्रोलचा दर ९७.७७ रुपये प्रति लिटरवरून ९८.६४ रुपये प्रति लिटर करण्यात आला आहे. उद्योग क्षेत्रातील सूत्रांनुसार, डिझेलचा दर आता ९०.६७ रुपयांऐवजी ९१.५८ रुपये प्रति लिटर झाला आहे. मुंबईत पेट्रोलचा दर ९१ पैशांनी वाढून १०७.५९ रुपये प्रति लिटर आणि डिझेलचा दर ९४ पैशांनी वाढून ९४.०८ रुपये प्रति लिटर झाला आहे. कोलकातामध्ये पेट्रोलच्या दरात सर्वाधिक ९६ पैशांची वाढ होऊन तो १०९.७० रुपये प्रति लिटर झाला, तर डिझेलचे दर ९४ पैशांनी वाढून ९६.०७ रुपये प्रति लिटर झाले.

# मांढरेंची तल्लख स्मरणशक्ती; नीट पेपर फोडण्याची 'युक्ती'

### सर्व प्रश्न तोंडपाठ; पोलिसांनी टेकले हात

◆ **पुणे, १९ मे**

सीबीआयच्या तपासात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. संशयित आरोपी मनीषा मांढरेने बायॉलॉजीचा पेपर फोडताना कोणत्याही प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेचा किंवा मोबाईलचा वापर केला नसल्याचा खळबळजनक खुलासा झाला आहे. मनीषाने तल्लख स्मरणशक्तीचा वापर अनैतिक मार्गाने पैसे कमाविण्यासाठी केल्याचे उघड झाले आहे. दरम्यान, या गुन्ह्याचे मूळ आणि तांत्रिक दुवे शोधण्यासाठी न्यायालयाने मनीषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.

संशयित आरोपी मनीषा मांढरेने पेपर फोडण्यासाठी कोणताही कागद किंवा मोबाईल न वापरता थेट आपल्या तल्लख स्मरणशक्तीचा वापर केल्याचा खुलासा झाला आहे. तिला परीक्षेचे सर्व प्रश्न तोंडपाठ असल्याने



तिने मागे कोणताही तांत्रिक किंवा प्रत्यक्ष पुरावा सोडलेला नाही. त्यामुळे सध्या सीबीआयसारखी मोठी तपास यंत्रणाही चक्रावून गेली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणी शिवराज मोटेगावकरच्या तपासात धक्कादायक माहिती समोर येत आहे. पुत्र प्रेमापोटी मोटेगावकरने नीटचा पेपर फोडला असावा, असा संशय बळावल्याने सीबीआयने त्याच्या मुलाचीही चौकशी सुरू केली आहे. शिवराजने कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून कोट्यवधींची संपत्ती जमवली आहे. तो स्व:तचे मेडिकल कॉलेज काढावे, असे स्वप्न बाळगून होता. मुलगा डॉक्टर झाल्यास त्याच्या नावे मोठे हॉस्पिटल सुरु करू, अशी त्याची योजना होती. त्यामुळे त्याने यावर्षी बारावीची परीक्षा देणाऱ्या स्व:ताच्या मुलाला नीटच्या परीक्षेला बसवले. मुलाला नीट परीक्षेत चांगले गुण मिळाल्यास आपले स्वप्न पूर्ण होईल, अशी त्याला आशा होती. परंतु, आता त्याचे स्वप्न अपूर्णच राहणार आहे.

(वृत्तसंस्था)

### कटानुसारच कुलकर्णी-मांढरे एनटीएच्या पॅनेलमध्ये

सीबीआयच्या तपासात नीट पेपरफुटी प्रकरणाचा मास्टरमाईंड शिवराज मोटेगावकर असल्याचे उघड झाले आहे. त्यानेच पी.व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरे या दोघांची एनटीएच्या पॅनेलमध्ये वर्णी लावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मोटेगावकरने रचलेल्या कटानुसार मनीषा मांढरेची बायॉलॉजी आणि कुलकर्णीची केमिस्ट्री या विषयांचे पेपर सेट करण्यासाठी निवड करण्यात आली होती. जेणेकरून हे दोघेही थेट मोटेगावकरपर्यंत पेपर पोहोचवू शकतील.

# मतदारयादीत नाव नोंदणी, दुरुस्ती करणे सोपे

### ...जेल्हा स्तरावर मदत ...क्ष स्थापन

### ...ाजपासून ...सआयआर कार्यक्रम

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

१६ राज्यांसह तीन केंद्रशासित ...देशांमध्ये २० मेपासून मतदार ...द्यांचा विशेष सखोल सुधारणा ...सआयआर) कार्यक्रम सुरू होणार ...ाहे. या सर्व ठिकाणी निवडणूक ...योगाने जिल्हा स्तरावर मदत कक्ष ...ापन केले आहे. मतदारयाद्या ...र्णपणे अचूक आणि नेमक्या ...साव्यात तसेच या प्रक्रियेदरम्यान ...र्व पात्र मतदारांचा यादीत समावेश ...ईल आणि कुणीही वगळले जाणार ...ाही, हे सुनिश्चित करण्यासाठी



आयोगाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र जारी केले आहे.

विशेष सघन पुनरावलोकनाच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिझोराम, ओडिशा, मणिपूर, सिक्कीम, आंध्र कर्नाटक, त्रिपुरा, नागालँड, झारखंड, मेघालय, महाराष्ट्र, दिल्ली, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव यांचा समावेश आहे. सर्व पात्र नागरिकांचा, विशेषतः दिव्यांग व्यक्ती, स्थलांतरित आणि ज्येष्ठ मतदारांचा मतदार यादीत समावेश

### मदत कक्ष कोणत्या सेवा पुरवतील?

निवडणूक आयोगाने पुढे सांगितले की, मदत कक्ष विशेष सखोल पुनरावलोकनाची अंतिम मुदत, पात्रतेचे निकष आणि नोंदणी, दुरुस्ती किंवा वगळण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांविषयी माहिती देतील. ते मतदारांना त्यांच्या मागील नोंदी शोधण्यात आणि जोडण्यात मदत करतील तसेच ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतीने गणना अर्ज भरण्यास आणि सादर करण्यास साहाय्य करतील. स्थलांतरित मतदारांना त्यांचे सध्याचे आणि मागील विधानसभा मतदारसंघ ओळखण्यासही मदत करतील; जेणेकरून त्यांची नोंदणी योग्य ठिकाणी झाली आहे, याची खात्री करता येईल.

**मतदारांना सहज मिळेल माहिती**

याव्यतिरिक्त जनजागृती वाढवण्यासाठी माहिती, शिक्षण आणि संवाद साहित्य स्थानिक भाषांमध्ये प्रदर्शित केले जाईल. मतदारांना त्यांची माहिती सहज मिळविता यावी आणि ती मागील करण्यासाठी मदत कक्षावर प्रशिक्षित कर्मचारी तैनात केले जातील. शिवाय हे मदत कक्ष निवडणूक आयोगाचा हेल्पलाईन क्रमांक १९५० आणि त्याचे सर्वसमावेशक मोबाईल ॲप्लिकेशन ईसीआय-नेटच्या वैशिष्ट्यांविषयी माहिती देखील

# न्या. यशवंत वर्मांवरील अहवाल लोकसभा सभापतींकडे सादर

### संसदेत होणार सादर

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

न्या. यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी बेहिशेबी रोकड सापडल्याच्या प्रकरणामुळे त्यांच्याविरुद्ध महाभियोग प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यांच्यावरील आरोपांची चौकशी करणाऱ्या न्यायाधीश चौकशी समितीने सोमवारी आपला अहवाल लोकसभेचे सभापती अधिनियम-१९६८ अंतर्गत असलेल्या वैधानिक आवश्यकतांनुसार सादर करण्यात आलेला हा अहवाल योग्य वेळी संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडला जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. साधारणपणे जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू होणारे पावसाळी अधिवेशन, ही संसदेची पुढील बैठक असेल.

लोकसभेच्या सभापतींनी १२ ऑगस्ट २०२५ रोजी तीन सदस्यीय अधिकृत निवासस्थानाला १४ मार्च रोजी आग लागली होती. त्यावेळी दिल्लीतील त्यांच्या बंगल्यातील स्टोअररूममध्ये अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्याला मोठा प्रमाणात जळालेली रोकड आढळली होती. ज्या विशिष्ट खोलीत रोकड लपवून ठेवण्यात आली होती, त्या खोलीवर न्या. वर्मा यांचे नियंत्रण होते, असा निष्कर्ष तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी स्थापन केलेल्या अंतर्गत समितीने

## अग्रलेख...

# वाघिणीच्या दुधाचा बाजार


आजच्या काळात शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया राहिलेली नाही; ती मोठी बाजारपेठ बनलेली आहे. मोठ्या शहरापासून खेड्यापाड्यांपर्यंत सर्वत्र कोचिंग क्लासेस, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, करीअर अकॅडमी आणि ऑनलाईन कोर्सेसची अक्षरशः दुकाने उभी राहिली आहेत. ज्या शिक्षणाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाघिणीचे दूध म्हटले होते, त्याच दुधाचा थेट बाजार मांडला गेला आहे. एकेकाळी व्रत समजल्या जाणाऱ्या या क्षेत्रात आता सामाजिक बांधिलकीपेक्षा नफा, ब्रॅण्ड आणि स्पर्धेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या व्यापारीकरणाला बळ दिले ते राजकीय पुढाऱ्यांनी आणि धनदांडग्या पालकांनी. त्यामुळेच ज्याच्याकडे पैसा असेल, त्यालाच अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. परिणामी शिक्षण हे समानतेचे मूल्य रुजविणाऱ्या समाजासाठी वापरावयाचे माध्यम न राहता आर्थिक विषमतेचे प्रतीक बनले आहे. 'नीट' परीक्षेतील सध्याचा गोंधळ हे त्याचे अगदी ठळक उदाहरण.

गेल्या काही वर्षांत देशाच्या शिक्षणव्यवस्थेवर सर्वाधिक घाव घातला तो नीट परीक्षेच्या प्रयोगाने. देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणारी ही परीक्षा आता गुणवत्ता, पारदर्शकता आणि समान संधीचे प्रतीक राहिलेली नाही; उलट ती आर्थिक विषमता, खाजगीकरण आणि शैक्षणिक बाजारपेठेचा विद्रूप चेहरा बनली आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी महाराष्ट्र राहिला आहे. कारण देशातील सर्वाधिक खाजगी वैद्यकीय महाविद्यालये, कोचिंग क्लासेसच्या धंद्याचे जाळे, शिक्षणसम्राटांचे राजकारण आणि सत्तेचा हस्तक्षेप महाराष्ट्रात अधिक आहे. महाराष्ट्रात एकेकाळी सरकारी वैद्यकीय शिक्षणाची समृद्ध परंपरा होती. पुणे, मुंबई, नागपूर, संभाजीनगरसारख्या शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी देशाला उत्कृष्ट आणि संवेदनशील डॉक्टर दिले. डॉक्टर होणे म्हणजे समाजसेवा ही भावना तेव्हा शिक्षणातून रुजत होती. मात्र गेल्या दोन-अडीच दशकांत शिक्षणाच्या खाजगीकरणाने इतका आक्रमक वेग घेतला की, वैद्यकीय शिक्षण हे सेवाभावी क्षेत्र न राहता थेट धंदेवाईक पद्धतीचे क्षेत्र बनले. शिक्षणसंस्था ज्ञानमंदिरांपेक्षा आर्थिक साम्राज्यांचे केंद्र बनल्या. लाखो रुपयांची फी, डोनेशन, व्यवस्थापन कोटा आणि प्रवेश प्रक्रियेतील व्यवहार यामुळे गुणवत्तेपेक्षा पैशाला अधिक महत्त्व मिळू लागले. सर्वांत धोकादायक गोष्ट म्हणजे शिक्षण क्षेत्र आणि राजकारण्यांचे अभद्र नाते. महाराष्ट्रातील अनेक वैद्यकीय महाविद्यालये थेट राजकीय नेत्यांच्या संस्थांच्या ताब्यात आहेत. एकीकडे सरकार सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या अपुरी ठेवते, तर दुसरीकडे खाजगी संस्थांना परवानगी मिळत असते. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांसमोर पर्याय उरतो तो फक्त प्रचंड शुल्क भरून शिक्षण घेण्याचा. सामान्य शेतकरी, कामगार किंवा मध्यमवर्गीय कुटुंबासाठी हे शुल्क म्हणजे आयुष्यभराचे कर्ज असते. शिक्षणाचे बाजारात रूपांतर झाले की, गुणवत्ता तर संपतेच, शिवाय माणुसकीही हरते. लाखो रुपये खर्च करून डॉक्टर बनणारा विद्यार्थी पुढे ते पैसे वसूल करण्याचाच विचार करतो. परिणामी, आरोग्य व्यवस्थाही व्यापारी बनते. रुग्ण हा माणूस न राहता ग्राहक बनतो आणि उपचार ही सेवा न राहता व्यवहार ठरतो. म्हणूनच शिक्षणातील व्यापारीकरणाचा परिणाम केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण समाजव्यवस्थेवर होतो. 'नीट'चा मूळ उद्देश काय होता? देशभरातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया एकसमान करणे, गुणवत्तेला प्राधान्य देणे आणि भ्रष्टाचार रोखणे. प्रत्यक्षात झाले नेमके उलटे. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्यांच्या आर्थिक क्षमतेची चाचणी घेणारी ठरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, मराठी माध्यमातील विद्यार्थी, राज्य मंडळातील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुले या व्यवस्थेत अक्षरशः चिरडली जात आहेत. प्रश्न फक्त एका परीक्षेचा नाही; प्रश्न संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क की विक्रीयोग्य वस्तू (कमोडिटी) म्हणून दुकानाच्या शोकेसमध्ये ठेवले गेले आहे. उदारीकरणानंतर शिक्षण क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले गेले. सुरुवातीला खाजगी शिक्षणाला पर्यायी व पूरक म्हटले गेले; पण हळूहळू सरकारी शिक्षणाची उपेक्षा करून खाजगी शिक्षणालाच मुख्य प्रवाह बनवण्यात आले. महाराष्ट्रात ही प्रक्रिया अधिक वेगाने झाली. परिणामी सरकारी शाळा आणि महाविद्यालयांची अवस्था दयनीय होत गेली, तर खाजगी संस्थांचे साम्राज्य फोफावले. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वांत मोठे नुकसान झाले ते सामाजिक न्यायाचे. संविधानाने शिक्षणाला समान संधीचे साधन मानले होते. आज परिस्थिती अशी आहे की, गरीब विद्यार्थ्याला गुणवत्तेपेक्षा आर्थिक परिस्थितीमुळे मागे पडावे लागते. ग्रामीण भागातील बुद्धिमान विद्यार्थी कोचिंगच्या अभावामुळे स्पर्धेतून बाहेर फेकला जातो. हा सामाजिक अन्याय आहे. महाराष्ट्राने एकेकाळी शिक्षण क्षेत्राला पुरोगामी विचार दिला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र मानले. त्यांनी शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संघर्ष केला. आज त्याच महाराष्ट्रात एकूण शिक्षण आणि त्यातही वैद्यकीय शिक्षण मोजक्या श्रीमंतांच्या ताब्यात गेले आहे. शिक्षणातील विषमता वाढली की समाजातील आर्थिक आणि सामाजिक दरीही वाढत असते. नीट परीक्षेच्या नावाखाली जो ताण निर्माण केला जातो, त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो मुलांवर स्पर्धेचे प्रचंड ओझे आहे. शिक्षण हा आनंदाचा प्रवास न राहता भीती, ताण आणि असुरक्षिततेचा खेळ बनला आहे. पालकांच्या अपेक्षा, कोचिंग क्लासेसची अतिरेकी स्पर्धा, दिवसाला दहा-दहा तास अभ्यास आणि अपयशाची भीती, या सगळ्यांत विद्यार्थी मानसिकदृष्ट्या कोलमडत आहेत. कोटा, पुणे, लातूर यासारख्या शिक्षण केंद्रांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना ही त्याची जिवंत उदाहरणे आहेत. तेवढेच धक्कादायक असे की, या व्यवस्थेत शिक्षक आणि शिक्षणसंस्थाच संशयाच्या भोवऱ्यात सापडत आहेत. दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर येथून आरोपींना अटक होणे, त्यात प्राध्यापक, शिक्षिका आणि क्लासचालकांचा समावेश असणे. हे सारे अत्यंत लाजिरवाणे आणि महाराष्ट्राच्या परंपरेला काळे फासणारे आहे. ज्यांच्या हातात विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित असावे, तेच जर पैशासाठी प्रश्नपत्रिका, गैरव्यवहार करत असतील तर शिक्षण नावाच्या वाघिणीच्या दुधाचा बाजार कोणत्या थराला गेलाय याचा विचारही करता येत नाही. शिक्षक हे ज्ञान, प्रामाणिकपणाच्या मूल्यांचे प्रतीक मानले जातात. पण पैशाच्या हव्यासापोटी काही शिक्षक कोणत्याही थराला जाण्यास तयार होतात, तेव्हा शिक्षणव्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत होतो. हे भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यंत धोकादायक आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकांमधून जितके शिक्षण मिळते, त्याहून अधिक ते शिक्षकांच्या वर्तनातून शिकत असतात. शिक्षणाच्या मंदिरातच व्यवहार, भ्रष्टाचार आणि पैशांचा खेळ सुरू झाला, तर विद्यार्थ्यांच्या मनात प्रामाणिकपणाचे मूल्य रुजणार कसे? शिक्षणव्यवस्थेतील हा संपूर्ण गोंधळ केवळ 'नीट' परीक्षेचा किंवा काही गैरव्यवहारांचा प्रश्न नाही; तर तो समाजाच्या बदललेल्या प्राधान्यक्रमांचा आरसा आहे. आपण शिक्षणाला ज्ञान, विवेक आणि सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून पाहणे सोडले आणि ते प्रतिष्ठा, पैसा व स्पर्धेच्या शर्यतीचे साधन बनवले. त्यामुळे आज विद्यार्थी डॉक्टर कसे व्हायचे, हे शिकत आहेत; पण डॉक्टर का व्हायचे, हा मूलभूत प्रश्न बाजूला पडला आहे. कोणतीही शिक्षणव्यवस्था केवळ पदव्या देऊन समाज घडवत नाही; तर ती समाजाची नैतिक दिशा ठरवत असते. त्यामुळे आज गरज आहे ती केवळ परीक्षा पद्धती बदलण्याची नाही, तर शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची. शिक्षण हे बाजारपेठेच्या तत्त्वांवर चालणारे उत्पादन नसून लोकशाही टिकवणारी व ती बळकट करणारी सामाजिक प्रक्रिया आहे, ही जाणीव पुन्हा निर्माण करावी लागेल. अन्यथा उद्या अशी वेळ येईल की, शिक्षण संस्थांच्या भव्य इमारती असतील, तंत्रज्ञान आधुनिक असेल; पण त्या व्यवस्थेत माणुसकी, समानता आणि नैतिकता राहणार नाही. शिक्षण जर बाजाराच्या पद्धतीने चालू राहिले तर लोकशाही देखील धनदांडग्यांच्याच ताब्यात जाणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. वेळ कमी उरलाय. सावरायचे तर सरकारला आणि समाजालाही सावरावे लागेल.

## विशेष

# इटली आणि भारत : भारत-भूमध्य सागरीय संबंधांसाठी सामरिक भागीदारी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांचा लेख**





भारत आणि इटली यांच्यातील संबंध आता एका निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहेत. अलिकडील वर्षांमध्ये आमच्यातील बंध एका अभूतपूर्व गतीने दृढ झाले असून या मैत्रीपूर्ण संबंधांचे रूपांतर स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मूल्यांमध्ये रुजलेल्या आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनावर आधारित धोरणात्मक भागीदारीत झाले आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन होत असताना भारत आणि इटली यांच्यातील भागीदारीला उच्चस्तरीय राजकीय आणि संस्थात्मक संवादांद्वारे मार्गदर्शन लाभले आहे आणि या भागीदारीला एक नवीन आणि उच्च पैलू देखील प्राप्त झाला असून आमची आर्थिक गतिशीलता, सामाजिक सर्जनशीलता आणि हजारो वर्षांपासूनच्या संस्कृतीचे ज्ञान यांचा संगम झाला आहे. आमचे सहकार्य हे आपल्या सामायिक जाणिवेचे प्रतिबिंब आहे की, २१व्या शतकातील समृद्धी आणि सुरक्षितता या राष्ट्रांच्या नवोन्मेष क्षमतेवर, ऊर्जा संक्रमणाचे व्यवस्थापन करण्याच्या कौशल्यावर आणि धोरणात्मक सार्वभौमत्व अधिक बळकट करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल. यासाठी आम्ही आमचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि विविधतेने समृद्ध करण्यास कटिबद्ध आहोत, जेणेकरून नवीन उद्दिष्टांचा पाठपुरावा करता येईल आणि परस्परपूरक सामर्थ्यांचा एकत्रित उपयोग करता येईल.

औद्योगिक महासत्ता म्हणून इटलीचे स्थान प्रतिबिंबित करण्याच्या हेतूने इटालियन डिझाईन, उत्पादकतेतील उकृष्टता आणि जागतिक दर्जाचे सुपर कॉम्प्युटर्स यांचा आणि भारताची वेगवान आर्थिक वृद्धी, अभियांत्रिकी नैपुण्य, व्याप्ती आणि १०० युनिकॉर्न आणि २ लाख स्टार्टअप्स असलेली नवोन्मेष आणि उद्योजक परिसंस्था, यांच्यात एक शक्तिशाली समन्वय साधण्याचे आमचे ध्येय आहे. हे केवळ एकत्रीकरण नसून मूल्यनिर्मितीची सह-प्रक्रिया आहे, ज्यामध्ये आपल्या परस्पर औद्योगिक सामर्थ्यांमुळे एकमेकांची क्षमता अधिक वृद्धिंगत होते.

युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील मुक्त व्यापार करार, वाढता व्यापार आणि गुंतवणूक या दोन्ही दिशांनी मार्ग खुला केला आहे . संरक्षण आणि अंतराळ, हरित तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, वाहन उद्योगातील घटक, रसायने, औषधनिर्माण, वस्त्रोद्योग, कृषी उत्पादने, पर्यटन आणि इतर क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून आम्हाला २०२९ पर्यंत भारत आणि इटली यांच्यातील व्यापार २० अब्ज युरोपर्यंत वाढवून त्याहीपेक्षा जास्त विस्तार करायचा आहे.

जगभरात 'मेड इन इटली'साठी प्रचलित असलेला समानार्थी शब्द म्हणजे उत्कृष्टता हा होय आणि त्याने आज 'मेक इन इंडिया' उपक्रमातील उच्च गुणवत्तेच्या उद्दिष्टांशी निसर्गतः समन्वय साधला आहे. या संदर्भात, इटालियन उद्योगांना भारतात उत्पादन करण्यात वाढलेले स्वारस्य आणि भारतीय उद्योगांची इटलीमधील वाढलेली संख्या, जी सध्या दोन्ही बाजूंनी एक हजारपेक्षा अधिक आहे, ही एक अत्यंत सकारात्मक गोष्ट असून त्यामुळे आपल्या पुरवठा साखळीतील समन्वय वृद्धिंगत होईल.

तांत्रिक नवोन्मेष आमच्या भागीदारीचा गाभा आहे. येणारी दशके अमर्याद व्याप्ती असलेल्या तांत्रिक क्रांतीने आकाराला येतील आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग, प्रगत उत्पादकता, महत्त्वपूर्ण खनिजे आणि डिजिटल पायाभूत सुविधा अशा क्षेत्रांतील प्रगतीने ओळखली जातील. भारताची गतिशील नवोपक्रम परिसंस्था अतिशय कुशल व्यावसायिक प्रतिभासंपन्न मनुष्यबळाने युक्त असून इटलीच्या प्रगत औद्योगिक क्षमतांचा संगम झाल्याने वरील क्षेत्रातील आमचे सहकार्य अधिक नैसर्गिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

या कार्यात आमची विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांमधील वाढत्या भागीदारीचा मोठा पाठिंबा मिळेल. भारताची डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा याआधीच विविध देशांमध्ये विशेषतः ग्लोबल साऊथमधील अनेक देशांमध्ये व्यापक प्रतिसाद मिळवत आहे.

विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव आपल्या समाजावर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर आधीच दिसू लागला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास हा जबाबदार आणि मानवकेंद्रित असावा हे सुनिश्चित करण्यासाठी इटली आणि भारत दीर्घकाळापासून सहकार्य करत आहेत. या दृष्टिकोनातून पहिले तर भारत आणि इटली, कृत्रिम बुद्धिमत्तेकडे सर्वसमावेशक विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहत आहेत, विशेषतः ग्लोबल साऊथमध्ये जिथे डिजिटल पायाभूत सुविधा आणि सहज उपलब्ध बहुभाषिक तंत्रज्ञान दरी वाढवण्याऐवजी ती कमी करण्याचे कार्य करू शकते.

भारताच्या मानव - अर्थात मानवाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी ठेवण्याच्या ड्ढ दृष्टिकोनावर आणि मानवतावादी परंपरतेत रुजलेल्या 'मानवकेंद्रित अल्गोरिथमिक नीतिशास्त्राला प्रोत्साहन देणाऱ्या इटलीच्या नेतृत्वावर आधारित आमची भागीदारी कृत्रिम बुद्धिमत्तेला सामाजिक सक्षमीकरणासाठी एक प्रभावी प्रेरक शक्ती बनवण्याचा प्रयत्न करते. भारताच्या डिजिटल विस्ताराची इटलीच्या नैतिक आणि उद्योजकीय उत्कृष्टतेशी सांगड घालून तंत्रज्ञान मानवाच्या प्रतिष्ठेसाठी कार्य करेल हे सुनिश्चित करण्याचा आमचा दृष्टिकोन आहे. सुरक्षित डिजिटल सहकार्य, क्षमता-विकास आणि सक्षम सायबर पायाभूत सुविधांमधील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करून, प्रत्येक राष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात सहभागी होता येईल आणि त्याचा लाभ घेता येईल असे खुले, विश्वासार्ह आणि न्याय्य डिजिटल क्षेत्र निर्माण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. हा दृष्टिकोनच इटलीच्या जी-७ अध्यक्षपदाचा गाभा आणि नवी दिल्लीत झालेल्या एआय इम्पॅक्ट समिट २०२६ ची फलनिष्पत्ती आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेकडे मानवाने मानवासाठी विकसित केलेले साधन म्हणून पाहणे म्हणजे तंत्रज्ञान कधीही मानवाची जागा घेऊ शकत नाही किंवा त्यांच्या मूलभूत अधिकारांना बाधा पोहोचवू शकत नाही, तसेच सार्वजनिक चर्चेला प्रभावित करण्यासाठी किंवा लोकशाही प्रक्रियांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी त्याचा वापर होऊ नये, हे ठामपणे अधोरेखित करणे होय. अधिकाधिक परस्परसंलग्न होत चाललेल्या जगात स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याचा आमचा दृष्टिकोन याच मूलभूत आव्हानावर आधारित आहे.

आमच्या सहकार्यात अंतराळ क्षेत्राचाही समावेश आहे. भारताने अंतराळ संशोधन आणि उपग्रह तंत्रज्ञानात केलेली उल्लेखनीय प्रगती, तसेच इटलीची एरोस्पेस इंजिनीअरिंगमधील उत्कृष्टता, संयुक्त उपक्रम आणि पुढच्या पिढीतील तंत्रज्ञान विकासासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देतात.

राष्ट्रांची समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षा आणि स्थैर्य आवश्यक आहे. संरक्षण, सुरक्षा आणि धोरणात्मक तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये आपले सहकार्य अधिक बळकट करण्याचा इटली आणि भारताचा मानस आहे. आमचे सहकार्य महत्त्वपूर्ण सागरी मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्यास मदत करेल, तसेच दहशतवाद, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क, अमली पदार्थांची तस्करी, सायबर गुन्हे आणि मानवी तस्करी यासारख्या धोक्यांचा सामना करण्यासाठी प्रतिरोधक क्षमता बळकट करेल.

ऊर्जा हा आमच्या भागीदारीचा आणखी एक महत्त्वाचा स्तंभ आहे. वैविध्यपूर्ण ऊर्जा स्रोतांकडे जागतिक स्तरावर होणाऱ्या संक्रमणासाठी नवोन्मेष, गुंतवणूक आणि सहकार्याची आवश्यकता आहे. भारत आणि इटली नूतनीकरणक्षम ऊर्जेपासून ते हायड्रोजन तंत्रज्ञानापर्यंत आणि स्मार्ट ग्रीड्सपासून ते लवचीक पायाभूत सुविधांपर्यंत सहकार्य करत आहेत.

हरित हायड्रोजन निर्यातीचे केंद्र बनण्याच्या भारताच्या प्रयत्नांमध्ये प्रचंड क्षमता आहे आणि ते अक्षय ऊर्जा पायाभूत सुविधांमधील इटलीच्या प्रगत तंत्रज्ञानाला तसेच युरोपसाठी ऊर्जा प्रवेशद्वार म्हणून असलेल्या तिच्या धोरणात्मक भूमिकेला उत्तम प्रकारे पूरक ठरते.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (आयएसए), आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी आघाडी (सीसीआरआय) आणि जागतिक जैवइंधन आघाडी (जीबीए) या भारताच्या नेतृत्वाखालील प्रमुख आघाड्यांमध्ये इतर देशांसोबतचे आमचे सहकार्यही या संदर्भात महत्त्वाचे आहे.

भौतिक, डिजिटल आणि मानवी जोडणी म्हणजे आपल्याला एकत्र विणणारा एक धागा आहे. भारत आणि इटली हे दोन्ही देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या दोन महत्त्वपूर्ण केंद्रांच्या अगदी मध्यभागी वसलेले आहेत, म्हणजेच इंडो-पॅसिफिक आणि भूमध्य समुद्र (मेडिटेरेनियन)- हे असे प्रदेश आहेत ज्यांच्याकडे स्वतंत्र क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, तर त्याऐवजी ते वाढत्या प्रमाणात परस्परांशी जोडलेले अवकाश आहेत. वास्तविक, आपण ज्याला इंडो-मेडिटेरेनियन म्हणू शकतो त्याचा उदय आपण पाहत आहोत, जो व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, डेटा आणि विचारांसाठी हिंदी महासागराला युरोपशी जोडणारा एक महत्त्वाचा कॉरिडॉर आहे. याच परस्परांशी जोडलेल्या अवकाशात आपले नाते नैसर्गिकरीत्या एका विशेष धोरणात्मक भागीदारीत विकसित होते- जे दोन खंडांना जोडते आणि नवीन जागतिक गतिमानतेला आकार देते.

या संदर्भात, इंडिया-मिडल इस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (आयएमईसी) आधुनिक वाहतूक आणि पायाभूत सुविधा, डिजिटल नेटवर्क्स, ऊर्जा प्रणाली आणि लवचीक पुरवठा साखळी याद्वारे आपल्या प्रदेशांना जोडण्याच्या उद्देशाने असलेल्या एका दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करत आहे. हा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यासाठी भारत आणि इटली इतर भागीदारांसोबत एकत्र काम करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

आपल्या राष्ट्रांमधील प्रगल्भ भागीदारी आणि शाश्वत सांस्कृतिक संबंधांचा आधार घेऊन आपण आपल्या सामायिक आव्हानांना तोंड देऊ शकतो. भारतीय संस्कृतीत 'धर्म' ही संकल्पना आपल्या कृतींना दिशा देणाऱ्या कर्तव्यभावनेचे प्रतीक आहे; तर 'वसुधैव कुटुंबकम्' - अर्थात संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे- हा सिद्धांत आजच्या परस्परांशी जोडलेल्या डिजिटल युगात अत्यंत प्रभावीपणे प्रतिध्वनित होतो.

अशा मूल्यांना इटलीच्या मानवतावादी परंपरेत एक नैसर्गिक प्रतिसाद मिळतो, ज्याची मुळे प्रबोधन युगातील आहेत, जी प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर आणि लोकांना व समाजाला एकत्र आणण्याच्या संस्कृतीच्या शक्तीवर भर देत आहेत. त्यामुळे, आमचा सामायिक दृष्टिकोन आपल्या लोकांना केंद्रस्थानी ठेवून एक मजबूत आणि भविष्यवादी भारत-इटली भागीदारीचा पाया घालण्याचा प्रयत्न करत आहे.

## वेध

**गिरीश शेरेकर**

# यंदाही फुटणार काँग्रेसची मते?

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. तब्बल दोन वर्षे या निवडणुकीला विलंब झाला. कारण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लांबल्या होत्या. या विधान परिषद निवडणुकीत जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत, महापालिकेचे सदस्य आणि पंचायत समितीचे सभापती मतदार असतात. पण, अमरावती जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका झालेल्या नाहीत. या दोन्ही संस्थांचे सदस्य यंदाच्या निवडणुकीत मतदार म्हणून राहणार नसल्याने मतदारसंख्या ७३ ने कमी झाली आहे. यंदा जवळपास ४२५ मतदार राहतील. या मतदारसंख्येचे पक्षनिहाय वर्गीकरण केल्यास महायुतीकडे उमेदवार जिंकून आणण्याइतकी संख्या आहे. महाविकास आघाडी व अन्य त्यापेक्षा थोडे कमी आहेत. मविआचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसने जोर लावला तर यंदाची निवडणूक रंगतदार होऊ शकते.

राजकीय पक्ष ही निवडणूक अतिशय वेगळ्या पद्धतीने लढतात. आजवरचा इतिहास बघितला तर क्रॉस व्होटिंग मोठ्या प्रमाणात झाल्याचे पाहायला मिळाले आहे. अमरावती मतदारसंघाचा विचार करायचा झाल्यास २०१२ पेक्षा २०१८ मध्ये मोठ्या प्रमाणात क्रॉस व्होटिंग झाले होते. त्याची चर्चा संपूर्ण राज्यात झाली होती. काँग्रेस व सहकारी पक्षाच्या २१० मतदारांनी तेव्हा भाजपा उमेदवाराला मतदान केले होते. हक्काची मतेसुद्धा काँग्रेस उमेदवाराला न मिळाल्याची चर्चा संपूर्ण राज्यात झाली. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी एकमेकांकडे बोट दाखविले. काँग्रेसमधल्या तेव्हाच्या दुय्यम फळीतल्या कार्यकर्त्यांनी या निवडणुकीतले फारच रंजक किस्से सांगितले होते. निवडणूक निकालांवर नेहमीच आक्षेप घेण्याची सवय लागलेल्या काँग्रेसने या निकालावर मात्र अजिबात संशय व्यक्त केला नव्हता, हे विशेष! या दारुण पराभवाचे प्रकरण राहुल गांधी व अन्य नेत्यांकडे गेले होते. पण, त्यांनी देखील या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष केले होते. राहुल यांनी तेव्हाच जाब विचारला असता तर काँग्रेसची इतकी वाताहत झाली नसती. राहुल गांधी कोणतीच गोष्ट गंभीरपणे घेत नाहीत. अमरावतीचा विषय त्यांनी बाजूला ठेवला असेल तर ती त्यांच्या नेतृत्वाची पद्धत मानली पाहिजे.

आता यंदा होऊ घातलेल्या निवडणुकीत काय स्थिती राहील, याची चर्चा सुरू आहे. काँग्रेसकडून अद्याप प्रमुख असे नाव समोर आलेले नाही. रवी राणा यांचा युवा स्वाभिमान महायुतीत आहे. यावेळी त्यांच्याकडे मते जास्त आहेत. गेल्या आठ वर्षांत लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. त्यात अनेक घडामोडी झाल्याने बरेच पाणी वाहून गेले. महायुतीतली राष्ट्रवादी व शिवसेना भाजप उमेदवाराच्या बाजूने राहील, असे दिसते. रवी राणा यांचे भाऊ सुनील राणा या निवडणुकीत उतरण्याची चर्चा जोर धरत आहे. तसे झाले तर महायुतीत जोरदार रस्सीखेच होईल. याचा फायदा काँग्रेस घेते की नाही, हे पाहावे लागेल. सध्याची स्थिती लक्षात घेतली तर काँग्रेसकडून फारशी हालचाल होताना दिसत नाही. महायुतीच्या उमेदवारावरून सुरू असलेल्या अंतर्गत कलहाचा फायदा घेणारा उमेदवार जर काँग्रेसने दिला तर या निवडणुकीचे चित्र बदलू शकते. सध्या तरी भाजपची बाजू मजबूत आहे. त्यांच्याकडे ही निवडणूक लढण्याचे कौशल्य आहे. यंदाही आपल्याला काँग्रेस व अन्य पक्षांची मते मिळतील, असा विश्वास भाजपला आहे. त्याच्या या विश्वासाला काँग्रेस बळ देते की तगडा उमेदवार उभा करून आपले अस्तित्व कायम ठेवते, याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे. काँग्रेसची मते यंदाही फुटणार, ही चर्चा किती खरी आणि खोटी हे माहीत नाही. निकालानंतरच काय ते कळेल. सध्या मात्र चर्चेच्या बाजारात गर्मी आहे. उमेदवार जिंकला नाही तरी चालेल, पण त्याला हक्काची मते मिळायलाच हवी, हा निर्धार जेव्हा काँग्रेस करेल तेव्हाच ही निवडणूक रंगेल. अन्यथा पुनरावृत्ती ठरलेली दिसते.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# सप्त भुवन आणि सप्त तल!

आपल्या प्राचीन ब्रह्मांड विज्ञानात १४ भुवने किंवा १४ लोक सांगितले आहेत. त्यामागची कथा विविध पुराणांत थोड्या थोड्या फरकाने आली आहे. त्यानुसार - ''एकाकी न रमे, म्हणोनी निर्मिली चौदाही भुवने''

भगवान आपोनारायणा म्हणजे सर्वत्र जलमय आणि तिथे भगवान नारायण वटपत्री बाळरूपात शयन करीत असताना त्यांना एकट्याला करमत नव्हते म्हणून त्यांनी चौदा भुवने निर्माण केल्याचे सांगितले जाते. त्यात पृथ्वीलोक भगवद्भक्तांसाठी महत्त्वाचा आहे. आपल्या पृथ्वीलोकाच्या वरील लोक त्याला ऊर्ध्व लोक म्हणतात. सहज लक्षात यावे म्हणून आपण त्याला सप्त भुवन म्हणतो.

पृथ्वीलोकाखाली असलेल्या लोकाला अधो लोक म्हणतात. त्याला आपण सप्त तल म्हणतो. दोन्ही मिळून चौदा भुवन म्हणण्याचा प्रघात आहे.

ऊर्ध्वलोक अर्थात सप्त भुवन म्हणजे भूलोक, भुवलोक, स्वलोक, महालोक, जनलोक, तपलोक आणि सत्यलोक अशी त्यांची नावे आहेत.

अधोलोक म्हणजे सप्ततल खालीलप्रमाणे आहेत. अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, पाताल.

सप्त भुवन आणि सप्त तल हे ब्रह्मांड विज्ञान आहे. खगोल विज्ञान आणि ज्योतिष आहे. चौदा भुवनात ऊर्ध्वलोकाचा विचार करू.

१) **भूलोक** : या लोकाला पृथ्वीलोक, मर्त्यलोक, मृत्युलोक, मध्यलोक असेही म्हणतात. भूलोकात मानवी जीवन, प्राणी, पक्षी, वनस्पती, जीवसृष्टी अर्थात भौतिक जीवन आहे.

२) **भूर्लोक** : ऊर्ध्वलोकातील दुसऱ्या क्रमांकावर असलेले भुवलोक म्हणजे वायुमंडळ होय. हे लोक म्हणजे अंतरिक्ष वायुमंडलीय क्षेत्र याला ऊर्जा क्षेत्र असेही म्हणतात. सिद्धमुनी, योगी, अंतरिक्ष देवता इथे निवास करतात. इथे प्रकाश तत्त्व, ब्रह्मांड ऊर्जा असते. पृथ्वीपासून सूर्यापर्यंतचे आंतरिक चेतनेचे आवरण म्हणजे भूर्लोक होय.

३) **स्वर्लोक** : दैवीय ऊर्जा केंद्र असलेल्या या लोकाला स्वर्गलोक म्हणतात. इथे देवता, ऋषी आणि पुण्यात्म्यांना स्थान आहे. दिव्य, आनंदमयी असलेल्या या लोकांत इंद्र राजा तर वरुण, सोम, कपिल, अग्नी यांचे प्राबल्य आहे. या लोकात भौतिक कष्टातून मुक्ती आहे. भूलोकात केलेल्या सत्कर्माचे फळ स्वर्ग आहे.

४) **महर्लोक** : भूलोकापासून चौथे स्थान असलेला महःलोक. याला अविनाशी लोक म्हणतात. इथे सप्तर्षी, भृगु ऋषी असे महान ऋषी निवास करतात. महार्लोकाचा ज्ञानप्रकाश सर्वत्र असतो. प्रलयाच्या वेळी हा लोक सुरक्षित असतो. उच्च चेतना आणि दिव्य ज्ञानाचे हे केंद्र आहे.

५) **जनलोक** : भूलोकापासून पाचव्या स्थानावरचे हे भुवन दिव्य आणि पवित्र आत्म्यांचे स्थान आहे. सनक, सनंदन, सनातन, सनतकुमार इथे राहतात. इथे असलेले पुण्यात्मे विरक्त असतात. त्यांना सांसारिक अथवा कोणत्याच इच्छा नसतात. विवेकपूर्ण जीवन आणि आदर्श चेतनेने व्याप्त असा जनलोक आहे. विशेष म्हणजे ज्ञान, कला, संगीत याचे निवासस्थान जनलोक आहे.

६) **तपोलोक** : भूलोकापासून ऊर्ध्वगे सहाव्या स्थानावर असलेला तपोलोक तपस्वी लोकांचे स्थान आहे. कठोर साधकांचे स्थान असलेला हा लोक म्हणजे इथे मोह, माया, इच्छा नसलेले पुण्यात्मे राहतात. भूलोकावर असलेली बंधने या लोकात नाही. आध्यात्मिकतेची परमोच्च पातळी इथे गाठलेली असते त्यामुळे हे आत्मोन्नती केंद्र आहे. तपोलोकासाठी मोक्षाची कवाडे सतत उघडी असतात.

७) **सत्यलोक** : सर्वांत उच्च स्थानावर असलेल्या सत्यलोकाला ब्रह्मलोक असेही म्हणतात. ज्यांना जन्म-मरणाचा फेरा चुकला ते पुण्यात्मे इथे राहतात. हे परमेश्वराचे कायम निवासस्थान यालाच मोक्ष म्हणतात. परमशांतीचे ब्रह्मांडीय चेतना केंद्र आहे. हा लोक स्वयंप्रकाशित असून सूर्य-चंद्राचा प्रभाव इथे नाही. सदैव प्रफुल्ल असलेला हा लोक आहे.

भूलोकाच्या खाली असलेले अधोलोक ज्यामध्ये दनूचे पुत्र दानव, दैत्य, नाग राहतात. देवर्षी नारदांनी वर्णन करताना अधोलोक स्वर्गाहून सुंदर असून तिथे चंद्र, सूर्य नाहीत पण त्याहून तेजस्वी रत्न मणी आहेत. त्यामुळे ते लख्ख प्रकाशमयी आहेत. ते देखील सप्त तल म्हणून सर्वज्ञात आहेत.

१) **अतल** : भूलोकापासून सर्वांत प्रथम असलेला अधोलोक म्हणजे अतल. इथे मयासुराचा पुत्र बालासुराचे राज्य आहे. त्याच्याजवळ विविध शक्ती असल्याने येथील जीवन विलासपूर्ण असते. येथील असुरांना हत्तीचे बळ प्राप्त असते. इथे अध्यात्माला फार स्थान नाही.

२) **वितल** : भूलोकापासून दुसरा असलेला अधोलोक आहे. येथील जीवात्मे शिवाचे भक्त शिवगण, पिशाच्च आहेत. कारण इथे महादेव हटकेश्वर रूपात भवानीसह राहतात. इथे हटकी नावाची नदी आहे. भौतिक संपत्ती आणि सुवर्ण संग्राहक लोकांचा हा वितल आहे.

३) **सुतल** : भूलोकापासून तिसरा असलेला हा अधोलोक सर्वांगसुंदर आहे. इथे प्रल्हादाचा नातू आणि विरोचन पुत्र बळीराजाचे राज्य आहे. भगवान वामन इथे बळीराजावर कृपेचा वर्षाव करीत असतात.

४) **तलातल** : भूलोकापासून चौथा असलेला अधोलोक म्हणजे तलातल. रचनाकार मयासुर यांचे हे निवासस्थान. रावणाची पत्नी मंदोदरी ही मयासुराची मुलगी. तलातल रावणाची सासुरवाडी आहे.

५) **महातल** : भूलोकापासून पाचवा असलेला हा अधोलोक रत्नमण्यांची खाण आहे. इथे नागवंश राहतात. कश्यप ऋषी आणि माता कद्रू यांच्यापासून निर्माण झालेला हा वंश आहे. तक्षक, कालिया इथेच निवासी असतात.

६) **रसातल** : मृत्युलोकांपासून सहावा असलेला हा अधोलोक आहे. इथे दैत्यराज, दानवराज आणि निवातकवच आदी राक्षस निवांत राहतात. त्यांचे शत्रू देव स्वर्गात राहतात. स्वर्गापासून खूप अंतरावर रसातल आहे म्हणून राक्षस इथे शांत राहतात.

७) **पाताळ** : अधोलोकातील सर्वांत शेवटचा तल म्हणजे पाताळ. इथे सूर्य पोहचू शकत नाही म्हणून अंधार असतो पण इथले रत्न, मणी प्रचंड प्रकाशमान असल्यामुळे इथे सर्वत्र लख्ख प्रकाशमय वातावरण असते. इथे सर्पराज वासुकी यांचे राज्य आहे. शेषनागही इथेच विराजमान आहेत.

आपल्या विष्णू पुराण, शिव पुराण आणि भागवत पुराणात याबाबत वर्णन आहे. आपले भारतीय ब्रह्मांडविज्ञान किती प्रगत होते यावरून लक्षात येईल. नवीन पिढीने अभ्यास करून यातील गर्भितार्थ शोधून काढल्यास याबाबत अधिक ज्ञान जगासमोर येईल.

९८२२२६२७३५

## वाचक पत्र

### वाढते शहरीकरण आणि पर्यावरण...

आजच्या आधुनिक युगात शहरीकरण वेगाने वाढत आहे. उद्योगधंदे, रोजगार, शिक्षण आणि चांगल्या सुविधा मिळवण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे शहरांची संख्या आणि लोकसंख्या दोन्ही वाढत आहेत. परंतु या वाढत्या शहरीकरणाचा पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहे. पूर्वी लोक बहुतेक ग्रामीण भागात राहत होते. शेती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर त्यांचे जीवन अवलंबून होते. पण औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शहरांचे महत्त्व वाढले. रस्ते, इमारती, कारखाने आणि वाहने यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला.

वाढत्या शहरीकरणामुळे वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होत आहे. नवीन इमारती आणि रस्ते बांधण्यासाठी झाडे तोडली जातात. त्यामुळे हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते आणि प्रदूषण वाढते. वाहनांच्या धुरामुळे वायुप्रदूषण वाढते. शहरांमध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढते. योग्य व्यवस्थापन नसल्यास हा कचरा पर्यावरणासाठी धोकादायक ठरतो. तसेच जलस्रोत कमी होणे, तापमान वाढणे आणि जैवविविधतेचा नाश होणे यासारख्या समस्या निर्माण होतात. विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. वाढते शहरीकरण आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे. अधिकाधिक वृक्षलागवड, प्रदूषण नियंत्रण, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारल्यास आपण निसर्गाचे रक्षण करू शकतो. विकासासोबत पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## महत्वाचे...



### माधवी व्हटे-आहेरसिंग यांच्यावतीने दत्त मंदिर दिंडी सोहळ्यासाठी १० टाळ भेट

**सांगोला, दि. १९ मे-**

पंढरपूर येथील रहिवासी माधवी व्हटे-आहेरसिंग यांच्या वतीने येथील श्री दत्त मंदिर दिंडी सोहळ्यासाठी १० टाळ भेट देण्यात आले. माधवी व्हटे यांनी आपल्या माहेरच्या गावातील धार्मिक परंपरेला आणि भजनी मंडळाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही सामाजिक आणि धार्मिक बांधिलकी जपली आहे. सांगोला येथील प्रसिद्ध पेंटर व्हटे यांच्याहस्ते हे टाळ दत्त मंदिर भजनी मंडळाकडे सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी मंदिराचे विश्वस्त, भजनी मंडळाचे प्रमुख आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### लैंगिकता शिक्षण व जीवन कौशल्य विषयावर जनजागृती कार्यक्रम

**सोलापूर, दि. १९ मे-**

नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही येथे लैंगिकता शिक्षण व जीवन कौशल्य या विषयावर विशेष म ार्गदर्शनपर जनजागृती कार्यक्रम पार पडला. या उपक्रमाचे आयोजन प्रिसिजन फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमात एचआयव्ही सहजीवन जगणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींना संतुलित आहाराचे महत्त्व, वैयक्तिक स्वच्छतेचे नियम, मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची योग्य काळजी, बाल शोषण प्रतिबंध, किशोरवयात होणारे शारीरिक, भावनिक व मानसिक बदल तसेच कॅन्सरसारख्या गंभीर आजारांविषयी व एचआयव्ही सहजीवन जगताना घ्यावयाची खबरदारी याविषयी प्राथमिक माहिती देण्यात आली. तज्ज्ञांनी संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना चांगल्या आरोग्य सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रश्न विचारून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमास एनएसओपी प्लसचे प्रकल्प अधिकारी समाधान माळी, प्रकल्प समन्वयक विजय शिंदे, फिल्डवर्कर आरती रेड्डी, रत्नशिल खंडागळे, सांख्यिकी अधिकारी अविनाश कांबळे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा टोणपे, विकी शिवशरण, उर्मिला बनसोडे, संध्या वाघमारे आणि लॅब टेक्निशन प्रीती चौधरी यांनी सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरातील विषयांवर प्रबोधन केले. एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींकरिता सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यासाठी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सुहासिनी शहा, मॅनेजर जनसंपर्क विभाग नितीन फलटणकर, माधव देशपांडे व वैशाली बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन सत्यभामा टोणपे यांनी, आभार उर्मिला बनसोडे यांनी मानले.

### टेंभुर्णीत चार दुकाने जळून खाक; सुमारे एक कोटी रुपयांचे नुकसान

**टेंभुर्णी, दि. १९ मे-**

टेंभुर्णी ता माढा येथे चार दुकाने जळून खाक होऊन झालेल्या नुकसानीत जवळपास कोटी रुपयांन पेक्षा जास्त नुकसान झाले असून नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे जीवीत हानी झाली नाही ही घटना मंगळवारी दि.१९ रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी कि टेंभुर्णी येथील टेंभुर्णी-करमाळा रोड लगत असलेल्या पुष्पक मंगल कार्यालया शेजारील लगत असलेल्या गाड्यांमध्ये असलेल्या फर्निचर च्या दुकानत मंगळवारी सायंकाळी सातच्या दरम्यान भुस्याला आग लागली होती ती विझवताना सामान बाहेर काढल्यानंतर शेजारी असलेल्या हार्डवेअर दुकानाच्या बाहेर असलेल्या प्लॅस्टिक साहित्याने पेट घेतला दरम्यान वारे जोरात सुटल्याने आगीने रोद्र रूप धारण केले यामध्ये राऊत आणि आकाश सुतार यांची दोन फर्निचरची दुकाने व महेश तोडकर यांचे हार्डवेअर,व वैभव तोडकर इलेक्ट्रॉनिक्स दुकाने जळत होती.

यावेळी विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे व इंदापूर नगरपरिषदेचे अग्निशामक दलाने आग विझविली तोपर्यंत चारी दुकानातील साहित्य जळून खाक झाले यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि हार्डवेअर चे एक कोटी रूपयांचे च्या पुढे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

तसेच शेजारीच असलेल्या बारामती अर्बन बँकेच्या खिडकीतून ज्वाला आत जाऊन कागद पत्रांनी पेट घेतला होता. परंतु युवकांनी व कर्मचाऱ्यांनी तातडीने सामान बाहेर काढले. ही घटना सायंकाळच्या सुमारास घडल्याने बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. टेंभुर्णी पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत केली.


# सत्य साईबाबांचा प्रेमवाहिनी रथ दोन दिवस पंढरपुरात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मे -**

श्री सत्यसाईबाबा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर भारतभर विविध कार्यक्रम होत आहेत. याचाच एक भाग म्हणून श्री सत्यसाईबाबांचा प्रेम वाहिनी रथ भक्तांसाठी भारत भ्रमण करत आहे. रथयात्रेचे २१ आणि २२ मे रोजी पंढरपूरात आगमन होत असल्याची माहिती संपत वाघाटे यांनी दिली.

दरम्यान सर्वधर्म समभावाचा संदेश घेऊन निघालेला श्री सत्यसाईबाबांचा प्रेम वाहिनी रथ २१ मे रोजी पंढरपूर येथील श्री राम मंदिर, रघुकुल हाऊसिंग सोसायटी, पंढरपूर येथे सकाळी साडेसात वाजता दाखल होत आहे. पंढरपूर शहर तसेच तालुक्यातील होळे, कौठाळी, शिरढोण येथेही भक्तांना दर्शनाचा लाभ घडावा यासाठी जाणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

दिनांक २२ मे रोजी सकाळी साडेसहा वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून प्रदक्षिणा मार्गाने हा रथ जाणार आहे. सत्य साईबाबांच्या पादुका श्री विठ्ठल



रुक्मिणी मातेच्या भेटीस जाऊन श्री साई विठ्ठल निलायम, रघुकुल सोसायटी येथे सांगता होऊन पुढे हा प्रेम वाहिनी रथ साताऱ्याकडे मार्गस्थ होणार आहे.

सर्व धर्म समभाव हा संदेश जनमानसात रुजवण्यासाठी ही रथयात्रा काढली आहे. रथात बाबांच्या पादुका वस्तू व दिव्य संदेश असून दर्शनाने भक्तांना आत्मिक समाधान मिळते अशी श्रद्धा आहे.

### मानव सेवा हीच माधव

सेवा या बाबांच्या ब्रीद वाक्याशीनिगडीत राहून पंढरपूर येथे श्री सत्य साई सेवा संघटना महाराष्ट्र राज्य शाखा पंढरपूर यांचे वतीने पंढरपूर येथे आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार वारीमध्ये भाविकांना मुंबई येथील तज्ञ डॉक्टर्स व सेवेकऱ्यांद्वारे मोफत औषधोपचार सेवा ६५ एकर, पत्राशेड, रेल्वे स्टेशन या ठिकाणी दिली जाते. गोरगरीब व गरजू लोकांना वर्षभर लागणारी औषधे, गरोदर महिलांसाठी औषधे, चष्मे, ऑपरेशन, गाव तलाव खोलीकरण, रुंदीकरण करून दिले जातात. कोरोना काळात या संस्थेने संत तुकाराम महाराज, संत एकनाथ म हाराज, संत सोपानकाका महाराज, संत निवृत्तीमहाराज या पालखीतील भक्तांना आषाढी वारीत उच्च प्रतीचे मोफत अन्नदान केले असल्याचे केंद्रप्रमुख संपत वाघाटे यांनी सांगितले.

# अर्जुन व्हटकर यांच्या 'चलबट' या आत्मचरित्रास कोल्हापूर येथील दमसाचा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.अर्जुन व्हटकर यांच्या ''चलबट''या आत्मचरित्रास दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांच्यातर्फे पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे.






या पुरस्काराचे वितरण हे दिनांक २४ मे रोजी कोल्हापूर येथे सकाळी १०.३० वाजता शेठ रामभाई सामाणी स्मृती हॉल, शिवाजी उद्यमनगर,कोल्हापुर येथे होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र ठाकूर,धनंजय बिजले, रम ेश साळुंखे,नीलाबंरी कुलकर्णी शशिकांत चौधरी इत्यादी अनेक साहित्यिकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अर्जुन व्हटकर यांच्या ''तुंबण''या कथासंग्रास यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा कै.ग.ल.ठोकळ हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. मुक्या जंगलाची गर्जना या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा कै. पंजाबराव देशमुख पर्यावरण पुरस्कार तसेच मध्य प्रदेश शासनाचा भोपाळ साहित्य अकादमीचा कवी कै. भा.रा.तांबे या पुरस्काराने सन्म ानीत करण्यात आलेले आहे. तसेच गंगुबाई गुरव साहित्य पुरस्कार मराठी साहित्य संघ बेळगाव, आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चरल अँड लिटरेचर नागपूर या संस्थेतर्फे दिला जाणारा ''दया पवार'' राज्यस्तरीय पुरस्कार देखील नुकताच त्यांना प्राप्त झालेला आहे. भि.ग.रोहम रे कोपरगाव पुरस्कार माहेश्वरी अर्बन बँक माढा पुरस्कार, कै. देशभक्त बळवंतराव मगर पुरस्कार, कै.गोविंदराव अदिक पुरस्कार, कै. शंकरराव पाटील पुरस्कार,सेतुबंध पुरस्कार,डिसले पुरस्कार, वरणगावकर पुरस्कार जळगाव, अशा महाराष्ट्रातील नामवंत संस्थेचे पुरस्कार अर्जुन व्हटकर यांच्या साहित्यकृतीला मिळालेले आहेत.

# अग्नीसुरक्षा उपाययोजना, फायर ऑडिटसंदर्भातील नियमांचे पालन करा

### महापालिकेचे खासगी इमारती, आस्थापना व संस्थांना आवाहन

**सोलापूर, दि. १९ मे-**

सार्वजनिक वापराच्या वर्दळ असणाऱ्या खाजगी इमारती, आस्थापना, संस्था आदींनी आग प्रतिबंधक उपाय योजना तसेच अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (फायर सेफ्टी ऑडीट) आदी नियमांचे पालन करावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने केले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, सार्वजनिक वापराच्या वर्दळ असणाऱ्या खाजगी इमारती, खाजगी शाळा कॉलेज, कोचिंग सेंटर, नर्सिंग होम, हॉस्पिटल, सिनेमा हॉल, पेट्रोल-डिझेल/इंधन पंप, गॅस गोडावून, बँक, शासकीय/निमशासकीय/ सार्वजनिक उपक्रमांची कार्यालये, मोठी/लहान व्यावसायिक कार्यालये, व्यापारी संकुले, रेस्टॉरंट व हॉटेल्स, बार व रेस्टॉरंट इत्यादी व्यावसायिक मालमत्ताधारकांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (सुधारित अधिनियन २०२३) चे कलम ३ (१) अन्वये इमारत अथवा तिच्या भागामध्ये आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांची तरतूद करावी. संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याकडून आवश्यक असलेली तात्पुरती आग संरक्षण मान्यता किंवा अंतिम आग संरक्षण मान्यता किंवा यथा स्थिती, आग संरक्षण नूतनीकरण करावी. अग्निशमन साहित्य व उपकरणे नेहमी दुरुस्त आणि कार्यक्षम ठेवावीत. कलम ३ (३) नुसार मालक व भोगवटधारक यांना लायसन्सप्राप्त अभिकरणाकडून आग प्रतिबंधक उपायोजना पुरेशा प्रमाणात व वेळोवेळी त्या कार्यक्षम आहे याची खात्री करून दर सहा महिन्यातून एकदा आग परिक्षण करून घेणे व त्रुट्यांचे निराकरण करणे कायदेशीर बंधनकारक आहे.या सर्व बाबीसाठी लायसन्सिंग एजन्सीकडून पूर्तता करून घ्यावी व त्यांच्या इमारत अथवा तिच्या भागामध्ये आग परिक्षण करून हीच अंतिम नोटीस समजून अहवाल महानगरपालिका अग्निशमन विभागात सादर करावा.

### नियमांचे पालन न केल्यास होणार फौजदारी कारवाई

आग प्रतिबंधक उपाययोजना न करणे, इमारतीचे आग परिक्षण न करणे अथवा अग्निशमन साहित्य व उपकरणे न बसविणे अथवा अग्निशमन साहित्य व उपकरणे नेहमी दुरुस्त आणि कार्यक्षम न ठेवत व्यवसाय करीत असल्यास व अपघाताने आग लागून जागेचे, प्रतिष्ठानाचे, तेथे वावरणाऱ्या मनुष्यबळाचे, त्यात येणारे जाणारे करीत असलेल्या सर्वसाधारण नागरिकांना जिवित, वित्तीय व इतर प्रकारचे हानी झाल्यास व्यवसाय करणाऱ्यास जबाबदार ठरविण्यात येईल. अधिनियम अन्वये फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

# स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलर योजनेचा लाभ घ्या : निवास नरबट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१९ मे -**

वीज बिलातून दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉफ सोलार योजना जाहीर केली आहे. योजनेअंतर्गत केंद्राबरोबर राज्य शासनाकडून अतिरिक्त अनुदान देणार आहे. योजनेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन म हावितरण कार्यालय नाझरे (ता. सांगोला) येथील कनिष्ठ अभियंता निवास नरबट यांनी केले आहे.

नाझरे महावितरण कार्यालय अंतर्गत नाझरे, वझरे, बलवडी, अनकढाळ, चिनके, वाटंबरे, चोपडी, उदनवाडी, कारंडेवाडी, झापाचीवाडी, पाचेगाव या गावातील सुमारे ३ हजार ३०० ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. यामध्ये पुढे वाढ होणार आहे. तसेच प्रथम प्राधान्य तत्त्वावर राबवण्यात येणार आहे. स्मार्ट योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना ३५, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील अनुसूचित जाती व जमातीतील लाभार्थ्यांना ३० तर सर्वसाधारण गटाला २० टक्के अतिरिक्त अनुदान राज्य शासनाकडून देणार आहे.

### केंद्र व राज्य सरकारकडून अनुदान

एक किलो वॅट सौर प्रकल्पासाठी अंदाजे ५० हजार रुपये खर्च गृहीत धरून केंद्र शासनाकडून ३० हजार रुपये अनुदान मिळत आहे. याशिवाय दारिद्र्यरेषेखाली ग्राहकांना राज्य शासनाकडून १७ हजार ५०० रुपये अनुदान मिळणार असून त्यांना केवळ २ हजार ५०० रुपये खर्च करावे लागतील. आर्थिक दृष्ट्या दुर्बल ग्राहकासाठी ग्राहक हिस्सा ५ ते १० हजार रुपये दरम्यान राहणार आहे.

**– हनुमंत बनसोडे,**
उपकार्यकारी अभियंता,
महावितरण कार्यालय, हातीद

**PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE**
**19/1, KEGAON -SOLAPUR**
Ph.No. 0217- 2500440, 2500441 Fax No.0217 – 2500613
Email : pdudentalcollege@rediffmail.com, Web site: www.pdudentalcollege.co.in

**WANTED**

Application are invited, in the prescribed format from the eligible candidates for the following posts

**Principal, Professor, Associate Professor (Reader), Asist. Professor (Lecturer) & Tutor**

Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on College
**Website www.pdudentalcollege.co.in**

**Last date of application is 04/06/2026 up to 4.30 pm**

**Principal**

## भोगवटादार वर्ग १ करणेबाबतची जाहीर घोषणा

तमाम लोकांना विशेषतः मौजे कुर्डू, ता. माढा, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर घोषणेद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। सोलापूर सब डि।। व ता. माढा पैकी मौजे कुर्डू येथील जमीन गट नं. ८०२ यांसी क्षेत्र २३ हे. ५५ आर, पो.ख ०० हे. ३३, असे एकूण २३ हे. ८८ आर, आकार ३१ रु. ९५ पैसे ही मिळकत उस्मान दगडुभाई शेख, समीर उस्मान शेख, भगवान सौदागर गाडे, दमयंती विकास लोखंडे, भारत भगवान गाडे, भगवान सौदागर गाडे, बापू पंढरी ढावरे, शरद मधुकर ढावरे, रोहित रामलिंग गाडे यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची अशी मिळकत असुन सदरची मिळकत ही भोगवटदार वर्ग २ ची अशी आहे. तथापि, उपरोक्त नमुद लोकांपैकी श्री. शरद मधुकर ढावरे यांनी त्यांचे मालकीचे क्षेत्र ०३ हे. ९१ आर, पो.ख. ०० हे. ०७ आर, एकूण ०३ हे. ९८ आर हे क्षेत्र भोगवटदार वर्ग १ करणेबाबत मा. तहसिल कार्यालय, माढा यांचेकडे रितसर अर्ज / प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्ताव चौकशीकामी मंडळ अधिकारी कुर्डूवाडी, तहसिल कार्यालय, माढा या कार्यालयांकडे प्रलंबित आहे. तथापी, वर नमुद मिळकतीबाबत सहधारक, लगतचे धारक किंवा अन्य कोणाचीही, कसलीही हरकत असल्यास ही जाहीर घोषणा प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत आपली तक्रार ही लेखी व पुराव्याचे कागदपत्राव्दारे मे. तहसिलदारसाहेब माढा अथवा मे. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे नोंदवाव्यात. जर वरिल मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत अगर लेखी तक्रार आली नाही अथवा दाखल झाली नाही तर वर नमुद मिळकत ही भोगवटादार वर्ग १ करणेबाबतचे प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. मुदती नंतर येणाऱ्या हरकतीचा वा तक्रारीचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर घोषणा दिली. असे तारीख २०/०५/२०२६

सही/-
**(ॲड. अनुप बंडोपंत वस्त्रे)**
**बी.ए., एल.एल.बी., ॲडव्होकेट**
**श्रीराम नगर, माढा, ता. माढा जि. सोलापूर**

**Advertisement**

**Solapur Social Association**
**Jr. College of Education (DLed/D.Ed)**

New Building Siddheshwer Peth, Solapur.
**Affiliated NCTE, Delhi.**

Application's are Invited for the Following post.

| No. | Subject | Qualification |
|---|---|---|
| 1 | English | M.A., B.Ed. / M.Ed. |
| 2 | Hindi / Marathi | M.A., B.Ed. / M.Ed. |
| 3 | Sports Teacher | M. PEd |
| 5 | Art Teacher Diploma | Post Graduation and Diploma in ATD |

**sd/-**
**PRINCIPAL**
S.S.A. JR. College of Education,
(Ded), Solapur

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अर्ज नं. २३/२०२६ निशाण नं. ५
पुढील नेमलेली दि. ०३/०७/२०२६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यू. डि. सो. यांचे कोर्टात**

**बालाजी लिंबा जाधव,**
वय - ५५ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. कळंबवाडी (पा) विरुध्द
ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**कोणीही नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांची आई मयत यशोदा लिंबा जाधव, हे दि. २७/०९/२०२० रोजी मौजे कळंबवाडी (पा), ता. बार्शी येथे वयामोनामुळे मयत झालेली आहे. यातील मयत यशोदा लिंबा जाधव यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदार यांची आई यशोदा लिंबा जाधव यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला सर्व शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ व मयत यशोदा लिंबा जाधव यांचे नावार घरकुल मंजुर झालेले असून सदर घरकुलाचा लाभ घेण्यासाठी कार्यालयात गेले असता यातील शासकीय अधिकारी यांनी त्यांना मयत यशोदा लिंबा जाधव यांचे मे. कोर्टातून वारस प्रमाणपत्र आणण्यासाठी सांगितले असता अर्जदारांचा सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत यशोदा लिंबा मोरे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ०३/०७/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. १५/०५/२०२६

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, बार्शी**

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, बार्शी**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंगचे काम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (S&T) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांच्याकडून सक्षम आणि नामांकित कंपन्या व कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवण्यात येत आहेत. ही निविदा प्रक्रिया रेल्वेच्या अधिकृत ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर राबवली जात आहे. या निविदेचा सूचना क्रमांक SUR-N-T-2026-27-10 असून, ही सूचना दिनांक 18/05/2026 रोजी जारी करण्यात आली आहे.

या अंतर्गत मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध पूल आणि रिटेनिंग वॉल (संरक्षक भिंतींच्या) कामांच्या ठिकाणी S&T (सिग्नल आणि टेलिकॉम) केबल्स तसेच उपकरणांचे संरक्षण व स्थलांतरण करण्याचे काम केले जाणार आहे. या कामाची अंदाजित किंमत 68,18,889.41 रुपये असून, यासाठी निविदा फॉर्मची कोणतीही किंमत आकारली जाणार नाही (फॉर्म मोफत आहे). कंत्राटदारांना यासाठी 1,36,400 रुपये बयाणा रक्कम (EMD) जमा करावी लागेल. हे काम पूर्ण करण्यासाठी 12 महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या निविदेसाठी www.ireps.gov.in वर ऑनलाइन अर्ज करण्याची आणि निविदा बंद होण्याची अंतिम तारीख 10/06/2026 रोजी दुपारी 15:30 वाजेपर्यंत आहे.

या कामाचा सविस्तर तपशील 'ireps' वेबसाइटवर उपलब्ध आहे. या निविदे संदर्भात भविष्यात काही सुधारणा किंवा दुरुस्ती पत्रक प्रसिद्ध झाल्यास, ते केवळ वरील ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइटवरच अपलोड केले जाईल. इच्छुक कंत्राटदारांनी नोंद घ्यावी की केवळ ऑनलाइन पद्धतीने सादर केलेल्या निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल, टपाल, ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने आणून दिलेल्या कोणत्याही निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोली लावणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी आपल्या कंपनीच्या नावाने 'Class III' डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) मिळवणे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करणे बंधनकारक आहे.

बयाणा रक्कम (EMD) नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारली जाईल. जर बँक गॅरंटी दिली जात असेल, तर मूळ बँक गॅरंटीचे पत्र निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या संबंधित अधिकाऱ्याकडे, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी (अंतिम तारीख वगळून) प्रत्यक्ष जाऊन जमा करावे लागेल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक**
**AK/Sur-28** **(ST शाखा), मध्य रेल्वे, सोलापूर**

**कृपया तुमच्या जनावरांना रेल्वे मार्गापासून दूर ठेवा.**

## श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज

**स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि नियम १९६१ चा नियम क. १०७ (११) (ई) अन्वये मे. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज, ता. माळशिरस, जि.सोलापूर

तमाम लोकास कळविण्यात येते की, वरील संस्थेच्या विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी जप्त केलेल्या खालील नमुद केलेल्या स्थावर मिळकतींचा जाहीर लिलाव खाली नमुद केलेल्या वेळी नमुद ठिकाणी ठरल्याप्रमाणे केला जाईल. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या वेळी वाचून दाखवल्या जातील. तरी गरजुंनी या संधीचा अवश्य फायदा घ्यावा. जादा माहिती श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव जामिनदाराचे नाव | मिळकतदाराचे नाव | मिळकत ठिकाण | मिळकत कमांक | क्षेत्र चौ.मि. हे/आर | ३१/०१/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रविण बाळासो साळुंखे<br>दिपक लिंबाजी आवटे<br>राजु संभाजी खिलारे | प्रविण बाळासो साळुंखे | शिवाजीनगर माळेवाडी अ. | ५७/२/ब/१/१ | ०.०२ | ५,०५,८४७/- |
| २ | दिपक रामचंद्र थोपटे<br>दौलत नारायण धुमाळ<br>आयेशा निजाम शेख | सौ. लता दिपक थोपटे | राउतनगर अकलूज | १४८/१/ब/२/ ब/२/ब/१ | ०.०१ | १,४७,८९४/- |
| ३ | महेश प्रेमराज जगदाळे<br>प्रेमराज निवृत्ती जगदाळे<br>ज्ञानदेव रामचंद्र कोकाटे | महेश प्रेमराज जगदाळे | राउतनगर अकलूज | १४३/१/ब/२/ब/१ | ०.१० | ५,४८,८४७/- |
| ४ | अनिल राणोजी घोडके<br>अजिनाथ लक्ष्मण पवार<br>सौ. साधना अनिल घोडके | सौ. साधना अनिल घोडके | शंकरनगर अकलूज | ८२/१/अ/८ | ०१.६१.५० चौ.मिटर | ३,५२,२४०/- |
| ५ | भानुदास कुंडलिक धाईंजे<br>नामदेव सिताराम धाईंजे<br>शकिल सत्तार शेख | भानुदास कुंडलिक धाईंजे | कोंडबावी | ५९०/१/१२<br>५९०/१/६ | ०.६४<br>०.३५ | ५,६४,९३७/- |

**लिलावाचे ठिकाण : श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज**
**दिनांक व वेळ : ०३/०६/२०२६ सकाळी ११.०० वाजता.**

**टीप:** १. लिलावात भाग घेण्यासाठी बयाणा रक्कम रु.१०,०००/- रोख लिलावापूर्वी भरणा करावी लागेल.
२. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावापूर्वी वाचून दाखवल्या जातील.
३. कोणतेही कारण न देताही लिलाव रद्द व तहकूब करणेचे अधिकार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**ठिकाण : अकलुज**
**दिनांक: १९/०५/२०२६**

(सील)

सही/-
**श्री. गोपीचंद अरुण तुकशेट्टी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**




## महत्त्वाचे

### बुद्धिबळ : प्रज्ञानंदची वेस्लीविरुद्धची लढत बरोबरीत

**बुखारेस्ट** : भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंद याची सुपर बुद्धिबळ क्लासिक स्पर्धेतील पाचव्या फेरीची लढत अमेरिकेच्या वेस्ली सोविरुद्ध बरोबरीत सुटली. अशाप्रकारे भारतीय ग्रॅण्डमास्टरची चौथी लढत बरोबरीत राहिली. ही स्पर्धा ग्रॅण्ड बुद्धिबळ स्पर्धेचा एक भाग आहे. अशा या स्पर्धेच्या पाचव्या फेरीतील एकही सामना निर्णायक ठरला नाही, तर सर्वच डाव बरोबरीत राहिले. जर्मनीच्या विन्सेंट कीमरचा सामनाही बरोबरीत राहिल्यामुळे त्याने अर्ध्या गुणाची कमाई करीत ३.५ गुणांसह आपली आघाडी कायम राखली. कीमरखाली प्रज्ञानंद, नेदरलॅण्डचा अनिश गिरी आणि जॉर्डनचा वॅन फोरेस्ट यांचा क्रम आहे. या तिन्ही खेळाडूंच्या खाती प्रत्येकी तीन गुण जमा असून ते संयुक्तरीत्या दुसऱ्या स्थानावर आहेत. फ्रान्सचा मॅक्सिम वाचियर लाग्रेव व वेस्ली सो प्रत्येकी २.५ गुण घेत पाचव्या स्थानी आहेत. अमेरिकेचा फॅबियानो कारुआना, विश्व अजिंक्यपदाचा दावेदार उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव हे प्रत्येकी दोन गुणांसह त्यांच्या मागे आहेत. रुमानियाचा बोगदान डॅनियलच्या खाती १.५ गुण असून तो नवव्या स्थानी आहे.तर दहाव्या स्थानी असलेला फ्रान्सचा अलीरेजा फिरोजला आतापर्यंत फक्त एकच गुण मिळविता आला आहे.

### फुटबॉल अभ्यासवर्गात १९ प्रशिक्षकांचा सहभाग



**बेल्लारी** : अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) १४ ते १८ मे दरम्यान येथील इंस्पायर इंस्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स येथे एएफसी फिटनेस कोर्सचे (लेव्हल १ ए) आयोजन केले होते. या अभ्यासवर्गात देशातील सुमारे १९ प्रशिक्षकांनी सहभाग नोंदविला होता. जपानचे एएफसी प्रशिक्षक मिकिनोबू यासुमात्सू आणि अत्सुशी कानो यांच्याद्वारे संचालित या अभ्यासवर्गात एआयएफएफचे प्रशिक्षक विभाग प्रमुख विवेक नागुलही उपस्थित होते. हा एएफसी फिटनेस कोर्स लेव्हल १ ए आणि लेव्हल १ बी असा दोन टप्प्यात आयोजित केला जात असतो. लेव्हल १ बी कोर्स पुढील वर्षी होणार आहे. हा अभ्यासक्रम भारतीय फुटबॉल प्रणालीत कार्यरत प्रशिक्षकांच्या शिक्षण आणि फिटनेस प्रशिक्षण मानकांना मजबूत करण्यासाठी एआयएफएफच्या योजनेचा एक भाग असतो.

### अम्साकरूनन, अर्जुनने पोपोव बंधूंना हरविले

**क्वालालम्पूर** : भारताच्या अष्मिता चालिहाने चीन तायपेयीच्या पाय यू पो हिला तीन सेटच्या संघर्षानंतर पराभवाचा दणका दिला आणि मलेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेतील महिला एकेरीच्या मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश मिळविला. दरम्यान, पुरुष दुहेरीत हरिहरन अम्साकरूनन आणि एम. आर. अर्जुन यांनी सातवे मानांकन असलेल्या फ्रान्सच्या क्रिस्टो आणि टोमा ज्युनियर या पोपाव बंधूंचा २१-१९, २१-१५ असा पराभव करीत स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळविला आहे. त्यांची पुढील लढत इंडोनेशियाच्या लियो रोली कार्नांडो व डॅनियल मार्टिन विरुद्ध चीनचे हू की युआन व लीन शियांग यांच्यात होणाऱ्या लढतीतील विजेत्याविरुद्ध होईल. पात्रता फेरीतील सामन्यात चालिहाने यू पोवर २१-१३, १६-२१, २१-१६ अशी मात दिली. मुख्य ड्रॉमधील पहिल्या फेरीत तिचा सामना जागतिक क्रमवारीत ५६ व्या स्थानी असलेल्या इंडोनेशियाच्या टी. रामाधानी वीर्यावानविरुद्ध होणार आहे. भारताच्या आकर्षी कश्यपला मात्र कोरियाच्या पार्क गा युनकडून २१-१५, २०-२२, ७-२१ असा पराभव पत्करावा लागला.

### इंडियन ओपन सर्फिंग स्पर्धा २९ मेपासून

**मंगळुरू** : जपानच्या यजमानपदाखाली वर्षाअखेरीस होणाऱ्या आशियाड क्रीडा स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली इंडियन ओपन सर्फिंग स्पर्धा येथील ब्लू बे तन्निरभावी इको बीचवर २९ ते ३१ मे दरम्यान आयोजित केली जाणार आहे. भारतीय सर्फिंग महासंघाच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड जपानच्या आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाड क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भारतीय संघासाठी केली जाणार आहे, अशी माहिती भारतीय सर्फिंग महासंघातर्फे देण्यात आली आहे. याआधी भारतीय खेळाडूंच्या तयारीच्या दृष्टीने लिटिल अंदमान प्रो २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर आता इंडियन ओपन २०२६ स्पर्धा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा मालिकेतील दुसरा टप्पा आहे.

# मिचेल मार्श; जोश इंग्लिसची अर्धशतके, शतकी भागीदारी

◆ **जयपूर, १९ मे**

दिवा विझताना मोठा होतो म्हणतात, त्याचा प्रत्यय आज इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात आला. प्लेऑफच्या स्पर्धेतून बाहेर पडलेल्या लखनौ सुपर जायंट्स संघाने प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी धडपडत असलेल्या राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध साखळी सामना खेळताना धमाकेदार फलंदाजी केली. मिचेल मार्श आणि जोश इंग्लिस या सलामीच्या जोडीने आपल्या संघासाठी सुरेख सुरुवात करून देत स्वतः अर्धशतकी धावा केल्या, तसेच सलामीला शतकी भागीदारी केली. त्यांच्या या कामगिरीमुळेच लखनौ संघाने निर्धारित २० षटकांत पाच फलंदाज गमावून २२० धावांपर्यंत मजल मारली होती. डाव संपायला दोन चेंडू शिल्लक असताना मिचेल मार्श धावबाद झाला त्यामुळे त्याला अवघ्या चार धावांनी शतकाला मुकावे लागले.



अर्धशतक पूर्ण केल्यानंतर चाहत्यांना अभिवादन करताना मिचेल मार्श. मार्शचे शतक मात्र अवघ्या चार धावांनी हुकले

नियमित कर्णधार रियान पराग जखमी झाल्यामुळे त्याने बाहेर बसण्याचा निर्णय घेतल्यानंतर यशस्वी जयस्वालकडे राजस्थान संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. त्याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. राजस्थानने फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यानंतर मार्श आणि इंग्लिस यांनी लखनौच्या डावाचा दमदार प्रारंभ केला. या दोघांनी सलामीला ८.२ षटकांत १०९ धावा जोडल्या. राजस्थानसाठी डोकेदुखी ठरू पाहात असलेली ही जोडी यशराज पुंजाने तोडली. त्याने त्रिफळा उडविण्यापूर्वी इंग्लिसने २९ चेंडूंची आक्रमक फलंदाजी करीत सात चौकार आणि तीन षटकार हाणले. त्याने ६० धावांचे योगदान दिले. त्याची जागा घेणारा निकोलास पूरन मात्र अवघ्या १६ धावांचे योगदान देऊन बाद होऊन परतला. ११ चेंडूंच्या फलंदाजीत त्याने दोन चौकार मारले. त्याने मार्शसोबत दुसऱ्या गड्यासाठी ४२ धावांची भागी केली.



आक्रमक फलंदाजी करणारा जोश इंग्लिस षटकार खेचताना

एका बाजूला दोन फलंदाज बाद झाले असताना मार्शने कधी आक्रमक तर कधी संयमी फलंदाजी करीत धावफलक हलता ठेवला. त्याने एक बाजू समर्थपणे सांभाळली असताना फलंदाजीला आलेल्या कर्णधार ऋषभ पंतने त्याला तिसऱ्या गड्यासाठी ६४ धावांची समर्थ व संयमी साथ दिली. धावबाद झालेल्या ऋषभने २३ चेंडूंत ३५ धावा काढल्या. यात प्रत्येकी दोन चौकार व षटकारांचा समावेश होता. ५७ चेंडूंची आक्रमक फलंदाजी करणारा मार्श दुसरी धाव घेण्याच्या नादात धावबाद झाला. ११ चौकार आणि पाच षटकारांसह ९६ धावा ठोकणाऱ्या मार्शला जयस्वालने धावबाद केले. मार्श बाद झाला, त्याच्यापाठोपाठ शेवटचा चेंडू खेळण्यासाठी आयुश बदानी फलंदाजीला आला असताना जोफ्रा आर्चरने त्याचा त्रिफळा उडविला. त्यावेळी दुसऱ्या टोकाला अब्दुल समद होता. त्याला धावांचे खातेही उघडता आले नाही.

या सामन्याआधी १२ सामने खेळत चार विजय आणि आठ पराभवांसह आठ गुण मिळविणारा चेन्नईचा संघ गुणतालिकेत एकदम तळाला म्हणजे दहाव्या स्थानी आहे. त्यामुळे त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. याउलट राजस्थान संघ १२ सामन्यांत प्रत्येकी सहा जय-पराजयासह १२ गुण घेत पाचव्या स्थानी आहे. चार संघांच्या प्लेऑफमध्ये प्रवेश करायची त्यांना संधी आहे. मात्र, त्यांचे जर तरचे गणित कायम आहे. तीन संघांनी आधीच प्लेऑफमध्ये प्रवेश मिळविला असल्यामुळे इतर पाच संघांमध्ये प्लेऑफच्या चौथ्या जागेसाठी संघर्ष दिसत आहे. त्यात राजस्थान संघाचाही समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)

# कोलकातासाठी आज 'करो या मरो'ची लढत

### मुंबई रोखणार मार्ग?

◆ **कोलकाता, १९ मे**

सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील गुणतालिकेत आठव्या आणि नवव्या स्थानी असलेले अनुक्रमे कोलकाता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स हे दोन संघ उद्या येथील ईडन गार्डन्सवर होणाऱ्या महत्त्वपूर्ण सामन्यात समोरासमोर उभे ठाकणार आहेत. हा सामना मुंबईसाठी केवळ औपचारिकता असला तरी कोलकातासाठी 'करो या मरो'स्थितीचा महत्त्वपूर्ण सामना आहे. या सामन्यातील विजयावरच कोलकाताचे यंदाच्या स्पर्धेतील पुढील भविष्य ठरणार आहे, तर मुंबई त्यांचा हा मार्ग रोखण्याचा पुरेपूर प्रयत्न करेल, असे दिसून येते. मात्र, यजमान संघाला घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा होऊ शकतो.

मुंबईचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर पडला आहे. मात्र, हा संघ प्लेऑफच्या शर्यतीत असलेल्या कोलकाता संघाचे समीकरण बिघडवू शकतो. या सामन्यात मुंबईने जर पराभवाचा दणका दिला तर अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील कोलकाता संघ सलग दुसऱ्या वर्षी प्लेऑफच्या प्रवेशापासून वंचित राहील. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात जेतेपद पटकाविणारा कोलकाता संघ एक वर्षानंतर म्हणजे २०२५ सालच्या स्पर्धेत आठव्या स्थानी राहिला होता. यंदा उद्या मुंबईविरुद्ध विजय प्राप्त केल्यानंतरही कोलकाता संघ प्लेऑफमध्ये दाखल होणार नाही तर शनिवारी होणाऱ्या लखनौ सुपर जायंटस आणि पंजाब किंग्ज या सामन्याच्या निर्णयावर त्यांचे भवितव्य ठरणार आहे. या सामन्यात पंजाब बाजी मारण्यात यशस्वी झाला तर मग कोलकाताची रविवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणारी लढत केवळ औपचारिक राहील. विद्यमान विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद या संघानी आधी प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित केले आहे. लखनौ सुपर जायंट्स आणि मुंबई इंडियन्स स्पर्धेतून आधीच बाद झाले आहेत. त्यामुळे आता पंजाब किंग्ज (१३ गुण), राजस्थान रॉयल्स (१२), चेन्नई सुपर किंग्ज (१२), दिल्ली कॅपिटल्स (११) या उर्वरित संघांमध्ये प्लेऑफच्या प्रवेशासाठी चुरस आहे. यापैकी राजस्थान आणि कोलकाता



या दोन संघांचे प्रत्येकी दोन सामने शिल्लक आहेत. राजस्थानचे समीकरण सरळसोपे आहे. उर्वरित सामन्यात लखनौ आणि मुंबईचा पराभव करून एकूण १६ गुणांसह थेट प्लेऑफमध्ये प्रवेश मिळविणे. दुसरीकडे कोलकातासाठी मात्र हे आव्हान सोपे नाही. त्यांना आपले उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागेलच शिवाय पंजाब संघ लखनौकडून पराभूत होईल, अशी प्रार्थना करावी लागेल. पंजाबचा नेट रनरेट कोलकातापेक्षा चांगला आहे. कोलकाताने गेल्या सहापैकी पाच सामन्यांमध्ये विजय मिळविला आहे. मात्र, स्पर्धेच्या सुरुवातीला त्यांची कामगिरी अतिशय खराब होती. त्याचा फटका त्यांना सहन करावा लागला आहे. आपल्या संघाला विजयीपथावर आणण्यासाठी नियोजन करताना कर्णधार रहाणे आणि प्रशिक्षक अभिषेक नायर यांना सात सामने वाट पाहावी लागली होती.

कोलकाताचा फिल ॲलनला अग्रफळीत खेळताना सूर गवसला आहे. त्याने याआधीच्या तीन डावांमध्ये एक शतक आणि ९३ धावांची आक्रमक फलंदाजी केली आहे. युवा यष्टिरक्षक-फलंदाज अंगकृष रघुवंशी आणि कॅमरन ग्रीन यांचा आत्मविश्वास चांगल्या कामगिरीमुळे दिवसेंदिवस दुणावत चालला आहे. आघाडीच्या फळीत रहाणे एकमात्र फलंदाज अजूनपर्यंत चांगली कामगिरी करू शकलेला नाही. उपकर्णधार रिंकू सिंहने मधल्या फळीत फिनिशरची आपली भूमिका चांगली पार पाडली आहे. कोलकातासाठी गोलंदाजी विभागात मथीशा पथिराना आणि वरुण चक्रवर्ती यांच्या दुखापती चिंतेचा विषय आहे.

मुंबई इंडियन्स आपल्या निराशाजनक सत्राचा शेवट विजयाने करण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे. कर्णधार हार्दिक पांड्या शेवटच्या सामन्यात का होईना चांगली कामगिरी बजावण्याची अपेक्षा आहे. तो दुखापतीमुळे याआधीचे तीन सामने खेळला नव्हता. मात्र, त्याने काल सोमवारी कसून सराव केला. तशीही हार्दिकने अजूनपर्यंत चांगली कामगिरी केलेली नाही. त्याने आठ डावांमध्ये २०.८५ च्या सरासरीने १४६ धावा केल्या, तसेच सुमारे ११.९० च्या इकॉनॉमी रेटने केवळ चारच फलंदाज बाद करण्यात त्याला यश आले आहे. यंदाच्या सत्रात मुंबईचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवही अपेक्षित कामगिरी करू शकलेला नाही. तसेच रोहित शर्मा आणि तिलक वर्मा यांनाही आपल्या खेळाचे सातत्य राखता आलेले नाही. ◂(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स**

**स्थळ** : ईडन गार्डन्स, कोलकाता

**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# ऋषभ पंतला अफगाणिस्तानच्या वनडे मालिकेतून वगळले

### कसोटीचे उपकर्णधारपदही गमावले

◆ **गुवाहाटी, १९ मे**

यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंत याला अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या आगामी एकमेव कसोटी सामन्यासाठी भारतीय संघाच्या उपकर्णधारपदावरून हटविण्यात आले आहे. याशिवाय या मालिकेदरम्यान होणाऱ्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेसाठीही त्याला संघात सहभागी करून घेण्यात आलेले नाही. पंतच्या जागी के. एल. राहुल याला भारतीय कसोटी संघाचा उपकर्णधार करण्यात आले आहे. शुभमन गिल दोन्ही संघांचा कर्णधार आहे. सीनियर अष्टपैलू रवींद्र जडेजा याला कसोटी सामन्याच्या संघात स्थान न देता त्याला विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे.



अजित आगरकरच्या नेतृत्वाखालील बीसीसीआयच्या वरिष्ठ गट पुरुष संघ निवड समितीची बैठक आज येथे पार पडली. यात मायदेशात होणाऱ्या अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी संघाची निवड करण्यात आली. मालिकेतील एकमेव कसोटी सामना ६ जूनपासून मुल्लांपूर येथे खेळला जाणार आहे. तीन वनडे सामने १४ जूनपासून धर्मशाळा, लखनौ आणि चेन्नई येथे खेळले जातील.

फिरकीपटू मानव सुतार आणि वेगवान गोलंदाज गुरनूर बरार यांची पहिल्यांदा कसोटी संघासाठी निवड करण्यात आली आहे. हे दोघेही आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स संघाचे सदस्य आहेत. वनडे संघात प्रिन्स यादवला स्थान मिळाले आहे. जाहीर झालेले दोन्ही संघ असे-

- **कसोटी संघ** : शुभमन गिल (कर्णधार), यशस्वी जयस्वाल, के. एल. राहुल, साई सुदर्शन, ऋषभ पंत, देवदत्त पडिक्कल, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, मानव सुतार, गुरनूर बरार, ध्रुव जुरेल आणि हर्ष दुबे.
- **वनडे संघ** : शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, के. एल. राहुल, ईशान किशन, हार्दिक पांड्या, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, प्रसिद्ध कृष्णा, प्रिन्स यादव, गुरनूर बरार आणि हर्ष दुबे.

◂(वृत्तसंस्था)

# टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ मजबूत

### स्मृती मंधानाने व्यक्त केला विश्वास

◆ **मुंबई, १९ मे**

पुढील महिन्यात होणाऱ्या महिलांच्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघ मजबूत स्थितीत आहे आणि स्पर्धेत चांगली कामगिरी बजावेल, असा विश्वास भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधाना हिने व्यक्त केला आहे.

महिलांची ही टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा १२ जूनपासून इंग्लंड ॲण्ड वेल्स येथे खेळली जाणार आहे. वनडे क्रिकेटच्या विश्वचषक स्पर्धेचा विजेता भारत संघ १४ जून रोजी आपला परंपरागत प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध सामना खेळून टी-२० विश्वचषक अभियानाची सुरुवात करणार आहे.



येथे एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी बोलताना मंधाना म्हणाली की, आमचे सराव शिबिर खूप चांगले झाले. मी या संदर्भात सध्या तरी एवढेच सांगू शकते. मला या संदर्भात काही विशिष्ट माहिती देता येणार नाही. आम्ही अनेक क्षेत्रांवर भर देऊन कसून सराव केला आहे. विश्वचषक स्पर्धा जवळच येऊन ठेपली असल्यामुळे त्यावर मी जास्त काही बोलू शकणार नाही.

मात्र, एवढे सांगू शकते की, सर्व खेळाडू चांगल्या व मजबूत स्थितीत आहे आणि स्पर्धेत खेळण्यासाठी उत्सुक आहेत. त्यांनी कसून सराव केला असून या सराव शिबिरात सर्व खेळाडूंनी कठोर परिश्रम घेतले आहे, असे तिने सांगितले. भारताच्या १५ सदस्यीय संघाने बंगळुरूस्थित सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) येथील सराव शिबिरात भाग घेतला होता. हा संघ आता विश्वचषक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने आधीच इंग्लंडला जाणार असून तेथे यजमान इंग्लंड संघाविरुद्ध तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. हा संघ २२ मे रोजी रवाना होणार आहे.

विश्वचषक स्पर्धेच्या दृष्टीने आमची चांगली तयारी सुरू आहे. मात्र, त्याआधी आम्ही एक मालिकाही खेळणार आहोत. आमची तयारी जोमात सुरू असून पुढेही आम्ही मेहनत घेत राहणार आहोत. मला पूर्ण विश्वास आहे की आम्ही विश्वचषक जिंकून आपल्या देशाचे नाव गौरवान्वित करू, असेही स्मृती म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)



मास्टर ब्लास्टर म्हणून आपली ओळख निर्माण करणारा सचिन तेंडुलकर मंगळवारी अहमदाबाद येथील एसआरटी १० एल्टेवॉल सेंटर ऑफ एक्सलन्स क्रिकेट ॲकॅडमी येथे पोहोचला. यावेळी त्याने तेथील उदयोन्मुख खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक व पालक यांच्याशी संवाद साधला. त्याच्या उपस्थितीमुळे ॲकॅडमीत चैतन्य निर्माण झाले होते. तेथे उपस्थित खेळाडूंनी आपल्या बॅट्स समोर करून त्याच्याकडे स्वाक्षरीचा आग्रह धरला, तो क्षण...

### क्लासेन ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आघाडीवर

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धा एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. ज्याप्रमाणे चषकासाठी वेगवेगळ्या संघांमध्ये चुरस असते त्याच प्रकारे गोलंदाजी व फलंदाजीतील सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या खेळाडूंना मिळणाऱ्या ऑरेंज आणि पर्पल कॅपसाठी खेळाडूंमध्येही शर्यत लागलेली असते. ज्याप्रमाणे प्लेऑफच्या चौथ्या स्थानासाठी स्पर्धेला रंगतदार वळण आले असताना ऑरेंज कॅपसाठीही सनरायझर्स हैदराबादचा धुरंधर फलंदाज हेनरिक क्लासेन याने आपला दावा मजबूत केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मुंबईचे डिकॉक, राज बावा दुखापतीमुळे आयपीएलबाहेर

◆ **कोलकाता, १९ मे**

मुंबई इंडियन्सचा यष्टिरक्षक-फलंदाज क्विंटन डिकॉक आणि वेगवान गोलंदाज व अष्टपैलू क्रिकेटपटू राज अंगद बावा हे दोघेही दुखापतीमुळे आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या बाहेर झाले आहेत.



राज बावा

प्लेऑफच्या शर्यतीतून आधीच बाद झालेल्या मुंबईला स्पर्धेत आणखी दोन साखळी सामने खेळायचे आहेत. हा संघ बुधवारी कोलकाता आणि रविवारी राजस्थान रॉयल्सविरुद्ध झुंज देणार आहे. डिकॉकच्या डाव्या हाताच्या मनगटाला दुखापती झाली आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्याच्या आधी तो जखमी झाला होता. राज बावा पंजाबविरुद्धच्या सामन्यात जखमी झाला होता, त्याच्या उजव्या हाताच्या अंगठ्याला दुखापत झाली आहे. यंदाच्या सत्रात डिकॉक तीनच सामने खेळला आहे. त्याने १६ एप्रिल रोजी पंजाबविरुद्ध यंदाचा पहिला सामना खेळताना नाबाद ११२ धावा काढल्या होत्या. त्याने याआधीचा आपला शेवटचा सामना २३ एप्रिल रोजी चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध खेळला होता. त्यानंतर सनरायझर्सविरुद्धच्या सामन्याच्या आधीच्या सराव सत्रात चेंडू लागल्यामुळे तो जखमी झाला होता, त्यामुळे त्याला या सामन्याला मुकावे लागले होते. बावानेही यंदाच्या स्पर्धेत मुंबईकडून तीन सामने खेळले आहेत. क्विंटन आणि बावा आता आपापल्या घरी राहून उपचार घेणार आहेत. त्यांना मुंबईची मेडिकल चमू पूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन करणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### भारतात प्रतिभावान खेळाडूंची कमतरता नाही : व्हाईट

◆ **भोपाळ, १९ मे**

भारतात प्रतिभावान खेळाडूंची कमतरता नाही, अशी प्रतिक्रिया भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक टिम व्हाईट यांनी येथे आयोजित १८ वर्षे वयोगट भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेदरम्यान बोलताना व्यक्त केली. सहा आठवड्यांपूर्वीच व्हाईट यांनी बंगळुरू येथे भारताच्या २१ वर्षे गट संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांनी युवा खेळाडू आणि सीनियर राष्ट्रीय संघ यांच्यातील समन्वयाच्या मजबूत संबंधावर भर दिला. मी भोपाळला येऊन १८ वर्षे गट संघाचे मूल्यांकन करण्यासाठी खूप उत्सुक होतो. कारण, तोच आमच्या प्रतिभेचा मुख्य स्रोत आहे. राणी रामपालसोबत माझा चांगला संवाद झाला. ती युवा संघासाठी चांगले काम करीत आहे, असेही व्हाईट म्हणाले. राणीकडे सध्या या १८ वर्षे गट मुलींच्या हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या युवा संघात १५ आणि १६ वर्षीय अनेक खेळाडू आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानला विजयासाठी १२१ धावांची गरज, तीन गडी शिल्लक

◆ **सिलहट, १९ मे**

कर्णधार शान मसूदपाठोपाठ सलमान आगा आणि मोहम्मद रिजवान यांनी केलेल्या अर्धशतकी धावांच्या जोरावर पाकिस्तानने बांगलादेशविरुद्ध येथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात चौथ्या दिवशीचा खेळ थांबला तेव्हा ७ फलंदाज गमावून ३१६ धावा केल्या होत्या. हा सामना जिंकण्यासाठी पाकिस्तानला आता १२१ धावांची गरज असून त्यांचे तळाचे तीन फलंदाज शिल्लक आहेत.

नाणेफेकीचा कौल गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या बांगलादेशचा पहिला डाव २७८ धावांवर आटोपला होता. यात लिटन दासच्या १४ चौकारांसहच्या १२६ धावांचा समावेश होता. कर्णधार नजमूल हुसैनने २९ धावांचे योगदान दिले होते. पाकिस्तानकडून खुर्रम शहजादने सर्वाधिक चार फलंदाज बाद केले होते. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघही २३२ धावांवर गडगडला होता. बाबर आझमने सर्वाधिक ६८ धावा काढल्या होत्या. बांगलादेशच्या नाहिद राणा आणि तैजुल इस्लामने प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले होते. पहिल्या डावात ४६ धावांची आघाडी घेणाऱ्या बांगलादेशने आपल्या दुसऱ्या डावात ३९० धावा काढून पाकिस्तानसमोर एकूण ४३७ धावांचे डोंगर एवढे लक्ष्य ठेवले होते. मुशफिकर रहिमने १२ चौकार व एका षटकारासह १३७ धावा काढल्यामुळे बांगलादेशला एवढे मोठे लक्ष्य ठेवता आले. लिटन दास (६९) आणि महमुदुल हसन (५२) यांनी अर्धशतकी धावा काढल्या. पाकच्या शहजादने दुसऱ्याही डावात चार फलंदाज टिपले. डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या पाकिस्तानने दुसऱ्या डावात ४१ धावांत दोन फलंदाज गमावले होते. नंतर बाबर आझमने शानसोबत तिसऱ्या गड्यासाठी ९२ धावा जोडल्या. शान मसूदने ७१ धावा केल्या. नंतर सलमान आगाने मोहम्मद रिजवानसोबत १३४ धावा जोडून आपल्या संघाला ३०० धावांचा पल्ला पार करून दिला. सलमान ७१ धावांवर बाद झाला. दिवसाचा खेळ थांबला तेव्हा रिजवान ७५ धावांवर फलंदाजी करीत होता. ◂(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### सोलापूरचा मानांकित टेनिसपटू श्लोक आळंदचा सन्मान

**सोलापूर, दि. १९ मे -**

सन २०२५ च्या वर्षात महाराष्ट्रातील मुलांच्या १० वर्षांखालील गटात प्रथम मानांकन पटकावल्याबद्दल येथील श्लोक आळंद याचा सन्मान करण्यात आला. एम.एस.एल.टी.ए. मुंबई येथे आयोजित शिष्यवृत्ती समारंभात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई उपस्थित होते.

### जिल्हा अजिंक्यपद सेपक टकरा स्पर्धा उद्या मंगळवेढ्यात

**सोलापूर, दि. १९ मे -**

सोलापूर शहर व जिल्हा सेपक टकरा असोसिएशनच्या वतीने ज्युनिअर कुमार-कुमारी व सिनियर पुरुष- महिला सेपक टकरा जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा मंगळवेढा येथे २१ मे रोजी होणार आहेत. इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथील क्रीडा संकुल हॉलमध्ये स्पर्धा सकाळी ठीक १० वाजता सुरू होतील. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी स्पर्धेच्या ठिकाणी वेळेत उपस्थित राहावे. ज्युनिअर कुमार कुमारी १ जानेवारी २००७ अशी जन्मतारीख असलेल्या खेळाडूंनी जन्म तारखेच्या पुराव्यासह स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहावे.खेळाडूंनी तीन फोटो, आधारकार्ड झेरॉक्स, जन्मदाखला झेरॉक्स आणावे. दिनांक ४ ते ७ जून दरम्यान नागपूर येथे होणाऱ्या राज्य सेपक टकरा स्पर्धेसाठी या स्पर्धेतून सोलापूर जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा सेपक टकरा असोसिएशनचे सचिव राम चंद्र दत्तू ( मो. ९४२०७८०६३३) अथवा आण्णा वाकडे( मो. ७०२८८३५४८२) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत व उपाध्यक्ष अंबादास पांढरे यांनी केले आहे.

### 'महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धा' २२ मेपासून रंगणार

**मुंबई, दि. १९ मे-**

मुंबईकर क्रिकेटप्रेमींना आता पारंपरिक क्रिकेटसोबतच वेगवान, आक्रमक आणि थरारक इनडोअर क्रिकेटची भन्नाट मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. महामुंबई इनडोअर क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे २२ ते २४ मे २०२६ दरम्यान भव्य 'महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले असून, दादरच्या ऐतिहासिक शिवाजी पार्क परिसरातील पार्क क्लबच्या अर्बन स्पोर्ट टर्फवर क्रिकेटचा हा नवा अवतार रंगणार आहे. २२ मे रोजी सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत सामने रंगणार आहेत. तर २३ आणि २४ मे रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून सामने खेळवले जाणार आहेत. इनडोअर क्रिकेटच्या भन्नाट फॉरमॅटमुळे प्रेक्षकांना प्रत्येक चेंडूवर रोमांच अनुभवायला मिळणार आहे. ८ षटकांचा वेगवान आणि रोमांचक फॉरमॅट कोर्टवर खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत प्रत्येक संघात १२ खेळाडूंचा समावेश असणार असला, तरी प्रत्यक्ष मैदानावर एका वेळी ८ खेळाडू खेळणार आहेत. प्रत्येक संघाला एक फलंदाजी आणि एक गोलंदाजी डाव मिळणार असून, प्रत्येक डाव ८ षटकांचा असेल.

## निधन वृत्त...

### अनिल वेळापूरे



**अकलूज, दि. १९ मे-**

अकलूज येथील प्रतिष्ठित व्यापारी अनिल माणिकलाल वेळापूरे (वय ६८) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहीत मुलगा, मुलगी, दोन भाऊ, भाऊजया, विवाहीत बहिण, जावई पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा एकत्रीत परिवार आहे.

### फारूक सय्यद



**सोलापूर , दि. १९ मे-**

सोलापूरचे सुपुत्र, ज्येठ बाल साहित्यिक 'गुलबुटे' या उर्दू मासिकाचे संपादक फारूक गुलाम नबी सय्यदखाँ उर्फ फारूक सय्यद (वय-६०) यांचे मुंबईत दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. मुंबई येथील नारेलवाडी कब्रस्तान येथे उद्या बुधवार दि. २० मे रोजी दुपारी २ वाजता दफनविधी करण्यात येणार आहे. सोशल प्राथमिक उर्दू शाळेचे मुख्यध्यापक आसिफ इक्बाल व सीए मौलाना शेख यांचे ते मामा होते.

# मॉडेल अ‍ॅकॅडमी, साऊथ सोलापूर आपटे रेड संघाची विजयी घोडदौड

## रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा; यश बोरामणी, सिद्धांत कांबळे सामन्याचे मानकरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

रेल्वेची ७९ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीने न्यू लाईफ क्रिकेट क्लबवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. अष्टपैल कामगिरी करणारा यश बोरामणी सामन्याचा मानकरी ठरला.

दुसऱ्या सामन्यात साऊथ सोलापूर आपटे रेड संघाने पंढरपूरच्या स्पोर्टस् प्रमोटिव्हवर ३१ धावांनी मात केली. शानदार अर्धशतक झळकाविणारा सिद्धांत कांबळे सामनावीर ठरला.

सामनावीर पुरस्कार विक्रम माने, मोहम्मद शेख, वासुदेव दोरणाल व प्रवीण कुलकर्णी, अधीक्षक विक्रम माने, प्रवीण देशेट्टी, विक्रांत पवार यांच्या उपस्थितीत देण्यात आले. प्रवीण कुलकर्णी, सोहेल शेख, महेश सोनवणे व चिराग शहा यांनी पंच म्हणून काम पाहिले. सचिन गायकवाड गुणलेखक म्हणून काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**न्यू लाईफ क्रिकेट क्लब** : सर्व बाद ७१ (निजामुद्दीन शेख १४, रिजवान शेख, यश बोरामणी ३ बळी, जय किशन पांढरे व सुदेश राठोड प्रत्येकी २, ज्योतिबा १ बळी) **पराभूत विरुद्ध मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमी:** ४.५ षटकांत बिन बाद ७३ नाबाद (विवेक अन्शी ५६, यश बोरामणी १४).

**साउथ सोलापूर आपटे रेड** : २० षटकांत ४ बाद २१३ (सिद्धांत कांबळे ६८, शरण देवरकोंडा ५७, प्रथमेश देवगावकर ५९, बालाजी औसेकर ३ बळी, आप्पा रोंगे १ बळी) विजयी **विरुद्ध स्पोर्ट्स प्रमोटिव्ह पंढरपूर:** २० षटकांत ७ बाद १८१ (बालाजी औसेकर ६०, अमोल मिसाळ ५२, निलेश पवार २४, साकिब, श्रेयस, सचिन, प्रेम, प्रशांत प्रत्येकी १ बळी)

**आजचे सामने**

**सकाळी :** एम एस आर टी सी विरुद्ध साऊथ सोलापूर आपटे ब्लू.
**दुपारी:** नॅशनल क्रिकेट क्लब विरुद्ध बिजापूर क्रिकेट क्लब



# महापालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख जगन्नाथ बनसोंडेसह ८ जणांवर चोरीचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

अतिक्रमण मोहिमेत जप्त करून स्टोअर रुममध्ये जमा केलेले जुने लोखंडी भंगार साहित्य महानगरपालिकेच्या परस्पर चोरून घेऊन जात असताना बुलडोझर बाबा अशी ओळख असलेला अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे सह टेम्पो चालकास रंगेहात पकडण्यात आले. यावेळी टेम्पो व टेम्पोमध्ये भरलेला भंगार साहित्य मिळून १ लाख ३० हजार रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात आरोपी जगन्नाथ बनसोडे सह आठ जणांविरुद्ध भंगार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनपा अतिक्रमण प्रतिबंधक प्रमुख जगन्नाथ बनसोडे, कनिष्ठ अभियंता दीपक कुंभार, स्टोअर कर्मचारी सचिन गाडे, टेम्पोचालक जमीर हैदर इनामदार (वय-४७, रा. नई जिंदगी, सोलापूर) व देखरेख करणारे कर्मचारी व अन्य तीन अनोळखी व्यक्ती अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत पालिकेचे उपअभियंता अविनाश अशोक वाघमारे यांनी फिर्याद दिली आहे.

सोलापूर शहरात ठिकठिकाणच्या अतिक्रमण मोहिमेत जप्त केलेले साहित्य महापालिकेच्या स्टोअर रूम मध्ये उघड्या जागेत ठेवले जाते.

हे जप्त करण्यात आलेले साहित्य सांभाळण्याची किंवा दंडात्मक पावती फाडून ते सोडण्याची कायदेशीर जबाबदारी यातील वरील आरोपींवर होती. मात्र आरोपींनी कुठलीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता एकमेकाशी संगणमत करून भंगार साहित्य चोरून टेम्पो (क्रं. एम एच १३ सी यु १५८३ )मध्ये भरून नेताना सोमवार रोजी दुपारी ४ वाजता महापालिका आवारात मिळून आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन पाटील हे करत आहेत.

सदर गुन्ह्यातील टेम्पो चालक जमीर हैदर इनामदार (वय-४७, रा. नई जिंदगी, सोलापूर) या आरोपीस अटक करण्यात आली असून त्याला मंगळवारी दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता न्या. पेटकर यांनी त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. यात सरकारतर्फे अ‍ॅड.ज्योती वाघमारे यांनी काम पहिल्याची माहिती या गुन्ह्याचे तपासीक अमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन पाटील यांनी दिली.

# मनाची प्रसन्नता ही यशाची गुरुकिल्ली : डॉ. उपाध्ये

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ मे -**



मनाचा थांग भल्या भल्यांना लागत नाही. संत तुकाराम, समर्थ रामदास, संत ज्ञानेश्वर आदी संतांनी मनाचे महत्त्व सांगितले आहे. प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा मनाची प्रसन्नता ठेवता येते हे संतांनी दाखवून दिले आहे, असे प्रतिपादन डॉ.संजय उपाध्ये यांनी केले.

मन करा रे प्रसन्न या विषयावर ते बोलत होते. शब्द चमत्कृतीतून होणारे विनोद, पती-पत्नी मधील विनोद, सामाजिक जीवनातील विसंगतीतून होणारे विनोद यांची मुक्त पखरण करीत डॉ उपाध्ये यांनी साध्या सोप्या शैलीतून, चिरंतन मूल्यांचे महत्त्व श्रोत्यांच्या मनावर हसत खेळत ठसवले. हसता हसता अंतर्मुख करणारा हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर आणि मायबोलीचे संस्थापक विजूभाई माढेकर यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी परिचय करुन दिला. राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ.वैशाली मोहिरे आणि पल्लवी माढेकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष जवाहर माढेकर, संचालक अरुण शहा, व्यंकटेश कुलकर्णी, सुनील पाटील,निलेश माढेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मायबोलीचे संचालक जितेंद्र माढेकर, अमिता कुलकर्णी आणि अन्य कार्यकारिणी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# के.पी. अकॅडमी, युनायटेड क्लबचे शानदार विजय

## विजय चषक क्रिकेट : श्रेयस सुरवसे, आदित्य माने सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मे-**



श्रेयस सुरवसे



आदित्य माने

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या विजय चषक क्रिकेट स्पर्धेत के. पी. क्रिकेट अकॅडमीने सोलापूर स्पोर्टस्‌वर २१५ धावांनी दणदणीत विजय मिळविला. १८९ धावांची शानदार खेळी करणारा कर्णधार श्रेयस सुरवसे सामनावीर ठरला

दयानंद कॉलेज येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या युनायटेड क्रिकेट क्लबने एमएससीसी क्लबवर ७७ धावानी मात केली. अष्टपैलू कामागिरी करणारा आदित्य माने (७४ धावा व २ बळी) सामन्याचा मानकरी ठरला. या सामन्यात पंच म्हणून चंदू मंजेली व अशोक डोंबाळे यांनी तर गुणलेखक म्हणून शुभम मुत्तुर यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**युनायटेड :** ३८.४ षटकांत सर्व बाद २३२ (आदित्य माने ७४, समर्थ बोबाडे ३०, गफुर शेख व फिरोज नादाफ प्रत्येकी २ बळी) **विजयी विरुद्ध एम एससीसी:** २३.४ षटकांत ९ बाद १५५(रफीक शाहपुरा ४०, गफुर शेख ३८, आयुष गायकवाड ३ बळी, प्रज्वल तंबाके व आदित्य माने प्रत्येकी २ बळी) **केपीसीए :** ४० षटकांत सर्व बाद ३४६ (श्रेयस सुरवसे १८९, सुबोध वाघमारे ३७, मयंक पात्रे ३५, यश हुंकारी व ओंकार मनूर प्रत्येकी तीन २ बळी) **विजयी विरुद्ध सोलापूर स्पोर्टस्‌ :** २४.१ षटकांत सर्व बाद १३१ (वेंकटेश चोघुले २२, अक्षय भिंगे २०, समर्थ वाघ ३-३१, सुबोध वाघमारे २-३० व जयंत मित्रगोत्री २-३०, यश मंगरुळे व मयंक पात्रे यांनी प्रत्येकी एक गडी)



# वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळास विजेतेपद

## जिल्हा कुमार खो-खो स्पर्धा : शेवते उपविजेते, डोणज तृतीय

**सोलापूर, दि. १८ मे-**

जिल्हा अजिंक्यपद कुमार खो-खो स्पर्धेत वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाने विजेतेपद पटकाविले.

वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथील वसंतराव काळे प्रशालेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात वेळापूरने शेवतेच्या आदर्श क्लबचा १६-१५ असा एक गुण व दोन मिनिटे राखून पराभव केला. मध्यंतराची ९-५ ही गुणाचीच आघाडी त्यांनी विजय मिळवून दिली. तृतीय स्थानासाठी झालेल्या सामन्यात डोणजच्या ए. एम. स्पोर्टस् क्लबने येथील उत्कर्ष क्रीडा मंडळाचा ९-३ असा ६ गुणांनी पराभव केले. पारितोषिके कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष समाधान काळे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी काळे प्रशालेचे पर्यवेक्षक कुमार गाजरे, सोलापूर अ‍ॅम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, पदाधिकारी शरद व्हनकडे, सोमनाथ बनसोडे, अजित शिंदे, शिवशंकर राठोड, अजित बनकर, सोनाली शिंदे व अतुल जाधव आदी उपस्थित होते.



# विराट स्पोर्ट्स्‌चे विनीत दिनकर, पूजा राठोड वेगवान धावपटू

## जिल्हा वरिष्ठ गट मैदानी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

वरिष्ठ गटाच्या जिल्हा मैदानी स्पर्धेत विराट स्पोर्टस्‌चे वनीत दिनकर व पूजा राठोड यांनी १०० व २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुटाच मान मिळविला.

सोलापूर जिल्हा अथलेटिक असोसिएशनच्या वतीने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर शहर जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अथलेटिक असोसिएशनचे सचिव राजू प्याटी, वरिष्ठ सदस्य गुलाम मुजावर, सुरश खुर्द, जीवन इंगळे, राष्ट्रीय पंच सूर्याजी लिंगडे, भारती लिंगडे, प्रकाश गायकवाड, चेतन धनवडे, लियाकत शेख, गणेश बागल, विक्रम पवार आणि श्री. कळसे यांच्यासह प्रमुख पंच व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अंतिम प्रथम तीन : १०० मीटर धावणे :** पुरुष: विनीत दिनकर (विराट स्पोर्टस्), म. सफ खतिब (सेंट जोसेफ), सुनील जाधव (प्रार्थना अकॅडमी). महिला: पूजा राठोड (विराट स्पोर्टस्), श्री महंगडे (स्पिरिट अकॅडमी, बार्शी), कीर्ती तोळणूर (विराट स्पोर्ट्स).

**२०० मीटर धावणे : पुरुष :** विनीत दिनकर, किरण पाखरे (अजिंक्य स्पोर्ट्स, पंढरपूर), सुनील जाधव. महिला: पूजा राठोड, श्री महांगडे, कीर्ती तोळणूर.

**४०० मीटर धावणे : पुरुष:** सागर कारंडे, हर्ष कांबळे (अजिंक्य स्पोर्ट्स, पंढरपूर), रितेश राठोड (स्वराज्य प्रतिष्ठान). महिला: सानिका ऐवळे, गायत्री मासाळ (अजिंक्य स्पोर्टस्, पंढरपूर), जान्हवी खांडाळे (माळशिरस).

**८०० मीटर धावणे : पुरुष:** धनाजी धुमाळ (अजिंक्य स्पोर्टस्, पंढरपूर), कार्तिक लिंबोळे (सोलापूर), रविराज नरळे (मंगळवेढा)

**महिला:** ममता चौगुले (शौर्य अकॅडमी), श्रद्धा गुंटूक (स्वामी विवेकानंद ज्यु. कॉलेज व प्रशाला, जुळे सोलापूर)

**१५०० मीटर धावणे : पुरुष:** बनसिद्ध भरले (हत्तूर, द. सोलापूर), सुशांत लोंढे (अक्कलकोट), अथर्व साळुंके (सांगोला). महिला: शितल धाडगे, गायत्री मासाळ (अजिंक्य स्पोर्टस्, पंढरपूर), श्रद्धा गुंटूक

**५००० मीटर धावणे : पुरुष :** अमोल अमोने (सांगोला), सुशांत सरगर (कोळे, सांगोला), राहुल अस्वले (स्वामी समर्थ, अक्कलकोट).

**महिला :** मानशी चंदनशिवे (शौर्य अकॅडमी), स्वानंदी संतोष खटके (ए. जी. पाटील इंजिनीअरिंग कॉलेज, सोलापूर)

**१० हजार मीटर धावणे : पुरुष:** सुशांत सरगर, अमोल अमोने महिला: मास अहमद चौधरी (शौर्य अकॅडमी).

**गोळाफेक :** पुरुष : समाधान खेडेकर, विशाल बाबर (माळशिरस), विश्वराज जमादार (विराट स्पोर्टस्, सोलापूर).

**लांब उडी : पुरुष :** सचिन मायनाळे (विराट स्पोर्टस्), वेदांत लावंड (सोलापूर), विकी राठोड (प्रार्थना अकॅडमी)

# एनजी व मॉडेल क्रिकेट अकादमीची विजयी सलामी



## मास्टर्स १६ वर्षांखालील क्रिकेट : ऋग्वेद पाटील, झैद शेख सामनावीर

**सोलापूर, दि. १९ मे-**

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत एनजी क्रिकेट अकादमीने मास्टर्स अकादमीवर १४८ धावांनी दणदणीत विजय मिळविला. ऋग्वेद पाटील सामनावीर ठरला.

डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर मंगळवारी झालेल्या सामन्यात मॉडेल अकादमीने मास्टर्स अकादमीवर ७ गडी राखून मात केली. झैद शेख सामन्याचा मानकरी ठरला.

याचे उद्घाटन दत्तात्रय बडगु यांचा हस्ते झाले. यावेळी राजेश येमुल, निलेश गायकवाड, विजय स्वामी, राजवर्धन जिल्ला, गायकवाड आदी उपस्थित होते. पंच म्हणून नबीलाल पटेल व असलान शेख यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक : निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी :** ५० षटकात सर्वबाद २९१ धावा (ऋग्वेद पाटील ६०, अर्जुन चटके ४८, पवन गडगी ३-४२, अभिनव तग्गेली २-३९)

**विजयी विरुद्ध मास्टर्स क्रिकेट अकॅडमी :** ३४.३ षटकात सर्वबाद १४३ (नितिकेश गज्जम ५९, ऋग्वेद पाटील ३-७, सार्थक कन्ना ३-३७).

**मास्टर्स क्रिकेट अकादमी** :२१.३ षटकांत सर्व बाद ९२ (नितिकेश गज्जम २४, गौरव गाडेकर ३-११, झैद शेख २-३) **पराभूत विरुद्ध मॉडेल क्रिकेट अकादमी :**१८.३ षटकांत ३ बाद ९४ (अभिषेक देशमुख नाबाद ४८, नतिकेश गज्जम २-२५).

**आजचा सामना :** लातूर क्रिकेट अकादमी विरुद्ध मॉडेल क्रिकेट अकादमी.

# अणदूर नगरीत जगद्गुरुंचे जंगी स्वागत; अड्डपालखी महोत्सव डोळे दीपवणारा





## दोन किलोमीटरपर्यंत मिरवणूक

## संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात बुडाले

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि.१९ मे-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील नीलकंठेश्वर मठाचे मठाधिपती श्री प्रभू लिंगेश्वर महास्वामींजींचे जन्म शतक महोत्सव, वैराग्यमूर्ती, शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांचा पट्टाभिषेक रौप्य महोत्सव व जन्मदिन सुवर्ण महोत्सव अशा या त्रिवेणी धार्मिक कार्यक्रमास जगद्गुरुंचे आगमन झाले. त्यांचा भव्यदिव्य अड्डपालखी सोहळा, निलकंठेश्वर मठ ते कार्यक्रमस्थळापर्यंत अड्डपालखीतून मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण गाव, पंचक्रोशीतील हजारो भक्त भाविक यात सहभागी झाले होते.

लिं.प्रभूलिंगेश्वर जन्म शतमानोत्सव, मठाधिपती श्री.ष.ब्र.शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी पट्टाभिषेक रौप्यमहोत्सव व जन्मदिन सुवर्ण महोत्सवानिमित्त आलेल्या श्री श्री श्री १००८ जगद्गुरु विरसिंहासनाधिश्वर प्रसन्न रेणूकवीर, सोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी रंभापूरी महापीठ, जगद्गुरु सिंहासनाधिश्वर सिध्दलिंग राजदेशी केंद्र शिवाचार्य महास्वामीजी उजैन महापीठ, जगद्गुरु ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य काशी म हापीठ, जगद्गुरु ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य श्रीमद् काशी महापीठ आदी महागुरुवर्यांचा अड्डपालखी महोत्सव, जलकुंभ सुमारे दोन किलीमीटरपर्यंत होती.

जलकुंभ डोक्यावर घेऊन शेकडो महिला एकाच रंगाच्या साडीत मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. केरळातील ४० कलाकारांचे आट्टम वाद्य मिरवणुकीचे खास आकर्षण होते. अक्कलकोटच्या हलग्याचा कडकडाट मोठा होता. तुतारीचा बादशाह दोड्डी तुतारी ग्रुप आपल्या २० कलाकारांसह तुतारीचा निनाद करीत होता. हळदे यांचा शाही बॅन्डबाजा यांसह धनगरी ढोल, टाळ-मृदुंग, शिवयोगींच्या व जगदगुरुंच्या जयघोषाने संपूर्ण वातावरण आनंदमय बनले होते.

अड्डपालखी मिरवणुकीत मिरवणुकीत युवकांची संख्या लक्षणीय होती. मिरवणूक मार्गावरील रस्त्यांवर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. प्रत्येक दुकानदारांनी आपल्या दुकानापुढे थंडगार पाण्याचे जार ठेवले होते.



ग्रामस्थांनी मिरवणुकीवर पुष्पवृष्टी केली. वाजतगाजत निघालेली ही मिरवणूक भव्य अशा स्व.सि.ना.आलुरे गुरुजी सभामंडपात आली. त्यानंतर जगद्गुरुंचे आशीर्वचन झाले. यावेळी उपस्थितांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास २० ते २५ हजार नागरिक बंधू-भगिनी उपस्थित होते.


# विधानपरिषदेच्या आचारसंहितेमुळे शेतकरी कर्जमाफीचा निर्णय लांबणीवर पडण्याची भीती?

## शेतकरी बांधवांनी व्यक्त केली चिंता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र मध्येच विधानपरिषदेच्या आचारसंहिता लागणार असल्याने कर्जमाफीचा निर्णय आता आणखी काही दिवस लांबवणीवर पडण्याची शक्यता जाणकार शेतकरी बांधवांतून व्यक्त होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार असल्याची खंत शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्विकृत सदस्य, कॅंटोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशीही माहिती मिळत आहे.




# सोलापुरातील चौघांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर जिल्ह्याच्या साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रासाठी अभिमानाची बातमी समोर आली असून सर साई इंडियन ट्रस्ट असोसिएशन (सिता ट्रस्ट) यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार सोलापूर जिल्ह्यातील चार जणांना जाहीर करण्यात आला आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय, प्रेरणादायी व समाजोपयोगी कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान केला जात आहे.

मातृभक्त डॉ. सी.ए. शंकर घनश्यामजी अंदानी यांच्या प्रेरणेतून कार्यरत असलेल्या संस्थेकडून दरवर्षी देशभरातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात येते. यावर्षी साहित्य व सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव करत दत्तात्रय इंगळे, अशोक मोहिते, दस्तगीर जमादार आणि विजयकुमार सोनवणे यांची राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. लेखक व कवी म्हणून सामाजिक जाणीवा आपल्या लेखणीतून प्रभावीपणे मांडणारे दत्तात्रय इंगळे (आलूरकर) यांनी ग्रामीण जीवन, माणुसकी व सामाजिक विषयांवर सातत्याने लेखन केले आहे. सैनिक म्हणून देशसेवा बजावतानाच साहित्य क्षेत्रातही वेगळी ओळख निर्माण करणारे अशोक मोहिते यांनी देशभक्ती, समाजप्रबोधन, जीवनमूल्यांवर आधारित लेखनातून वाचकांची मने जिंकली आहेत. कादंबरीकार दस्तगीर जमादार यांनी आपल्या लेखनातून समाजातील वास्तववादी चित्रण मांडत साहित्यविश्वात स्वतंत्र ठसा उमटवला आहे. ज्येष्ठ कवी विजयकुमार सोनवणे यांनी आपल्या कवितांमधून सामाजिक प्रश्न, मानवी भावना आणि संस्कृतीचे जतन यांना प्रभावी शब्दबद्ध केले आहे. या चौघांच्याही कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय सन्मान जाहीर करण्यात आला आहे.


दत्ता इंगळे


दस्तगीर जमादार


विजयकुमार सोनवणे


अशोक मोहिते

हा पुरस्कार वितरण सोहळा दि.३० मे २०२६ रोजी पत्रकार भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व रसिक उपस्थित राहणार असून पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे.



**सोलापूर : सोलापूरचे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, वरिष्ठ लिपिक शरद नलावडे यांनी मंगळवारी दैनिक 'तरुण भारत'च्या मुख्य कार्यालयात भेट दिली. याप्रसंगी मुख्य संपादक प्रशांत माने यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, मराठवाडा विभागप्रमुख राजाराम मस्के आदींची उपस्थिती होती.**

# मातीचे आरोग्य तपासण्यासाठी कृषी कर्मचारी बांधावर

## खरीप हंगामाची तयारी झाली सुरु

## १० हजार माती नमने तपासणीचे उद्दिष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

जिल्ह्यातील बळीराजा खरीप हंगाम ाच्या तयारीला लागला असून, उत्पादन वाढीसाठी कृषी विभागाकडून जमिनीच्या आरोग्य तपासणीवर भर दिला जात आहे. यंदा जिल्ह्यात १० हजार नमुन्यांच्या तपासणीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तपासणी झाल्यानंतर शेतकऱ्यांना जमिनीची आरोग्यपत्रिका देण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीत कोणते उत्पन्न घ्यावे, हे कळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. १९) दिली.

सोलापूर जिल्ह्यात अजूनही काही तालुक्यात कोरडवाहू जमीन आहे. अनेक भागात १७ पैकी १४ पोषक अन्नद्रव्याचा पुरवठा जमिनीतून होतो. मुरमाड तर काही भागात काळी जमीन आहे. या जमिनीत कोणते पीक कमी खर्चात अधिक उत्पन्न देऊ शकते, याची तपासणी करण्यावर कृषी विभागाने भर दिला आहे. माती परीक्षणानुसार पिकांची निवड केल्यास उत्पादनवाढ, पिकांची वाढ व फळधारणा अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.



जिल्हा कृषी विभागाच्या मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी प्रयोगशाळेकडे आतापर्यंत जवळपास ७ हजार ५०० माती नमुने तपासणीसाठी प्राप्त झाले आहेत. काही शेतकऱ्यांकडून मातीचे नमुने प्राप्त होत आहेत. प्राप्त नमुन्यांपैकी १५० नमुन्याची तपासणी झाली असून, उर्वरित नमुन्याची तपासणी जुलै अखेरीस पूर्ण करून शेतकऱ्यांना जमिनीची आरोग्यपत्रिका देण्याचे नियोजन केले आहे. रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीतील उपयुक्त व हानिकारक घटकांचे संतुलन बिघडत असल्याने माती तसेच सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची तपासणी आवश्यक असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे. जमिनीच्या आरोग्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करून शाश्वत शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. जमिनीतील मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा साठा माती परीक्षणातून समजतो. त्यानुसार खत व्यवस्थापन करता येत असल्याने उत्पादन वाढीसह खर्चातही बचत होते. शेतकऱ्यांनी माती परीक्षण करूनच पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी केले आहे.

### कशी घेतली जाते माती तपासणीसाठी

ज्या ठिकाणची माती घ्यायची आहे, तिथली वरची सुकलेली पाने किंवा कचरा बाजूला करावा. तिथे कुदळीने किंवा खुरप्याने २० ते ३० सेंमी खोल खड्डा करावा. त्यानंतर त्या खड्ड्याच्या एका बाजूने वरपासून खालपर्यंत २ सेंमी जाडीचा मातीचा थर खरवडून काढावी. या मातीचे प्रयोगशाळेत योग्य पध्दतीने परीक्षण झाल्यास आणि त्यानुसार शेतकरी बांधवांनी पिकांचे नियोजन केल्यास उत्पादनवृध्दी नक्कीच होते.

**- शुक्राचार्य भोसले,**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,**
**सोलापूर**

# रस्त्याच्या साईडपट्ट्या चुकिच्या असल्याची तक्रार


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे -**

विजापूर रस्त्यावरील ए.जी. पाटील इन्स्टिट्युट ते लोकुतांडा असा रस्ता नुकताच महापालिकेतर्फे करण्यात आला आहे. रस्त्याचे काम अत्यंत चांगले झाले आहे. मात्र साईडपट्या या रस्त्यापेक्षा जरा जास्तच खाली राहिल्याचे दिसून येत आहे. परिणामी अचानक दुसऱ्या दिशेने मोठे वाहन आल्यास वाहनचालकावर आपले वाहन रस्त्यावरुन खाली उतरवताना धोक्याची जागा निर्माण झाली आहे. अचानक गाडी खाली उतरवताना दुचाकी वाहनाचा अपघात होण्याची शक्यता आहे. तरी साईडपट्या योग्य उंचीच्या व रुंदीच्या करण्याची गरज व्यक्त होत आहे.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशाचा मोबाईल लंपास



**सोलापूर, दि.१९ मे-**
एसटी बसमध्ये चढणाऱ्या एका प्रवाशाच्या खिशातील पंधरा हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने लंपास केल्याची घटना शांती चौक येथे दि.११ मे २०२६ रोजी घडली. संगय्या बसय्या हिरेमठ (रा.नागणसुर, ता.अक्कलकोट) हे दि.११ मे रोजी शांती चौक येथे एसटी बसमध्ये चढत असताना चोरट्याने त्यांच्या खिशातील मोबाईल हातोहात लंपास केला. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

---

### प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याची वाहतूक; ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि.१९ मे-**
महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि पानमसाल्याची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका दुचाकीस्वाराला अन्न व औषध प्रशासनाने पकडले. यात ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अन्न सुरक्षा अधिकारी कीर्ती धनाजी देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महेश ज्ञानेश्वर खानौरे (रा.सुनील नगर, सोलापूर) याच्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपी महेश खानौरे हा त्याच्या मोटरसायकलवरुन कलावती नगर येथे प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखू घेऊन जाताना अन्न व औषध प्रशासनच्या पथकाला सापडून आला.

---

### अंगणात झोपलेल्या महिलेचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि.१९ मे-**
उकाड्यामुळे घराबाहेरील अंगणात झोपलेल्या एका महिलेचा ७ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरुन नेल्याची घटना गैबीपीर नगर येथे घडली. याप्रकरणी उज्वला विष्णू कांबळे (वय-३४) यांनी सलगर वस्ती पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. हवालदार कुंभार हे पुढील तपास करीत आहेत.

---

### झुरळ मारण्याचे औषध पिलेल्या इसमाचा मृत्यू



**सोलापूर, दि. १९ मे-**
घरगुती भांडणाच्या कारणावरून झुरळ मारण्याचे औषध पिलेल्या जुळे सोलापूर येथील एका इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. निलेश अशोक शिंदे (वय-४३, ६४, हेरिटेज, जुळे सोलापूर) असे मयत इसमाचे नाव आहे. दि.१४ मे रोजी रात्री ९ वाजता घरगुती भांडणाच्या कारणावरुन त्यांनी झुरळ मारण्याचे औषध पिले होते. यात चक्कर येऊन खाली पडल्याने त्यांना सोलापूरच्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान मंगळवारी पहाटे ४ वाजता मृत्यू झाला.

---

### वीटभट्टी मजुराची गळफासाने आत्महत्या



**सोलापूर, दि. १९ मे-**
अज्ञात कारणावरुन वीट भट्टीवरील एका पस्तीस वर्षीय मजुराने घरात लाकडीवाशाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना एमआयडीसी परिसरातील संगमेश्वर नगर येथे उघडकीस आली. कल्याणी परमेश्वर गेजगे (वय-३५,रा. हेबळी, ता.आळंद, जि.गुलबर्गा. सध्या संगमेश्वर नगर मागे, सोलापूर) असे मयत मजुराचे नाव आहे. तो चांद नदाफ यांच्या वीटभट्टीवर कामास होता. आत्महत्याची खबर मिळताच एमआयडीसी पोलिस ठाण्याचे हवालदार घोडके यांनी घटनास्थळी पोहचून इतरांच्या साह्याने मृतदेह खाली उतरवून शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केला.

---

### चहा पिताना चक्कर येऊन पडल्याने वृध्दाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १९ मे-**
हॉटेलमध्ये चहा पीत असताना चक्कर येऊन खाली पडल्याने एका ६८ वर्षीय वृध्द इसमाचा मृत्यू झाल्याची घटना नई जिंदगी येथील अमन हॉटेलमध्ये मंगळवार, १९ मे रोजी सकाळी ८.३० वाजता घडली. आप्पासाहेब मल्लप्पा तेरदाळे (रा.शिवगंगा नगर भाग ३, नई जिंदगी, सोलापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. आप्पासाहेब तेरदाळे हे मंगळवारी सकाळी अमन हॉटेलमध्ये चहा पीत होते. तेव्हा चक्कर येऊन ते खाली कोसळले व बेशुध्द होऊन पडले. त्यांचा मुलगा अजित तेरदाळे याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# अकरावी प्रवेश प्रक्रिया : कोणत्या कॉलेजला द्यावी पहिली पसंती?

## ● पसंतीक्रम भरण्यासाठी २१ मे अंतिम तारीख
## ● २६ ते २८ मेदरम्यान प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मे-**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता अकरावीसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्जाच्या भाग-१ मधील दुरुस्त्या आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरण्यासाठी दि.२१ मे २०२६ ही अंतिम तारीख आहे. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांचे पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे कोणत्या कॉलेजला पहिली पसंती द्यायची? याबाबत विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता आणि संभ्रमही दिसून येत आहे.

शिक्षण विभागाकडून २३ मे ते २६ मेदरम्यान विद्यार्थ्यांचे गुण, आरक्षण आणि पसंतीक्रम यांच्या आधारे अंतर्गत पडताळणी आणि जागा वाटप प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यानंतर पहिल्या गुणवत्ता फेरीतील प्रवेश यादी जाहीर होणार असून, विद्यार्थ्यांना २६ ते २८ मेदरम्यान संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. यावेळी प्रवेश प्रक्रियेत ऑनलाइन मान्यता देण्याची अटही महत्त्वाची ठरणार आहे. मिळालेले महाविद्यालय मान्य असल्यास स्वतःच्या लॉगिनमधून 'प्रवेशासाठी पुढे जा' हा पर्याय निवडणे बंधनकारक राहणार आहे.

पहिल्या फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांचा तपशील दि.२९ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. दुसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक दि.३० मे रोजी प्रसिध्द होणार आहे. पहिल्या फेरीत प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीची संधी उपलब्ध राहणार आहे. पहिल्या नियमित फेरीसाठी अर्ज नोंदणी, पसंतीक्रम भरणे, गुणवत्ता यादी आणि प्रत्यक्ष प्रवेश अशा सर्व टप्प्यांचे वेळापत्रक निश्चित झाल्याने विद्यार्थी व पालकांचे लक्ष आता प्रवेश प्रक्रियेवर केंद्रीत झाले आहे. दरम्यान, प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच प्रत्यक्ष प्रवेश ग्राह्य धरला जाणार असल्याचे सांगण्यात आले.



### कोणत्या महाविद्यालयात किती जागा शिल्लक?

पहिली फेरी संपल्यानंतर कोणत्या महाविद्यालयात किती जागा शिल्लक राहिल्या? या रिक्त जागांचा तपशील दि.२९ मे २०२६ रोजी जाहीर केला जाईल. दि.३० मे २०२६ रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. शिक्षण संचालनालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यवाही शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांनी वेळेत पूर्ण करावी, असे 'माध्यमिक'चे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले.

# पोलिस आयुक्तालयात तक्रार देण्याच्या कारणावरुन मारहाण

## महिलेसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मे-**
तुम्ही सर्वांनी मिळून आमच्याविरुध्द पोलिस आयुक्तालयात तक्रार का दिली? असे म्हणत वाद घालत एका तरुणासह त्याच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण केल्याची घटना बेगमपेठ भागात घडली. याप्रकरणी एका महिलेसह चौघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अकिब कुरेशी, रेहान बिलाल, जुनेद बिलाल कुरेशी आणि हबीबा कुरेशी (सर्वजण रा.बेगम पेठ, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत बुऱ्हानोद्दीन शरिफसाब कुरेशी (रा.१८४, बेगमपेठ, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी हे दि.१७ मे सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास वाडयात असताना त्यांचा चुलत भाऊ म्हणजे यातील आरोपी अकिब कुरेशी याने फिर्यादीस घराबाहेर बोलावून घेऊन तुम्ही सर्वजण मिळुन आमचेविरुध्द पोलिस आयुक्तालयात तक्रार का दिलात? असे म्हणाला.

यावरुन वादावादी होत शिवीगाळ करुन हाताने चापट मारली. रेहान बिलाल याने सळईने फिर्यादीचे तोंडावर मारुन जखमी केले आहे. हबीबा कुरेशी हिने फिर्यादीचे शर्टाची कॉलर पकडुन शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार कांबळे हे पुढील तपास करीत आहेत.

# महिलांच्या स्वच्छतागृहात पुन्हा व्हिडिओ शूटिंग

## पंढरपूर येथे प्रकार, सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मे-**
महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या पंढरपूर नगरीत अधिक महिन्या निमित्त लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होत असताना मंदिर परिसरात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सलग दुसऱ्या दिवशी महिलांच्या सुलभ स्वच्छालयात चोरुन व्हिडिओ शूटिंग करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने शहरात संतापाची लाट उसळली आहे.

महाद्वार परिसरातील महिलांच्या सुलभ स्वच्छतालयात काल एका अज्ञात इसमाने महिलेचे चोरुन शूटिंग करत असताना नागरिकांनी त्याला पकडून बेदम मारहाण केली होती. त्यानंतर संबंधितावर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना ताजी असतानाच आज विठ्ठल मंदिर परिसरातील नामदेव पायरी शेजारील महिलांच्या सुलभ स्वच्छतालयात असाच संतापजनक प्रकार घडला.



### अधिकृत तक्रार केली दाखल

कालच्या घटनेतील पुणे येथील पीडित महिलेने घडलेल्या प्रकाराबाबत आपल्याशी संपर्क साधुन पोलिसांकडे अधिकृत तक्रार दिली. मंदिर परिसरातील महिलांच्या सर्व सुलभ स्वच्छतालयांची सुरक्षितता तातडीने वाढवावी. बंदिस्त आणि सुरक्षित स्वच्छतालय उभारावीत. अन्यथा तीव्र आंदोलन छेडले, असे माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी सांगितले.

एका महिलेला स्वच्छतालयामध्ये संशयास्पद हालचाल जाणवली. त्यावेळी तिने वरती एका मुलाचे डोके पाहताच आरडाओरड सुरु केली. त्या महिलेने संशयिताला पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो घटनास्थळावरुन पसार झाला. अशा घटनांमुळे येथील मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्था पुन्हा एकदा चर्चेत आली. भाविक महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील ठराविक कर्मचारी-अधिकाऱ्यांनी पाळला 'नो व्हेईकल डे'

## ▶▶ अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांत मात्र उदासिनताच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत, पर्यावरण संरक्षण व इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराबाबतच्या आवाहनाला प्रतिसाद देत, सोलापूर जिल्हा परिषद, महानगरपालिकेकडून 'नो व्हेईकल डे' आयोजित केल्यानंतर उशिराने का होईना जिल्हा प्रशासनाकडूनही दर मंगळवारी 'नो व्हेईकल डे' साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. मात्र ठराविक अधिकारी-कर्मचारी वगळता अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांत या दिवसाविषयी फार अशी उत्सुकता दिसून आली नाही.

इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषणमुक्त प्रशासनाचा संदेश देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत मनपा आणि जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी विविध पर्यायी प्रवास माध्यमांचा आज वापर करत वेगळाच आदर्श घालून दिला. इतकेच नव्हेतर त्यांच्यात उत्साहाचे वातावरण होते.



मनपा, जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सर्वच कार्यालयातही दर मंगळवारी 'नो व्हेईकल डे' पाळण्यात येणार आहे, असे आवाहन आरडीसी अभिजित पाटील यांनी केले असले तरी त्यांच्या आवाहनाला कर्मचाऱ्यांकडून हवा तितका प्रतिसाद या मंगळवारी तर मिळालाच नसल्याचे दिसून आले.

जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कॅम्पसमधील विविध कार्यालयातही असाच काही प्रकार आढळून आला. आगामी मंगळवारी तरी जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणारा हा दिवस उत्साहपूर्व वातावरणात साजरा करण्याची गरज याच कॅम्पसमधील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, काही अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या सहभागामुळे नो व्हेईकल डे हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश ठरला. कारण काही अधिकारी-कर्मचारी मात्र इलेक्ट्रिक वाहनातून, काहीजण सायकलवरून कार्यालयात आले तर घर जवळ असणारे कर्मचारी पायी चालत आल्याचेही दिसून आले.

# 'अम्मी और भाई गिरे तो मार लगेगा' असे म्हटल्याने प्राणघातक हल्ला

## नई जिंदगी भागात घडलेली घटना, एकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मे-**
गाडी को कट मत मार, गाडीपर अम्मी और भाई बैठा है. गिरे तो उनको मार लगेगा, असे समजावून सांगत असताना एकाने एकावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना नई जिंदगी भागातील मा आयेशा फंक्शन हॉल येथे रविवार, दि.१७ मे २०२६ रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अब्दुल ईस्माईल कसाब (रा.नई जिंदगी, सोलापूर) याच्यावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

फरदीन मुकंदर काझी (रा.टिळक नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. आई शहनाज, भाऊ आतिफ असे मिळून दुचाकीवरुन असताना नई जिंदगी भागातील मा आयेशा फंक्शन हॉलजवळ वरील आरोपी मागुन येवून वाहनाला कट मारुन पुढे येवून थांबला. तेव्हा गाडी को कट मत मार, गाडीपर अम्मी और भाई बैठा है. गिरे तो उनको मार लगेगा, असे समजावून सांगत असताना त्याने उलट मलाच धमकावत हाताने चापट मारली. तसेच लोखंडी चॉपरने प्राणघातक हल्ला केला, असे फिर्यादीत नमूद आहे. पोलिस हवालदार नकाते हे पुढील तपास करीत आहेत.




# तब्बल तीन महिन्यांपासून वेतन रखडले

## दिव्यांग शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये संताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**
सोलापूर जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या विशेष शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तब्बल तीन महिन्यांपासून वेतन रखडल्याची गंभीर बाब समोर आली आहे. सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतरचा फरकही तीन ते साडेतीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

नियमित वेतन न मिळाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते आणि दैनंदिन गरजा भागवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच आर्थिक असुरक्षिततेला सामोरे जावे लागत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.



या पार्श्वभूमीवर संबंधित शिक्षक व शिक्षकेतर थकीत वेतन तात्काळ अदा करावे, सातवा वेतन आयोगाचा फरक मंजूर करून निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच यापुढे वेतन वेळेत मिळण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशी मागणी त्या शिक्षकांनी केली आहे.

शासनाकडून आवश्यक निधी वेळेत उपलब्ध होत नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात असले, तरी प्रशासनाने याबाबत तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक, कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपये रखडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील सर्व अनुदानित महाविद्यालय व विद्यापीठ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय पेन्शन योजना आणि परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे पैसे मागील ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, त्यांच्यात तीव्र संतापाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संदर्भात सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनच्या वतीने उच्च शिक्षण सोलापूर विभागाचे सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांना एक निवेदन सादर करून तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी कॉलेज कर्मचारी युनियनचे माजी सरचिटणीस अजितकुमार संगवे, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर, महेश सुरवसे आदी उपस्थित होते.

१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दरमहा वेतनातून कर्मचारी हिस्सा १० टक्के आणि शासन हिस्सा १४ टक्के अशी एकूण २४ टक्के रक्कम कपात केली जाते. मात्र, मागील ९ महिन्यांपासून ही रक्कम कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक 'प्रान' खात्यावर जमा झालेली नाही. NSDL-NPS Trust च्या वेबसाईटवर तपासणी केली असता, तिथे Not Credited असा शेरा दिसत आहे. वेळेत पैसे जमा न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन निधीमध्ये खंड पडत असून, त्यांना मिळणाऱ्या व्याजाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्याची एकमेव पुंजी असलेल्या या निधीबाबत वरिष्ठ पातळीवर कार्यालयात होत असलेल्या या अक्षम्य विलंबाबद्दल कर्मचाऱ्यांमध्ये कमालीची भीती पसरली आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कर्मचारी संघटनेने प्रशासनाकडे काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये ऑगस्ट २०२५ ते आजतागायत या कालावधीतील सर्व थकीत NPS Contributionची रक्कम व्याजासह कर्मचाऱ्यांच्या PRN खात्यावर तातडीने वर्ग करण्यात यावी, तसेच तांत्रिक अडचणी दूर करून, यापुढे दरमहा कपात झालेली रक्कम त्याच महिन्याच्या १० तारखेपर्यंत खात्यात जमा होईल अशी ठोस व कायमस्वरूपी व्यवस्था करावी आणि या थकीत कालावधीचे विलंब शुल्क व व्याज कर्मचाऱ्यांना देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

DCPS आणि NPS ही कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाहाची एकमेव योजना असल्याने, शासनाकडून वेळेत रक्कम जमा न झाल्यास कर्मचाऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होते, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. संघटनेने प्रशासनाला या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेण्यासाठी ३० दिवसांचा अवधी दिला असून, या मुदतीत संबंधित ट्रेझरी अधिकारी, NPS सेल व वित्त विभागाला आदेश द्यावेत, अशी विनंती केली आहे. हे पत्रक युनियनच्यावतीने सादर करण्यात आले असून, आता यावर प्रशासन काय पावले उचलणार, याकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## ९ महिन्यांपासून वरिष्ठ कार्यालयाची उदासीनता, कॉलेज कर्मचारी युनियनच्यावतीने निवेदन



### तांत्रिक त्रुटी शोधण्याचे काम सुरू

ही रक्कम ऑनलाईन भरण्यासाठी चलन जनरेट होत नाही. त्यामुळे रक्कम जमा करण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. याबाबत आमच्या कार्यालयाकडून प्रत्येक महिन्यात htesevaarth2gmail.com यावर मेल करण्यात आला आहे. तसेच हेल्पलाइन नंबरवरही (०२२६१३१६४२६) प्रतिसाद नाही. त्यामुळे या संदर्भात या कार्यालयाने दोन डिसेंबर २०२५ रोजी शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांना लेखी कळविले आहे. तरीही तांत्रिक त्रुटी शोधण्याचे काम सुरू असून लवकरच यावर तोडगा निघेल, असे सोलापूर विभागीय सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांनी सांगितले.

## ज्ञानामृत आनंदलहरी-१४४६

**आपुली तहानभूक नेणे । तान्हया निकें तें माऊलीसीचि करणें ।**
**तैसे अनुसरले जे मज प्राणें । तयांचेन काईसेनिहि नलजें मी ॥**

आप-पर हा भेद न करता, निष्काम कर्म करणा-यांना सुखप्राप्ती साठी वेगळे कांही करावे लागत नाही. लोकसेवेत, लोकमार्गदर्शनात जो नि:स्वार्थ भावनेने स्वत:ला झोकून देतो, त्यांचे दैनंदिन जीणे चांगले व्हावे म्हणून त्याला वेगळे कांही करावे लागत नाही. कारण जनाच्या सुखाबरोबर त्याचे जीणे आपोआप घडत असते. मला कांहीतरी हवे आहे म्हणून कर्म करु गेल्यास चिंता, भय, दु:ख आपोआप उत्पन्न होत असतात. आपण परमात्मस्वरुपी बनुन कर्तव्य करीत गेलो तर आपले जीवनकर्म वेगळे करण्याची गरज राहत नाही. भगवंत हा सर्व प्राणीमात्रात भरुन उरला असल्याने, प्राणीमात्रांची सेवा करणा-यांची सेवा, प्राणीमात्रांकडूनही आपोआप कळत न कळत घडत असते. जन, परमात्म सेवेतच खरे सुख मिळत असल्याने स्वसुखासाठी वेगळे कांही करण्याचे शिल्लक राहात नाही. आपल्या वर्तनात व्यवहार आला की, भय, दु:ख या बाबी आल्याच. पण व्यवहारच नाही आला तर दु:खाचे कारणच नाही. आईच्या गर्भातील गोळयाला व्यवहार माहिती नसतो. त्याची वाढ, संगोपन आईला न कळताही आईकडून आपोआप होत असते. जनसेवा म्हणजेच परमात्मसेवा जे जाणतात. त्यांच्या बाबतीतही आपोआप असेच घडत असते. याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले, आपुली तहानभूक नेणे । तान्हया निकें तें माऊलीसींचि करणें । तैसे अनुसरले जे मज प्राणें । तयांचे काईसेनिही नलजे मी॥. अर्थात, तान्हे लेकरु आपली तहानभुक कांहीच जाणत नाही. त्याला हितकर काय ते आईलाच करावे लागते.



याप्रमाणे स्वत:ची चिंता न करता जे समान दृष्टीकोन जोपासून जनसेवा, सत्कर्म म्हणजे परमात्म सेवा हेच जीवन मानतात. त्यांची सेवा करण्यास जनालाही कांही लाज वाटत नसते. त्यांची सेवा, काम परमात्म्याकडून, जनतेकडून आपोआप होत असते. परमात्मा म्हणजे कांही वेगळे नसून आपणाला सोडून इतर जीव म्हटले तर चुकीचे होणार नाही. आपल्या जीवाने इतर जीवांची सेवा करणे म्हणजे परमात्म सेवा असा अर्थ गृहीत धरुन परमात्मसेवा केली तर परमात्म्याकडूनही म्हणजेच इतर जीवाकडून आपली सेवा आपोआप घडत असते. ापण दैनंदिन जीवनात पाहतो की, अनेक महात्म्यांची आयुष्ये केवळ जनसेवेतच गेली. त्या जनसेवेत आयुष्य घालणा-यांची सेवा सुध्दा जनांकडून आपोआप घडत गेली हेही आपण पाहतो. जनसेवा हीच ईश्वर सेवा असा गुरुमंत्रही आपण ऐकतो. या गुरुमंत्राचा अनुभव घेऊन पाहिला तर आपणाला असे दिसून येईल की, आपण जशी इतरांची सेवा करतो, तसे इतरही आपली सेवा आपोआप करु लागतात. या सेवेला प्रांरभ करण्याअगोदर आपण स्वार्थ, काम, क्रोध, मोह, अहंकार विसरले पाहिजेत. हे सर्व सोबत घेऊन जनसेवेचे व्रत हाती घेण्याचे ठरविले तर जनसेवेच्या सुखाची प्राप्ती होणे अवघड आहे. दैनंदिन जीवन जगतांना, अडीअडचणीत सापडलेल्यांना जेवढे सहाकार्य करता येईल तेवढे निस्वार्थ भावनेने करण्याचा प्रयत्न आपण करायला हवा. संत महात्म्यांनी आयुष्यभर त्यांच्या जीवनात जनसेवा करुन आधी केले मग सांगीतले ही संतोक्ती पुर्ण करुन दाखविली आहे. या संतोक्तींचे आचरण आपल्याकडूनही व्हायला हवे. असे झाले तर आनंदच आनंद आपल्या वाटयाला येईल.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. २० मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, शु. चतुर्थी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पुनर्वसु(२८.११)
योग - शूल (१४.१०)
करण - बव (२१.३९)
राहू काल : बुधवार
दु. १२.०० ते १.३०

**दिनविशेष :**
**१९०२: क्युबाला अमेरिकेपासून स्वातंत्र्य मिळाले**
**१८५०: आधुनिक मराठी गद्याचे जनक, श्रेष्ठ निबंधकार आणि 'केसरी'चे संस्थापक विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म १९०० : ख्यातनाम हिंदी कवी सुमित्रानंदन पंत यांचा जन्म. स्मृती दिन. (पुण्यतिथी): संत चोखामेळा: वारकरी संप्रदायातील महान संत चोखोबा यांची पुण्यतिथी (मंगळवेढा येथे समाधी)**



## शिवाजी महाविद्यालयासमोर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ मे-**

शासनस्तरावर प्रलंबित मागण्यासाठी येथील शिवाजी महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली. त्यामध्ये आनंदरावजी देशमुख, गणेश फपाळ जिल्हा सचिव भीमराव मस्के यांनी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये एकीचे बळ असणे आवश्यक असल्याचे मत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

यावेळी संतोष कवडे व शिवाजीराव हाके, शरद मस्के, अभिमान ढगे, संदिपान पिंगोरे, रामराजे सूर्यवंशी, शहाजी महाडिक, सचिन मोरे, विजयदास कैलास चव्हाण, भाऊ लांडगे उपस्थित होते.

## खा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रबोधन विचार मंच, सोलापूर यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. रमाई चौक, आवसे वस्ती व अमराई परिसरात करंजी, सिताफळ, मोगरा, शेवगा, चिंच आणि जांभूळ आदी विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली.

उपक्रमादरम्यान विश्वास गायकवाड व अशोककुमार दिलपाक यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी प्रबोधन विचार मंचचे अध्यक्ष विश्वास गायकवाड, शाक्य संघाचे अशोककुमार दिलपाक, नागेश गायकवाड, ऋषिकेश माळशिकारे, किरण मोरे, नारायण दुपारगुडे, श्रीकांत कांबळे, अलका गेजगे-कसबे, महापालिका आरोग्य विभाग जमादार श्रीकांत विभुते, प्रबोधन गायकवाड, आदित्य नडगम उपस्थित होते.

## रामभाऊ जोशी हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश


श्रेया नरखेडकर


पार्थ खाडे


अदिती काळे


पूर्वा देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १९ मे-**

महाराष्ट्र शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत करकंब (ता.पंढरपूर) येथील रामभाऊ जोशी हायस्कूलने उल्लेखनीय यश संपादन केले.आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत पूर्वा आदिनाथ देशमुख हिने १८० गुण प्राप्त केले.

पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून श्रेया नरखेडकर २३६ गुण, पार्थ खाडे १४२, आदिती काळे१३८ असे गुण प्राप्त करत या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी परीक्षेत यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संजय पाटील, अभिषेक चोपडे, सुरेश दहिगिरे, गणेश सूर्यवंशी, महादेव व्यवहारे, मनिषा ढोबळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे स्थानिक सचिव महेश चोप्रा, प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे, मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, स्थानीय सल्लागार समितीचे सदस्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## संभाजी महाराज संस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

निराळे वस्ती येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बहुद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे छत्रपती संभाजी महाराजांच्या ३६९ जयंतीचे औचित्य साधून गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा प्रमुख पाहुणे आमदार विजयकुमार देशमुख यांच्याहस्ते केली.

यावेळी शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक अमोल शिंदे, ज्ञानेश्वर सपाटे, नगरसेवक अमर पुदाले, सतीश कुदळे, मनोद गंगणे, महेश बोकन, बापू वाडेकर, निशांत सावळे, मल्लू सलगर, लहू गायकवाड, संजय वडने, आकाश लोंढे, प्रकाश जाधव, शिवाजी भोसले, डॉ. जगदीश पाटील, राहुल बिराजदार, राम जाधव, गोविंद कांबळे, रोहित नलवडे, अक्षय शिंदे, राज बीडला, सागर वाघमारे, रोहन येणे, सागर मोरे, अभिजीत सोनके यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना फेटा बांधून बुके देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी धनश्री पवार, आर्या भोसले, ओंकार शेट्टी, वैष्णवी पवार, ऋतुजा जमादार, संस्कृती शिंदे, वैष्णवी नलावडे, रामेश्वरी पवार, भक्ती खरात, निकिता डोके, श्रवण पवार, राजनंदिनी घात, रुद्र पवार, समीक्षा रणदिवे, उत्कर्ष गंगणे या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. अतुल सोनके यांनी आभार मानले.

## एक घर-एक झाड अभियानातून पाच हजार रोपांचे मोफत वाटप करणार

### हरित सोलापूरसाठी डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर ग्रीन मिशनच्या वतीने एक घर-एक झाड हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहरातील नागरिकांना वृक्षलागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी ५ हजार रोपांचे मोफत वितरण करण्यात येणार असल्याची माहिती मिशनचे संस्थापक डॉ. सुर्यप्रकाश कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वाढते तापमान, प्रदूषण आणि पाणीटंचाईच्या वाढत्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर शहराला हरित आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ गुरुवार, दि. २१ मे रोजी सकाळी १० वाजता गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक कॉलेज परिसरातील वॉकिंग ट्रॅक, पाणी टाकी चौक, अक्कलकोट रोड, सोलापूर येथे होणार आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंडयाल, सभागृहनेते नरेंद्र कोळे, महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमात नागरिक, युवक, स्वयंसेवक आणि विविध सामाजिक संस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन वृक्षसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करावी, असे आवाहन सोलापूर ग्रीन मिशनचे संस्थापक तथा पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष डॉ. सुर्यप्रकाश कोठे यांनी केले आहे. या पत्रकार परिदेस व्यंकटेश चिलका, वासुदेव इप्पलपल्ली, राजमहेंद्र कमटम, प्रा. डॉ. प्रशांत चाबुकस्वार आदी उपस्थित होते.

## मधमाशी पालन : व्यवसाय संधी




भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीपूरक व्यवसायांना ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये विशेष महत्त्व आहे. अशाच व्यवसायांपैकी मधमाशी पालन हा कमी खर्चात आणि अधिक नफा मिळवून देणारा व्यवसाय म्हणून वेगाने पुढे येत आहे. मधमाश्या केवळ मध उत्पादन करत नाहीत तर त्या शेतीतील परागीभवनाची प्रक्रिया सुधारून पिकांचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढविण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. त्यामुळे मधमाशी पालन हा पर्यावरणपूरक, रोजगारनिर्मिती करणारा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणारा व्यवसाय मानला जातो.

**मधमाशी पालनाचे महत्त्व**

मधमाश्यांमुळे विविध फळे, भाजीपाला आणि तेलबिया पिकांचे परागीभवन होते. यामुळे पिकांची उत्पादनक्षमता २० ते ७० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. मधमाशी पालनामुळे शेतकऱ्यांना मध, मेण, परागकण, रॉयल जेली, प्रोपोलिस यांसारखी मूल्यवर्धित उत्पादने मिळतात. ग्रामीण युवक, महिला बचतगट आणि शेतकरी यांच्यासाठी हा व्यवसाय रोजगाराचे उत्तम साधन ठरत आहे.

**मधमाशी पालनातील व्यवसाय संधी**

■ मध उत्पादन व विक्री

मधमाशी पालनातील मुख्य उत्पादन म्हणजे मध. आज नैसर्गिक आणि शुद्ध मधाला बाजारात मोठी मागणी आहे. औषधी, पोषणमूल्य आणि आरोग्यदायी गुणधर्मांमुळे मधाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

■ मधमाशी वसाहत निर्मिती

प्रशिक्षित मधमाशीपालक नवीन वसाहती तयार करून विक्री करू शकतात. याला चांगला बाजारभाव मिळतो.

■ मेण उत्पादन

मधमाशीच्या मेणाचा उपयोग मेणबत्त्या, सौंदर्यप्रसाधने, औषधे आणि चर्मउद्योगामध्ये केला जातो.

■ परागीभवन सेवा

फळबाग आणि भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मधमाश्यांच्या पेट्या भाड्याने देऊन परागीभवन सेवा पुरवता येते.

■ मूल्यवर्धित उत्पादने

हनी कँडी, हर्बल हनी, फ्लेवर्ड हनी, मधावर आधारित सौंदर्यप्रसाधने, औषधी उत्पादने तयार करून अतिरिक्त उत्पन्न मिळवता येते.

■ महिला बचतगटांसाठी संधी

महिला स्वयंसहायता गटांसाठी मध प्रक्रिया, पॅकिंग आणि विक्री हा उत्तम गृहउद्योग ठरू शकतो.

खादी आणि ग्रामोद्योग आयोग (KVIC) आणि मधमाशी पालन

Khadi and Village Industries Commission द्वारे ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीसाठी विविध योजना राबविल्या जातात. मधमाशी पालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

**हनी मिशन योजना**

भारत सरकारच्या खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने हनी मिशन ही योजना सुरू केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागात मधमाशी पालनाला चालना देणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि रोजगारनिर्मिती करणे हा आहे.

**हनी मिशनची प्रमुख उद्दिष्टे-**

बेरोजगार युवक आणि महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे. शेतकऱ्यांचे पूरक उत्पन्न वाढविणे. नैसर्गिक मध उत्पादन वाढविणे. परागीभवनाद्वारे शेती उत्पादन वाढविणे. जैवविविधतेचे संवर्धन करणे.

**योजनेअंतर्गत मिळणारे लाभ**

मधमाशी पालनाचे मोफत किंवा अनुदानित प्रशिक्षण, मधपेट्या आणि मधमाशी वसाहतींचे वितरण, मध काढणीसाठी आवश्यक उपकरणे, व्यवसाय मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य, बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) Prime Minister's Employment Generation Programme अंतर्गत मधमाशी पालन व्यवसायासाठी कर्ज आणि अनुदान मिळू शकते. ग्रामीण भागातील युवक, महिला, शेतकरी आणि बचतगट या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**मधमाशी पालनासाठी आवश्यक बाबी**

योग्य प्रशिक्षण घेणे. फुलझाडे आणि शेती परिसर निवडणे. कीटकनाशकांचा कमी वापर करणे. मधपेट्यांची नियमित देखभाल. योग्य विपणन व्यवस्था उभारणे. मधमाशी पालन आणि पर्यावरण. मधमाश्या जैवविविधतेच्या संवर्धनामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. परागीभवनामुळे वनस्पतींची पुनरुत्पत्ती होते आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाते. त्यामुळे मधमाशी पालन हा पर्यावरणपूरक व्यवसाय आहे. सोलापूर जिल्हा आणि परिसरात देखील स्वयंरोजगार आणि शेती पूरक व्यवसाय म्हणून मधमाशी पालन हा कमी गुंतवणुकीत सुरू होणारा, पर्यावरणपूरक आणि भरघोस उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या हनी मिशन आणि विविध योजनांमुळे ग्रामीण युवक, महिला आणि शेतकऱ्यांसाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. योग्य प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठेचा वापर केल्यास मधमाशी पालन व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देऊ शकतो.

■ **प्रा. रेश्मा माने**
किटक अभ्यासक: CBRTI पुणे
युगंधर फाउंडेशन सोलापूर

## महत्वाचे...



### स्मशानभूमीत सेवा देणाऱ्या 'त्या' समाजसेवकाचा सत्कार

**सोलापूर, दि. १९ मे-**

भोगाव (ता. उत्तर सोलापूर) येथील 'शंभूराजे प्रतिष्ठान' आणि 'न्यू श्री गणेश तरुण मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्याला न बोलवता, समाजात पडद्यामागे राहून निस्वार्थ सेवा करणाऱ्या खऱ्या समाजसेवकाचा सन्मान करून जयंतीला एक वेगळी दिशा देण्यात आली. सकाळच्या सत्रात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला तरुण वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे गावातील स्मशानभूमीत दररोज न चुकता झाडलोट करणारे, पाणी देणारे आणि झाडांचे संगोपन करून परिसर हिरवागार ठेवणाऱ्या निस्वार्थ गावतील संतोष गुड्डे, दादाराव भोसले, विजय बनसोडे, दादा घोडके, रामचंद्र सोमवंशी, दत्ता खारे, दत्ता सोमवंशी, जाधव, श्रेषाल काळे आदींचा शंभूराजे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोसले यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. सोहळ्याचे यशस्वी नियोजन शंभूराजे प्रतिष्ठान मंडळाचे अध्यक्ष अजय बेळ्ळे, उपाध्यक्ष अभिजित गायकवाड, गोरख भोसले, माजी सरपंच महादेव वाघमारे आणि रेवन घोडके उपस्थित होते.





### मनसे संपर्क अध्यक्षांचा सोलापूर जिल्हा संघटना बांधणी दौरा

**सोलापूर, दि. १९ मे-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सोलापूर जिल्ह्याचे संपर्क अध्यक्ष किशोर शिंदे व सुधीर पाटसकर यांचा दि. २० मे रोजी सोलापूर जिल्ह्यात संघटना बांधणी तसेच पदाधिकारी भेट दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यामध्ये विविध तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून संघटनात्मक आढावा घेण्यात येणार असून आगामी पक्ष संघटना विस्तार, जनसंपर्क व विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता अक्कलकोट तालुका पदाधिकारी संवाद व आढावा बैठक. दुपारी १२ वाजता येथे पक्ष प्रवेश कार्यक्रम मनसे मध्यवर्ती संपर्क कार्यालय, सोन्या मारुती येथे असणार आहे. दुपारी १ वाजता उत्तर सोलापूर पदाधिकारी संवाद व आढावा बैठक तर सायंकाळी ४ वाजता मोहोळ पदाधिकारी संवाद व आढावा बैठक घेण्यात येणार आहे. सर्व पदाधिकारी व मनसे सैनिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांनी केले आहे.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन

**सोलापूर, दि. १९ मे-**



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे सोलापूर दौऱ्यावर विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी आले असताना महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या वतीने प्रलंबित मागण्यांबाबत निवेदन देण्यात आले. परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी बालाजी सरोवर येथे मंत्री गडकरी यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी तातडीने शासन निर्णय काढावा, अशी मागणी केली. राज्यातील ११ हजार १५५ ग्रंथालयांमध्ये सुमारे २० हजार ३३५ कर्मचारी कार्यरत असून, ४० टक्के अनुदानवाढ, दर्जा बदल व नवीन ग्रंथालय मान्यता यांसाठी ११ डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी शासनाने सकारात्मक भूमिका घेतली होती, मात्र अद्याप निर्णय झाला नसल्याचे बेडगे यांनी सांगितले. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना किमान वेतन, दरवर्षी १० टक्के वेतनवाढ, कामाचे तास आठ करण्यासह केंद्र शासनाने दिलेला ४७० कोटी रुपयांचा निधी समान वाटपाने वितरित करावा, अशा प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या.

### मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनानिमित्त अकलूजमध्ये सर्वपक्षीय मराठा कार्यकर्त्यांची बैठक

**अकलूज, दि. १९ मे-**

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या ३० मे पासून सुरू होणाऱ्या प्राणांतिक उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माळशिरस तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव जाणार आहेत. त्याच्या नियोजनासाठी दि.२३ मे रोजी सर्व पक्षीय मराठा बांधवांच्या बैठक होणार आहे. सोमवारी येथे अखंड मराठा समाज माळशिरस तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक झाली. बैठकीत वारंवार आमरण उपोषणामुळे मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीला धोका निर्माण झाला आहे. अनेकदा मुदती देऊनही शासनाने केवळ फसवणूकच केल्याची मराठा समाजाची भावना झाल्याने शेवटी आर नाही तर पार ही भूमिका घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी दि. ३० मे रोजी त्यांच्या अंतरवाली सराटी या गावी पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. राज्यातील संपूर्ण मराठा समाज त्यांच्या पाठीशी आहे. त्यांच्या या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माळशिरस तालुक्यातुनही हजारो मराठा बांधव जाणार असल्याने त्याचे नियोजन करण्यासाठी दि. २३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता कृष्ण लीला बँक्वेट हॉल डॉ. धनेश गांधी हॉस्पिटल शेजारी याठिकाणी या सर्व पक्षीय बैठकीचे आयोजन केले आहे. बैठकीत सर्व सत्ताधारी, विरोधी पक्षाचे नेतेही उपस्थित राहणार आहेत. मराठा बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# 'समृध्द पंचायतराज'मध्ये पाच उत्कृष्ट गावांची निवड

## पाहणी पूर्ण, आता गुणांकनाची कसोटी; जिल्हास्तरीय टीमकडून अंतिम आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरावरील पाहणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता निवड झालेल्या गावांच्या गुणांकनाला सुरुवात झाली आहे. प्रत्येक तालुक्यातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पाच गावांची निवड करण्यात आली असून, पुढील टप्प्यात जिल्हास्तरीय पथक या गावांची प्रत्यक्ष पाहणी करून अंतिम अहवाल तयार करणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या अभियानाअंतर्गत गावांमध्ये स्वच्छता, पाणीपुरवठा, ग्रामविकास, डिजिटल सुविधा, महिला सहभाग, कर वसुली, पर्यावरण संवर्धन आणि शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी यासारख्या मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. तालुकास्तरीय समित्यांनी प्राथमिक पाहणी करत उत्कृष्ट काम करणाऱ्या गावांची निवड केली आहे. जिल्ह्यातील सुमारे २० टक्के गावांची तपासणी करण्यात आली असून, त्यातून निवडलेल्या गावांचे गुणांकन सुरू आहे. आता जिल्हास्तरीय टीम पुढील दोन दिवसांत संबंधित गावांना भेट देऊन प्रत्यक्ष पडताळणी करणार आहे. या पाहणीनंतर अंतिम गुणांकन करून उत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात येणार आहे.

दरम्यान, संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि गोपनीयतेवर विशेष भर देण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. पाहणी करणाऱ्या पथकांकडून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप किंवा दबाव टाळत निष्पक्ष मूल्यांकन केले जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. कोणत्या गावाला किती गुण मिळाले, याची माहिती अंतिम निर्णयापर्यंत गोपनीय ठेवण्यात आली आहे.

समृद्ध पंचायतराज अभियानामुळे गावांमध्ये विकासकामांची स्पर्धा निर्माण झाली असून, आदर्श गाव ठरण्यासाठी ग्रामपंचायती प्रशासनासह लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थही सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उत्कृष्ट काम केलेल्या गावांची पाहणी करण्यासाठी आलेल्या तालुकास्तरीय समितीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील २० टक्के म्हणजे २२० गावांची पाहणी केली. पाहणी संपल्यानंतर उत्कृष्ट पाच गावांना गुणांकन देऊन प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ गावांची निवड होणार आहे. यातील प्रथम व द्वितीय गावांची पाहणी जिल्हास्तरीय पथक करणार आहे. ग्राम विकास विभागाद्वारे राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय पाहणी आणि मूल्यमापन पूर्ण झाले आहे.

### अनेक गावांनी चांगली कामगिरी केली

तालुकास्तरीय पथकाने पाहणी करून ग्रामपंचायतींना मूल्यांकन दिले आहे. मूल्यांकनानुसार प्रत्येक तालुक्यातील चांगल्या पाच गावांची पाहणी जिल्हास्तरीय टीम करणार आहे. जिल्हास्तरीय पाहणीनंतर विभागीय टीम पाहणी करणार आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत अनेक गावांनी चांगली कामगिरी केल्याचे दिसून येत आहे.

– **सूर्यकांत भुजबळ,**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

### जिल्हास्तरीय मूल्यमापन पूर्ण करण्यासाठी बीडचे अधिकारी जिल्ह्यात येणार

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यासाठी जिल्हा परिषद सोलापूर आणि इतर संबंधित समित्यांनी हे मूल्यमापन केले आहे. तालुकास्तरीय पाहणी पूर्ण झाली. तालुकास्तरीय मूल्यांकनानंतर पात्र ग्रामपंचायतींचे अहवाल जिल्हा समितीकडे पाठवण्यात आले आहेत. पुढील दोन दिवसांत जिल्हास्तरीय मूल्यमापन पूर्ण करण्यासाठी बीडचे अधिकारी जिल्ह्यातील गावागावात जाणार असून, त्यानंतर पुढील टप्प्यात विभागीय व राज्यस्तरीय समित्यांची पाहणी प्रक्रिया होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत विभागाने दिली.

# 'मायक्रोग्रीन'च्या जनजागृतीबाबत गार्डन लव्हर्सतर्फे प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे-**

मायक्रोग्रीन बाबत जनजागृती व्हावी, पोषण मूल्यांची माहिती मिळावी तसेच घरच्या घरी या मायक्रो ग्रीनची लागवड कशी करावी, या अनुषंगाने सोलापुरातील गार्डन लवर्स ग्रुपच्या वतीने रविवारी विजापूर रोडवरील इंचगिरी मठाच्या पाठीमागे असलेल्या अंजनी बहुउद्देशीय सभागृहात प्रदर्शन तसेच कार्यशाळा संपन्न झाली.

प्रारंभी गार्डन्स लवर्स ग्रुपच्यावतीने आयोजित केलेल्या या प्रदर्शनाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी गार्डन लवर्स ग्रुपचे संयोजक राजेश शहा, वनविभागाच्या संध्याराणी बंडगर, शिवाजी सुरवसे, डॉक्टर लोणीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उपस्थित सर्वांचा गार्डन लवर्स ग्रुप च्या वतीने सन्मान करण्यात आला.

या कार्यशाळेत प्राध्यापिका अंजली क्षीरसागर यांनी तयार केलेली मायक्रो ग्रीन्स आणि ते आपल्या शरीरासाठी किती उपयोगी आहेत याची उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

यावेळी उपस्थित सर्वांना अंजू क्षीरसागर यांनी तयार केलेले मायक्रो ग्रीन्स भेट म्हणून देण्यात आले.



# रिपब्लिकन सेनेची पुनर्बांधणी

## नव्या पदाधिकाऱ्यांची निवडीने संघटनेला ऊर्जा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

आनंदराज आंबेडकर व युवा नेते अमन आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन सेनेच्या सोलापूर जिल्ह्यात संघटन विस्ताराला वेग मिळत असून नव्या नेतृत्वाच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांच्या आदेशाने प्रदेश सचिव सोमनाथ भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच सोलापूर लोकसभा जिल्हाध्यक्ष अमित कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

पदाधिकारी पुढीलप्रमाणे - शहराध्यत्रक्ष शरणु हजारे, उपाध्यक्ष किरण जौंजट, संपर्कप्रमुख विकी बनसोडे, मिडीया प्रमुख सद्दाम पठाण.

सोलापूर जिल्हा व लोकसभा क्षेत्रातील निवडी पुढीलप्रमाणे- युवक जिल्हाध्यक्ष विश्वजीत सरवदे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष महीबूब शेख, संघटक सिध्दार्थ कांबळे, जिल्हा संघटक दाऊद मुलाणी, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष वाहिद मुस्तफा, दक्षिण तालुका महिला अध्यक्ष रेश्मा मंगलगिरी.

तसेच माढा लोकसभा महिला जिल्हाध्यक्षपदी कुर्डूवाडीच्या आशा रिकिबे यांची नवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना अमित कांबळे यांच्या हस्ते तर आशा रिकिबे यांना सोमनाथ भोसले यांच्या हस्ते निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले.

बैठकीस भाईराजा सोनकांबळे, पांडुरंग दावणे, दत्ता राऊत, अबुबकर वस्ताद, विश्वास उगाडे, राज सोनवणे, नवीलाल खरादी, विकी लोंढे, मतीन सातखेड, सुनील गजधाने, दीपक भंडारे अदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरावर कार्यरत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

जिल्हयात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ व सुधारित नियम १९९५ अधिनियम ाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती कार्यरत आहे. समितीचे मुख्य कार्य अनुसूचित जाती व जमाती समाजावरील अत्याचार प्रकरणांचा आढावा घेणे, गुन्ह्यांच्या तपास व न्यायालयीन प्रक्रियेवर देखरेख ठेवणे, पीडितांना शासनाकडून देण्यात येणारे अर्थसहाय व पुनर्वसन योजनेची अंमलबजावणीचा आढावा घेणे तसेच अत्याचार प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे होय, जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीमध्ये जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असून सहायक आयुक्त समाज कल्याण हे सदस्य सचिव तर पोलिस अधिक्षक, पोलिस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग, जिल्हा सरकारी अभियोक्ता हे सदस्य असतात, तसेच सदर समितीवर शासन निर्णय क्रमांक जिदनिस १०९५/प्र.क्र. १२३/मावक-२/मुंबई दि.०७ डिसेंबर १९९५ अन्वये मा. पालकमंत्री यांच्या मान्यतेने अशासकीय संस्थामधील अनुसूचित जाती, जमातीचे ५ व बिगर मागासवर्गीय समाजातून ३ अशासकीय सदस्य यांची नियुक्ती करणेबाबत निर्देशित आहे. त्यानुसार पालकमंत्री यांचे मान्यतेने अशासकीय संस्थाम धील अनुसूचित जाती व जमातीचे ५ व बिगर मागासवर्गीय समाजातून २ अशा एकूण सात अशासकीय सदस्यांची जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती सोलापूर यांनी नियुक्ती केलेली आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अधिनियम कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीमध्ये सर्व नवनियुक्त अशासकीय सदस्यांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन सुलोचना सोनवणे, सदस्य सचिव जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती तथा सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी केले आहे. अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर यांनी दिली आहे.

## आज जिल्ह्यातील औषध दुकाने बंद; रूग्णांसाठी एक दिवसीय नियंत्रण कक्ष सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर जिल्हा केमिस्ट व ड्रगिस्ट संघटना यांनी जाहीर केल्याप्रमाणे उद्या दि. २० मे २०२६ रोजी जिल्ह्यातील औषध दुकाने बंद राहणार असून, ते ऑल इंडिया ऑर्गनायजेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट यांच्या एक दिवसीय बंदमध्ये सहभागी होणार आहेत.

रुग्णांच्या सोयीसाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या सोलापूर कार्यालयामार्फत एक दिवसीय नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. औषधाअभावी कोणत्याही रुग्णाच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे.

नागरिकांनी औषध उपलब्धतेसंदर्भात संपर्क साधण्यासाठी खालील क्रमांक वापरावा: सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, सोलापूर - ९५५२९२६११३ बंदच्या कालावधीत तालुकानिहाय सुरू ठेवण्यात येणाऱ्या औषध दुकानांची यादी व संपर्क क्रमांक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सहायक आयुक्त (औषधे) अ.स. गोडसे यांनी दिली आहे.

# आपत्ती काळात सर्व यंत्रणांनी दामिनी अन् सचेत मोबाईल ॲपचा प्रभावी वापर करावा

## अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी मान्सून काळातील संभाव्य आपत्ती व्यवस्थापनाबाबत बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

जिल्ह्यात मान्सून कालावधीत उद्भवू शकणाऱ्या संभाव्य आपत्तींच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची तयारी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी करावी; आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तयार करावेत. विविध विभागांचा समन्वय चांगला असावा. तसेच आपत्तीच्या प्रसंगी सर्व यंत्रणांनी दामिनी मोबाईल प व सचेत मोबाईल ॲपचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले.



मान्सुन पूर्व तयारी २०२६ च्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सर्व शासकीय यंत्रणांची अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता अकुललवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी तर सर्व तहसिलदार व्ही.सी.द्वारे उपस्थित होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी निऱ्हाळी म्हणाले की, परिवहन विभागाने जेसीबी, पोकलेन यांसारख्या अर्थमूव्हिंग इक्विपमेंटची माहिती तयार ठेवावी. तसेच तहसिलदारांनी तालुकास्तरावरील सर्व यंत्रणांच्या बैठका घेऊन आपत्तीपूर्व तयारी पूर्ण करावी. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने सर्व शासकीय विभागांनी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. ग्रामसुरक्षा यंत्रणा ही एक प्रभावी व युनिक व्यवस्था असून आपत्ती पूर्वसूचना देण्यासाठी तिचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

महावितरण विभागाने २४ तास वीज सुरू राहील असा नियंत्रण कक्ष स्थापन करावा तसेच वादळ व अतिवृष्टीमुळे वीज तारा तुटून वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश निऱ्हाळी यांनी दिले. जनावरांच्या चाऱ्याबाबत तहसिलदारांनी आढावा घेऊन टंचाई टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे. आवश्यकतेनुसार चाराबंदी आदेश जारी करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रत्येक तहसिलदारांकडे आपत्तीच्या काळात थेट समन्वयासाठी गोपनीय फोन उपलब्ध असावा, जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा साठा ठेवावा, नालेसफाईची कामे पूर्ण करावीत तसेच तलाव व विहिरीतील पाण्याची स्वच्छता राखण्याच्या सूचना ही अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिल्या. प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने संभाव्य आपत्तीच्या दृष्टीने केलेल्या तयारीची माहिती बैठकीत दिली. तसेच जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सर्व संबंधित यंत्रणांनी आपापल्या विभागाच्या मार्फत आपत्ती काळात करावयाच्या कामकाजाची तसेच आवश्यक साहित्याची माहिती त्यांनी दिली.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जि.प. प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) चे २६ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १९ मे -**

फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (५ वी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) चा निकाल ९६.२९ टक्के लागला. तब्बल २६ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत.

परीक्षेला २७ विद्यार्थी बसले होते. त्यातील १३ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. सर्वज्ञ वाघ व मल्हार सदावर्ते यांनी ३०० पैकी २४६ गुण मिळविले. आरोही पाटील हिने २४० गुण मिळविले आहेत.

दिव्या पांगरे-२२८ गुण, श्रवण देवकर-२२६ गुण, श्रेया सुतार २२४ गुण, विवेक जाधव २१८ गुण, ईश्वरी बोटे २१४ गुण, ऋषिकेश बरचे २१० गुण, आर्यन ठोंगे २१० गुण, समर्थ पाटील २०६ गुण, सार्थक शिंदे २०४ गुण, सार्थक माळी २०० गुण असे यश मिळविले आहेत. विद्यार्थ्यांना दिपाली गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल मुख्याध्यापक काळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता भोंग, उपाध्यक्ष योगिता सदावर्ते, सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी विद्यार्थी, दिपाली गोरे यांचे अभिनंदन केले आहे.



# दर्शन रांगेत स्प्रिंकलर, थंड पाणी आणि लिंबू सरबत

## पंढरपुरात मंदिर समितीकडून भाविकांची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मे -**

उन्हाच्या तीव्रतेमुळे विठुरायाच्या पदस्पर्श दर्शनरांगेतील भाविक उकाड्याने हैराण होत होते. उकाड्यापासून त्यांना दिलासा देण्यासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने दर्शन रांगेत स्प्रिंकलर यंत्रणेचा वापर करुन गारव्याचा प्रयत्न केला आहे. तसेच रांगेत भाविकांना थंड पाणी आणि लिंबू सरबतही दिले जात आहे. परिणामी भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

अधिक मासानिमित्त विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात भाविकांची दररोज संख्या वाढत आहे. भाविकांची संख्या वाढल्यामुळे विठुरायाची पदस्पर्श दर्शन रांग वाढत चालली आहे. अशातच वाढत्या उन्हामुळेही भाविक कमालीचे तप्त झाले आहेत. सहाजिकच दर्शन रांगेतही भाविकांना उन्हाचा प्रचंड त्रास जाणवत आहे. दर्शन रांगेतील भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची दक्षता मंदिर समितीने घेतली आहे.



मंदिर समितीकडून दर्शन रांगेतील भाविकांना थंड पिण्याच्या पाण्याची तसेच लिंबु सरबताची सोय केली जात आहे. या बरोबरच मंदिर समितीकडून दर्शन रांगेतील उड्डाणपूला जवळ भाविकांना थोडं हायस वाटवं यासाठी स्प्रिंकलर अर्थात तुषार फवारणी यंत्रणा देखील बसविण्यात आलेली आहे. या यंत्रणेमुळे दर्शन रांगेतील भाविकांना उन्हापासून थोडासा दिलासा मिळून थंड गारवा जाणवत आहे. मंदिर समितीच्या या उपक्रमामुळे भाविकांमधून समाधान देखील व्यक्त केले जात आहे.

### भाविकांसह पंढरपुरकरांमध्ये समाधानाची भावना


दैनिक तरूण भारताने मंगळवारच्या अंकात याबाबत वृत्त प्रकाशित केले होते. वृत्तात दर्शन रांगेत भाविकांना उन्हाचा होणारा त्रास व त्यावर उपाययोजना करण्याबाबत उल्लेख होता. त्यानंतर आज तातडीने मंदिर समितीने दर्शन रांगेत सुविधा उपलब्ध केल्या आहेत. परिणामी पंढरपुरांकडून समाधान व्यक्त होत आहे.

# सौरभ डिंगरेचा कान्स महोत्सवात डंका

## आपल्या चित्रकलेने पंढरपुरचेही नाव गाजवले





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ मे -**

येथील चित्रकार सौरभ डिंगरे याने रेखाटलेले चित्र थेट फ्रान्समधील कान्स चित्रपट महोत्सवात झळकले आहे. त्यामुळे पंढरपूरकरांसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

कान्समध्ये सध्या चित्रपट महोत्सव सुरु आहे. कान्समध्ये मदालसा या चित्र प्रकारातील तीन चिमुकल्या मुलींचे चित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. ते सौरभ डिंगरे याने रेखाटले आहे. त्यामुळे या चित्राची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा होत आहे. चर्चेवेळी पंढरपूरचाही नामोल्लेख होत आहे. सौरभच्या या चित्रांमुळे पंढरपूरच्या नावलौकीकात एक प्रकारे भरच पडली आहे.

सौरभ डिंगरे हा आपली चित्रे मदालसा बाय सौरभ या नावाने प्रसिद्ध करतो. अनेक हिंदी, मराठी कलाकार, उद्योगपती यांच्याकडे त्याची चित्रे आहेत. मुंबई, पुणे, बंगळूर, गोवा, कोलकाता अशा मोठ्या शहरातही त्याच्या चित्रांची प्रदर्शने भरवली जातात.

### कलाप्रेमी नागरिकांमधून कौतुकाचा वर्षाव

कान्स चित्रपट महोत्सवासाठी त्याने रेखाटलेले मराठमोळ्या लहान मुलींचे चित्र आणि त्यातून मराठी संस्कृतीची झळकलेली अस्मिता ही सौरभच्या कलेबाबत फ्रान्समध्ये डंका वाजवून गेली. यानिमित्ताने सौरभच्या कल्पकतेचे आणि सुर्जनशीलतेचे करावे तेवढे कौतुक थोडेच असल्याच्या प्रतिक्रिया तमाम पंढरपूरकर कलाप्रेमी नागरिकांमधून उमटत आहेत.

## महत्त्वाचे...




### शिवाजी पॉलिटेक्निकच्या माजी विद्यार्थी संघटनेकडून शालेय साहित्य वाटप

**सांगोला, दि. १९ मे -**

संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड व प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील माजी विद्यार्थी संघटनेमार्फत कै.काकासाहेब साळुंखे पाटील विद्यालय हंगिरगे, कै.रावसाहेब पाटील आदर्श विद्यालय कडलास, श्री सिद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नागज, न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु.कॉलेज पाचेगाव (बुद्रुक), विकास विद्यालय व ज्यु. कॉलेज अजनाळे, क्रांतिवीर विनायक दामोदर सावरकर विद्यालय चिनके, बलवडी हायस्कूल बलवडी, श्री संत तुकाराम विद्यालय बोंडले, यशवंतराव चव्हाण विद्यालय फळवणी, जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मळोली, विद्यामंदिर हायस्कूल लक्ष्मी दहिवडी, स्वामी विवेकानंद विद्यालय गुंजेगाव, श्री वेताळ विद्यामंदिर शिरशी आदी शाळांना व्हाईट बोर्ड, डस्टर व पेन या शालेय उपयोगी वस्तूंची भेट देण्यात आली. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश मिसाळ, उपाध्यक्ष निलेश माने, सचिव आनंद गायकवाड, सहसचिव पृथ्वीराज लिगाडे, खजिनदार शरद गायकवाड, सदस्य विशाल गाडवे, धनाजी काकडे तसेच प्रशालेचे विद्यार्थी, शिक्षक वर्ग, ग्रामस्थ व पालक उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




### गिरवी येथे शिवप्रसाद उद्योग समूहातर्फे 'होम मिनिस्टर'चे आयोजन

**वेळापूर, दि. १९ मे -**

गिरवी ता. माळशिरस येथे शिवप्रसाद उद्योग समूहाच्या वतीने भव्य होम मिनिस्टर व जनहित जागर मेळावा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद मोरे हे होते. यावेळी ऋतुजा मोरे, अश्विनी मोरे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ आणि महिला उपस्थित होत्या.

मेळाव्यात महिलांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा घेण्यात आली. विविध खेळ, प्रश्नमंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमुळे महिलांनी उत्साहात भाग घेतला. विजेत्या महिलांना आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जनहित जागर मेळाव्यात शासकीय योजना, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, बचत गट, शेती, रोजगार आणि सामाजिक उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान शरद मोरे यांनी सामाजिक कार्य, ग्रामीण विकास आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर शिवप्रसाद उद्योग समूह कायम जनतेसोबत राहील, अशी ग्वाही दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला पाठिंबा दर्शवला.

ग्रामस्थांकडून या सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रमाचे मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात येत आहे. यावेळी सेंटर चालक - शुभम जाधव, सुधीर नरुटे, उत्तम कचरे, गणेश जाधव, महादेव पिसे, राहुल कुलकर्णी, किसन मोहिते, सत्यवान राऊत, नारायण कचरे तसेच सभासद आणि मान्यवर उपस्थित होते.

# अक्कलकोट तालुक्यात रानडुकरांचा हैदोस

## हल्ल्यात तीन शेतकरी जखमी; रानात काम करणाऱ्यांमध्ये भीती

**सोलापूर, दि. १९ मे -**

अक्कलकोट तालुक्यातील सलगर व सदलापूर येथील शेतामध्ये रानडुकरांनी हैदोस घातला आहे. दोन दिवसातील हल्ल्यात तीन शेतकरी जखमी झाले आहेत. शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

देवानंद पाटील ( वय १९ , रा. सलगर , ता. अक्कलकोट ) हे १८ मे रोजी पहाटे पिकांना पाणी देत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला करून पाठीला चावा घेतला. जखम झाल्याने ते उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दाखल झाले. राजकुमार गुडेवाडी (वय ५५, रा. सदलापूर ,ता. अक्कलकोट ) हे १८ मे रोजी सकाळी शेतातून प्रातविधीला निघाले असताना रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. डुकराने त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना चावा घेतला. यात एका बोटाचा तुकडाच पडला. जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

मल्लेश गवळी ( वय ३० , रा. सदलापूर, ता. अक्कलकोट ) हा शेतकरी १८ मे रोजी सकाळी शेतात काम करीत असताना रानडुकराने त्याच्यावर हल्ला केला. चावा घेतल्याने हाताच्या बोटांना जखम झाल्याने त्याला येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी दुपारी भाऊ यल्लप्पा यांनी दाखल केले.

# गणेश पाटील यांची राज्य राखीव पोलिस दलात निवड

**वेळापूर, दि. १९ मे-**



माढा तालुक्यातील अकोले खुर्द येथील गणेश पाटील यांची राज्य राखीव पोलीस दल गट क्रमांक २ मध्ये निवड झाली आहे. .

गणेश पाटील यांना पोलीस उपअधीक्षक धनंजय पाटील तसेच वडील अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी सातारा येथील राजे करिअर अॅकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेतले होते. पोलिस दलात निवड झाल्याबद्दल पाटील यांचे अकोले खुर्द, टेंभुर्णी व परिसरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



### संभाजी महाराज जयंतीनिमित्त १२१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १९ मे-**

मोडनिंब (ता. माढा) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त छत्रपती ग्रुपच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात १२१ जणांनी रक्तदान केले.

अनेकवेळा रुग्णांना तातडीने रक्ताची गरज भासते. हीच गरज ओळखून छत्रपती ग्रुपकडून शिबिराचे आयोजन करण्यात येते, अशी माहिती छत्रपती ग्रुपचे अध्यक्ष रणवीर सावंत यांनी दिली. रेवनील ब्लड बँकेचे वतीने रक्त संकलन करण्यात आले. प्रत्येक रक्तदात्यास प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाळवणी येथे होणार पाच पांडवांचा अभिष्टचिंतन सोहळा

## नामदेव महाराज यांचे वंशज हभप एकनाथ महाराज नामदास यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १९ मे-**

एकत्र कुटुंब पद्धती ही भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे लहान मुलांवर वडीलधाऱ्यांचे संस्कार होण्यास मदत होते.परंतु अलीकडील काळामध्ये एकत्र कुटुंब पद्धती जवळपास नष्ट होत चालली आहे.

हम दो हमारे दो अशी मानसिकता समाजाची होत चालली आहे. यास अपवाद ठरत आहे ते भाळवणी (नाईकाची) ता.पंढरपूर येथील कलढोणे कुटुंबीय. या कुटुंबीयांमध्ये सुदाम कलढोणे, उमराव कलढोणे, शंकर कलढोणे, कल्याण कलढोणे, शत्रुघ्न कलढोणे या पाच भावंडांचे कुटुंब एकत्र रहात आहे. महाभारतामध्ये ज्याप्रमाणे पाच पांडव एकत्र राहत होते त्याच इतिहासाचा आदर्श समोर ठेवून या पाचही भावंडांचे कुटुंबीय आजही सुखा समाधानाने व आनंदाने एकत्र रहात आहेत. त्या अनुषंगानेच कलढोणे कुटुंबीय व त्यांच्या संबंधित नातेवाईकांनी या पाची भावंडांचा सहस्त्र चंद्रदर्शन, अमृतमहोत्सवी सोहळ्याचे एकत्र आयोजन श्रीराम मंदिर शुक्रवार पेठ,भाळवणी येथे गुरुवार दिनांक २१ मे रोजी सकाळी ९:३० वाजता संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे १७ वे वंशज एकनाथ महाराज नामदास आणि मान्यवर मंडळी यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे. पाचही भावंडांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला असून शिक्षक शंकर कलढोणे यांनी अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले. सुदाम कलढोणे हे आयुष्यभर रामनामाचा प्रसार प्रचार करत आहेत.

उमराव कलढोणे यांनी सामाजिक क्षेत्रात तर कल्याण कलढोणे हे प्राध्यापक म्हणून माणगाव जिल्हा सिंधुदुर्ग येथे शैक्षणिक चळवळीत काम करत पर्यावरण रक्षणासाठी वृक्षलागवड करत आहेत.शत्रुघ्न कलढोणे हे जय भवानी तरुण मंडळांच्या माध्यमातून भाळवणी येथील सांस्कृतिक चळवळ मनापासून टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.सुरुवातीच्या काळात परिस्थिती हालाखीची असतानाही त्यावर मात करत कलढोणे परिवार खंबीरपणे उभा राहिला.



सुदाम कलढोणे, उमराव कलढोणे यांचे सहस्त्रचंद्रदर्शन, शंकरराव कलढोणे गुरुजी यांचे अमृतमहोत्सवी वर्ष, कल्याण कलढोणे यांची सत्तरी, शत्रुघ्न कलढोणे यांची एकसष्ठी असा दुग्ध शर्करा योग आल्याने या समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कलढोणे परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास कलढोणे परिवारावर प्रेम करणारे भाळवणीकर, आप्तेष्ट, शिक्षक, मित्रमंडळीं यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कलढोणे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रशासकीय अधिकारी, सैनिकांची खाण आणि भरघोस द्राक्ष

## सुर्डी गावाची प्रगतीची गरुडझेप; कृषी आणि शिक्षणाच्या जोरावर यशाचा सुवर्णपट

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १९ मे-**

बार्शी तालुक्यातील सुर्डी हे गाव आज प्रगती आणि समृद्धीचे आदर्श मॉडेल बनले आहे. सुमारे ५ हजार लोकसंख्येचे हे गाव ऐतिहासिक बुरुजांच्या तटबंदीने वेढलेले असले, तरी येथील विचारांची आणि प्रगतीची क्षितिजे मात्र अत्यंत आधुनिक आणि व्यापक आहेत. ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या कृपेने नटलेल्या गावाने आज शिक्षण, प्रशासन, देशसेवा आणि शेती अशा सर्वच क्षेत्रांत आपला ठसा उमटवला आहे.

सुर्डी प्रामुख्याने शेतीप्रधान आहे, मात्र पारंपरिक शेतीला फाटा देत येथील शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरली. आज हे गाव 'द्राक्षांचे गाव' म्हणून ओळखले जात आहे. येथील द्राक्षांनी बाजारपेठेत स्थान निर्माण केले आहे. इतर पिकांचेही भरघोस उत्पादन घेतले जाते.

गावात एक डाळ मिल देखील कार्यरत आहे. पशुपालनाला बळ देण्यासाठी गावात दोन दूध संकलन केंद्रे आहेत. त्या माध्यमातून गावाची आर्थिक घडी मजबूत झाली आहे. व्यावसायिक बाजारपेठेसाठी येथील नागरिक वैराग आणि बार्शी या प्रमुख शहरांशी जोडलेले आहेत.




### भविष्यातील 'अधिकारी घडवणारे' हरित गाव

चारही बाजूंनी ऐतिहासिक बुरुज आणि मध्यभागी हिरवीगार शेती यामुळे सुर्डी गाव हरित गाव म्हणून उठून दिसते. गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या मते, आमच्या गावाने आजवर अनेक हिरे देशाला दिले आहेत. गावातील मुलांमध्ये शिक्षणाची मोठी आवड असून, येणाऱ्या काळातही या मातीतून अनेक मोठे सनदी अधिकारी, डॉक्टर आणि सैनिक घडतील अशी आशा व्यक्त केली जाते.

सुर्डी गावाने देशाला आणि राज्याला एकापेक्षा एक सरस अधिकारी दिले आहेत. प्रकाश शेळके (डेप्युटी कलेक्टर), बालाजी शेळके (एसआयटी विभाग), मारुती शेळके (पीएसआय) आणि डोईफोडे (पीएसआय), काकासाहेब डोईफोडे (मुख्य अधिकारी). यांची नावे गाजत आहेत. गावातील अनेकांनी सैन्यात ही शौर्य गाजवले आहे. मेजर सत्यवान शेळके, मेजर गहीनाथ गवळी, मेजर हिरोजी शेळके, मेजर संजय शेळके, मेजर दिगंबर डोईफोडे यांच्यासह अनेक माजी व आजी सैनिकांचा समावेश आहे. वनविभागात महावीर शेळके आणि ज्योतीराम शेळके हे जंगलांच्या रक्षणाची जबाबदारी चोख बजावत आहेत.

### गावाात शिक्षण आणि आरोग्याचा भक्कम पाया

सुर्डीची प्रगती ही गावच्या शिक्षण व्यवस्थेवर झाली आहे. गावात एक जिल्हा परिषद शाळा आणि एक शिक्षण संस्था कार्यरत आहे. येथील नवीन पिढी उच्च दर्जाचे शिक्षण घेत आहे. गावातील मुख्याध्यापक आप्पासाहेब शेळके यांच्यासह सुमारे ३० पेक्षा जास्त शिक्षक जिल्हा परिषद व विविध संस्थांमध्ये ज्ञानदान करत आहेत. गावात शासकीय हॉस्पिटल उपलब्ध असून, आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी ४ आशा वर्कर आणि ७ अंगणवाड्या कार्यरत आहेत. उच्च वैद्यकीय सेवेसाठी गावात डॉ. शेळके आणि डॉ. डोईफोडे हे अविरत सेवा देत आहेत.